# जनमध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार २० जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ ८







# अयोध्येतून रामलल्लाचे हार, पादुकाही चोरीला?



**अयोध्या /वृत्तसंस्था-**अयोध्येच्या राम मंदिरातील दान चोरीप्रकरणी एसआयटीचा तपास वेगात सुरू असून आता नवनवीन खुलासे होत आहेत. एसआयटी ट्रस्टशी संबंधित लोकांची चौकशी करत आहे, तर दुसरीकडे मंदिराच्या कामकाजात गुंतलेल्या कर्मचा-यांचीही चौकशी केली जात आहे. याच दरम्यान, रामलल्लाचे हार आणि पादुकाही गायब करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. त्यांचीही चोरी झाली असण्याची शंका व्यक्त होत आहे. एसआयटीने गुरु वारी या प्रकरणात मंदिरात आलेल्या दानाची तपासणी केली, तसेच दानाची मोजणी आणि ते बँकेत जमा करण्याच्या प्रक्रियेचीही पडताळणी केली जात आहे. तपास पथक दानपात्रांमधील रोकड आणि सोने-चांदी, हि-याचे दागिने मोजणी केंद्रांपर्यंत पोहोचवण्याच्या व्यवस्थेचा कसून शोध घेत आहे. एसआयटीने काल पुन्हा एकदा गोपाळ राव आणि टिन्नू यादव यांची चौकशी केली आहे. राम मंदिराच्या पुजा-यांकडेही हिरे जडित हार आणि पादुकांबद्दल विचारणा करण्यात आल्याची माहिती आहे. यावर पुजा-यांनी सांगितले की, हार आणि पादुका परिधान केल्यानंतर टिन्नू यादव याच्याकडे परत करण्यात आल्या होत्या. तर टिन्नूने दावा केला की, या वस्तू वितळवून सोन्याच्या विटा बनवण्याचं ठरलं होतं. दुसरीकडे दागिने सांभाळणारे कृष्ण देव तिवारी यांच्याकडे विचारणा केली असता, तिथे सोन्याची वीटही सापडली नाही आणि कोणती पावतीही मिळाली नाही. यासोबतच सीसीटीव्ही फुटेज, बँकिंग रेकार्ड, डिजिटल डेटा आणि संबंधित कागदपत्रांचीही तपासणी केली जात आहे. (पान २ वर)

# विदर्भाच्या अनुशेष निर्मूलनाचे प्रणेते माजी आमदार प्रा.बी.टी.देशमुख यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-**विदर्भाच्या विकासासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे, शिक्षक व पदवीधरांच्या प्रश्नांचा बुलंद आवाज आणि अमरावती पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार प्रा. भाऊराव तुळशीराम उपाख्य बी. टी. देशमुख यांचे आज शुक्रवार, दि.१९ जून २०२६ रोजी रात्री निधन झाले. विदर्भातील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

प्रा. बी. टी. देशमुख यांनी १९८० ते २००९ या सलग जवळपास तीन दशकांच्या कालावधीत अमरावती पदवीधर मतदारसंघाचे प्रभावी प्रतिनिधित्व केले. अभ्यासपूर्ण मांडणी, तत्त्वनिष्ठ भूमिका आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणारे लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख होती. सभागृहात त्यांनी शिक्षक, प्राध्यापक, पदवीधर, विद्यार्थी तसेच विदर्भाच्या विकासाशी निगडित प्रश्न अत्यंत प्रभावीपणे मांडले. अमरावती विद्यापीठ स्थापनेच्या लढ्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विदर्भातील सिंचन, विकास अनुशेष, शिक्षण क्षेत्रातील समस्या आणि प्राध्यापकांच्या हक्कांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठविला. दिलेली आश्वासने पूर्ण होत नसल्याच्या निषेधार्थ आमदारकीचा राजीनामा देण्याचे धाडस दाखविणारे ते राज्यातील दुर्मिळ लोकप्रतिनिधी म्हणून ओळखले जातात.



प्रा. देशमुख यांना नुकताच नागपूर येथे सेंट्रल इंडिया फाउंडेशन तर्फे प्रदान करण्यात आलेला पहिला 'डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती ज्ञानयोगी पुरस्कार' बहाल करण्यात आला होता. त्यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांना 'खरे ज्ञानयोगी' म्हणून गौरविले होते.

पत्रकार, प्राध्यापक, लोकशिक्षक आणि अभ्यासू विधिमंडळ सदस्य अशी त्यांची बहुआयामी ओळख होती. साधी राहणी, स्पष्टवक्तेपणा आणि जनहितासाठीची निष्ठा यामुळे ते सर्वच स्तरांतील लोकांमध्ये आदराचे स्थान मिळवून होते. त्यांच्या निधनाने २१ जुन ला होणारा नुटाचा ५० वा वर्धापण दिन कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे.

### पत्रकार ते आमदार..

प्रा. बि.टी. देशमुख यांनी दै. हिंदुस्थान मध्ये पत्रमहर्षी बाळासाहेब मराठे यांच्या मार्गदर्शनात पत्रकारीतेचे धडे गिरविले. याच कालखंडात त्यांनी अमरावती विभाग पदवीधर मतदार संघाची निवडणूक लढवीली. निवडूण येण्याच्या अगोदरल्या दिवशी पर्यंत ते दै. हिंदुस्थान मध्ये कार्यरत होते. दै.हिंदुस्थानच्या कार्यालयात त्यांनी अनेक जवाबदा-या सांभाळल्या. बातमी लिहीण्यापासून ते छपाई व वितरण पर्यंत त्यांच्या प्रवास हा प्रेरणादायी ठरणारा आहे.

### आज अंत्यसंस्कार

माजी आमदार प्रा. बी. टी. देशमुख यांची अंत्ययात्रा शनिवार, दि. २० जून रोजी सायंकाळी ५ वाजता त्यांच्या फ्रेन्डस कॉलनी, नवसारी मार्ग अमरावती येथील निवासस्थानावरून निघेल व स्थानिक मोक्षधामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. अशी माहिती नुटाचे अध्यक्ष प्रा. प्रविण रघुवंशी यांनी दिली.

# मी पायउतार होण्यास तयार

## ■ शिवसैनिक शिवसेना प्रमुख झाला तरी आनंद ■ वर्धापन दिनी ऊद्धव ठाकरेंची भावनिक साद

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेनेच्या ६० व्या वर्धापनदिनी ऊद्धव ठाकरेंनी पक्ष अध्यक्ष पदावरु न पायऊतार होण्याचा मानस बोलून दाखवला. बंडखोर खासदार, आमदारांकडून होणारे आरोप खरे वाटत असल्याचे आता हे पद सोडण्यास तयार असल्याचे मोठं वक्तव्य ऊद्धव ठाकरेंनी वर्धापनदिनी केले. पण, शिवसेना चोरांच्या, दरोडेखोरांच्या हातात जाउ द्यायची नाही, असा निर्धारही त्यांनी बोलून दाखवला. सामान्य शिवसैनिक देखील शिवसेना प्रमुख झाला तरी कौतुक वाटेल, मला नेतृत्वाची हौस नाही म्हणत ऊद्धव ठाकरेंनी पद सोडण्याची तयारी दर्शवली.



माझ्या माणसांनी माझ्यावर बोट दाखवले आणि मी एक क्षणाचा देखील विलंब न करता मुख्यमंत्रीपद सोडले, वर्षा बंगला सोडला आणि मातोश्रीवर गेलो. मला काही हवं असतं तर, मी विधानपरिषदेवर देखील गेलो असतो पण, न जाण्याचा निर्णय घेतला. शिवसेनेला ६० वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या १२ -१३ वर्षापासून मी तुमचं नेतृत्व करत आहे. पण, माझ्यावर जे आरोप होत आहेत. ते जर खरे वाटत असतील तर सांगावे, मी या पदावरु न पायऊतार होण्यास तयार आहे. पण, माझी एक अट आहे ही सोन्यासारखी शिवसेना चोराच्या, दरोडेखोराच्या हातात जाउ द्यायची नाही, असे ऊद्धव ठाकरे कार्यकर्त्यांना संबोधित करताना म्हणाले. ऊद्धव ठाकरे पुढे कोणताही शिवसैनिक शिवसेना प्रमुख झाला तरी आनंद होईल असेही म्हणाले. तुमच्यापैकी एक शिवसैनिक येउ द्या, तो शिवसेना प्रमुख होईल, मला त्याचं सुद्धा कौतुक वाटेल. मला नेतृत्वाची हौस नाही, मी आता हे पद सोडण्यास तयार आहे, असे ऊद्धव ठाकरे म्हणाले. शिंदेसेनेच्या नेत्यांवर टीका करताना म्हणाले, 'जे काही मिळेल... मंत्री मीच झालो पाहिजे. मुख्यमंत्री मीच झालो पाहिजे. माझं कारटं खासदार झालं पाहिजे, मंत्री झालं पाहिजे. मातोश्रीने भोगायचं. आम्हाला नको हे काही. पण, सोसायचं किती?', असा सवाल ठाकरेंनी पक्ष सोडून गेलेल्या नेत्यांना केला.

# ये तो सिर्फ ट्रेलर है -शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी :** 'काल परवापासून कुछ कुत्ते भोंक रहें हैं. कुत्ते झुंड मे आते हैं. टायगर अकेला आता है. कुत्ते भोंकते रहते है. टायगर शिकार करत है. ये तो सिर्फ ट्रेलर है', असा टोला लगावत शिंदे यांनी ठाकरे गटाला इशारा दिला. शिवसेनेचा आज वर्धापन सोहळा पार पडला. यावेळी शिवसेनेचे प्रमुख आणि राज्याचे ऊपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या शैलीत भाषण केले. यावेळी त्यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधला.



एकनाथ शिंदे म्हणाले, 'मोदी यांच्यावर एका ही भ्रष्टाचाराचा डाग लावण्याची हिम्मत कुणी केली नाही. हा देशाचा अभिमान आहे. राम मंदिर बनवले. ३७० कलम हटवले. ही स्वप्न बाळासाहेब ठाकरे यांची होती. खुर्चीसाठी बाळासाहेबांचे विचार धुळीला मिळवले. हयात असताना तर तुम्ही बाळासाहेबांना छळले पण त्यानंतर ही विचारांशी प्रतारणा करत त्यांना त्रास दिला. शिवसेना पहिल्यांदा फोडली. राष्ट्रवादीने. नंतर काँग्रेसने त्यांच्या ओव्या गाता पण शिव्या कुणाला देता? धणुष्यबाण वाचवणा-याला, असा टोलाही लगावला. अरे ४० आमदार होते. या एकनाथ शिंदेने ६० निवडून आणले, असेही शिंदे म्हणाले. 'देवेंद्र फडणवीस आणि माझ्यात देखील काड्या करण्याचा प्रयत्न करतात पण आम्ही टीम म्हणून काम करतो. त्यांना लपून लपून सांगतात. पण ते मला सगळं सांगतात', असेही शिंदे म्हणाले.'लोकांनी त्यांना त्यांची जागा दाखवली. शिवसेना आता गावागावात पोहोचली आहे. रामदास भाई म्हणाले. बाळासाहेब आशीर्वाद देत असतील. खरं आहे, त्यांना स्वर्गात देखील आनंद वाटत असेल. बाळासाहेब तुमच्या मनात. विचारात आणि कामात असावं लागते. शिवसैनिक बाळासाहेबांचा वारसदार आहे. रक्ताचे असणं म्हणजे वारसदार नाही. शिवसेना म्हणजे ७/१२ नाही. जमिनीचा तुकडा नाही, असेही शिंदे म्हणाले.

**कर्जमाफीची घोषणाही पूर्ण केली-** जिथे संकट तिथे शिवसेना आहे. शेतकरी संकटात होता, आता शेतक-यांना कर्जमाफी दिली आहे. संकट येईल तिथे शिवसेना पुढे असते. बळीराजा आपला मायबाप आहे म्हणून राज्याची तिजोरी शेतक-याची आहे, असेही शिंदे म्हणाले. गेल्या चार वर्षाच महाराष्ट्राचा चौफेर विकास झाला आहे. राज्य आता पुढे जात आहे. राजकारण चालतच राहिल. राज्यात अल लिनोचे सावट आहे. शेतकरी संकटात आहे. शिवसैनिकांनी शेतक-यांसाठी काम करा, असेही शिंदे म्हणाले.

# लिबनानवर इस्त्रायलचा भीषण बॉम्बवर्षाव; 16 ठार

**नबातीह/ वृत्तसंस्था-**मध्य पूर्वेतील युद्ध आता एका अत्यंत विनाशकारी आणि धोकादायक वळणावर येउन पोहोचले आहे. इस्त्रायल आणि लेबनानमधील सीमाभागातील तणावाने सर्व मर्यादा ओलांडल्या असून, दक्षिण लेबनानमधील ऐतिहासिक आणि गर्दीचा जिल्हा असलेल्या नबातीहवर ) इस्त्रायली हवाई दलाने आणि तोफखान्याने रात्रभर मृत्यूचा थैमान घातला. मध्यरात्रीनंतर झालेल्या या भीषण आणि अत्यंत क्रूर बाम्बहल्ल्यांमध्ये आतापर्यंत किमान १६ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, मृतांचा हा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.स्थानिक प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, हा हल्ला या संपूर्ण युद्धातील नबातीह परिसरावरील आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि प्राणघातक हल्ला ठरला आहे. जेव्हा संपूर्ण शहर गाढ झोपेत होते, तेव्हाच इस्त्रायली लढाउ विमानांनी निवासी वस्त्यांवर एकामागून एक शक्तिशाली क्षेपणास्त्रे डागली. केवळ नबातीह मुख्य शहरच नव्हे, तर त्याच्या आजूबाजूला असलेल्या काफर जौझ, काफर रामोन आणि झेबेदिन् यांसारख्या शांत आणि लोकवस्ती असलेल्या छोट्या शहरांनाही या तोफगोळ्यांच्या मा-याने हादरवून सोडले. या महाभयंकर स्फोटांच्या आवाजाने आणि आगीच्या ज्वाळांनी नागरिक प्रचंड घबराटीखाली वावरत आहेत.



# खासदार राजाभाऊ वाजे यांचे नाशिकमध्ये जंगी स्वागत

**नाशिक :** शिवसेना ऊद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार राजाभाउ वाजे दिल्लीतील घडामोडींनंतर शुक्रवारी (दि.१९) नाशिकमध्ये दाखल झाले. शिवसेनेच्या ऑपरेशन टायगर अंतर्गत शिवसेना (ऊद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या ६ खासदारांनी बंड पुकारलं असताना कथितरीत्या कोट्यवधी रु पयांची ऑफर्स धुडकावून खासदार राजाभाउ वाजे ऊद्धव ठाकरेंशी एकनिष्ठ राहिले.यामुळे त्यांचे नाशिकमध्ये सर्वत्र कौतुक होत असून शिवसेना (ऊबाठा) पक्षाकडून ढोल-ताशांच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आलं. यावेळी कार्यकर्त्यांचं प्रेम बघून खासदार राजाभाउ वाजे भावुक झाले होते. दिल्लीत ऑपरेशन टायगर शिवसेना ऊद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नउपैकी सहा खासदारांनी बंड केलं. या घडामोडीत नाशिकचे खासदार राजाभाउ वाजे ऊद्धव ठाकरेंशी एकनिष्ठ राहिले आहेत. त्यामुळं खासदार वाजेंची पक्षावरील एकनिष्ठता बघून कार्यकर्त्यांनी राजाभाउ वाजे दिल्लीवरू न रेल्वेनं नाशिकमध्ये परतल्यावर त्यांचं ढोल ताशांच्या गजरात गुलालाची ऊधळण करत भव्य स्वागत केलं. कार्यकर्त्यांचा हा ऊत्साह बघून खासदार राजाभाउ वाजे भावुक झाल्याचं बघायला मिळालं.



# अमृता देवेंद्र फडणवीस यांचा बॉलिवूडमध्ये धमाका!

**मुंबई /प्रतिनिधी-**राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस नेहमीच चर्चेत असतात. त्यांची एक गायिका म्हणून स्वतंत्र ओळख आहे. आता पुन्हा एकदा अमृता एका नव्या गाण्यासह प्रेक्षकांच्या भेटीला आल्या आहेत. अमृता फडणवीस यांनी थेट बॉलिवूडमध्ये धमाका केला आहे. आगामी बहुचर्चित चित्रपट वेलकम टू द जंगलमधील दीवाने हैं या गाण्याला त्यांनी आवाज दिला आहे. वेलकम टू द जंगलमधील दीवाने हैं हे गाणे अमृता फडणवीस आणि प्रसिद्ध गायक-संगीतकार आनंद राज आनंद यांनी गायले आहे. या गाण्यात अक्षय कुमार, सुनील शेट्टी, रवीना टंडन, दिशा पाटनीसह इतर कलाकार नाचताना दिसत आहेत. काही तासांमध्येच या गाण्याला लाखांपेक्षा अधिक लोकांनी पसंती दर्शवली आहे. अहमद खान दिग्दर्शित आणि साजिद नाडियाडवाला निर्मित वेलकम टू द जंगल हा चित्रपट २६ जून २०२६ रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.



# शोरमा, पिझ्झा खाणे बेतले जीवावर; 14 जणांना विषबाधा

**भिवंडी /प्रतिनिधी-**शहरातून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. शहरातील खंडूपाडा परिसरात चिकन शोरमा, पिझ्झा आणि फालुदा खाल्ल्यानंतर एका कुटुंबातील ६ व इतर असे एकूण १५ जणांना अन्नातून विषबाधा झाल्याची घटना घडली आहे. बाधित रु ग्णांना मळमळ-ऊलटी याचा त्रास जाणवू लागल्याने सर्व रु ग्णांना ऊपचारासाठी भिवंडी ऊपजिल्हा रु ग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर ऊपचार सुरू आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित नागरिकांनी शहरातील खंडू पाडा परिसरातील दुकानातून चिकन शोरमा, पिझ्झा खरेदी करू न दुपारी घरी नेउन खाल्ला. त्यानंतर संध्याकाळपासूनच काही जणांना अस्वस्थ वाटू लागले. दुपारपर्यंत त्रास वाढल्यानंतर सर्वांना तातडीने रु ग्णालयात दाखल करण्यात आले. विषबाधा झालेल्या व्यक्तींना ऊलट्या, पोटदुखी, मळमळ, जुलाब आणि अशक्तपणा यांसारखी लक्षणे जाणवू लागली होती. रु ग्णांची तपासणी केल्यानंतर डाक्टरांनी प्राथमिक अंदाजानुसार अन्नातून विषबाधा झाल्याचे सांगितले आहे. या घटनेतील रु ग्णांमध्ये ६ पुरु ष, ६ महिला आणि २ लहान मुलांचा समावेश आहे. घटनेची माहिती मिळताच शांतीनगर पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून अन्न विषबाधेचे नेमके कारण शोधण्यासाठी आरोग्य विभागाकडून तपास सुरू करण्यात आला आहे. संबंधित खाद्यपदार्थांचे नमुने तपासणीसाठी पाठविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

# 'टीईटी' परीक्षेत बुरखा, मास्क, टोपीवर बंदी

**मुंबई / प्रतिनिधी-** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेच्या परीक्षार्थींना बुरखा, मास्क , टोपी यापैकी काहीही घालता येणार नाही. परीक्षेला जाताना आधार कार्ड, पॅनकार्ड, वाहन परवाना, मतदान ओळखपत्र यापैकी एकाची मूळप्रत सोबत ठेवावी लागणार आहे. परीक्षार्थीकडे मूळप्रत असल्याशिवाय केंद्रात प्रवेश मिळणार नाही. देशात काही आठवड्यांपूर्वी नीट परीक्षेत गोंधळ पाहायला मिळाला होता. या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर राज्य परीक्षा परिषदेने यंदापासून टीईटी परीक्षेचे नियम कठोर केले आहेत. परीक्षेदरम्यान कोणतेही गैरप्रकार होउ नयेत, यासाठी कठोर पावले ऊचलण्यात आली आहेत. यंदा केंद्रात प्रवेश करण्याआधी परीक्षार्थी आणि कर्मचा-यांचे मेटल डिटेक्टरच्या सहाय्याने फ्रिस्किंग होईल. परीक्षार्थींची हॅण्ड हेल्ड मेटल डिटेक्टरच्या सहाय्याने तपासणी केली जाणार आहे. तसेच परीक्षार्थींची बायोमेट्रिक हजेरी घेतली जाणार आहे. केंद्रावर परीक्षार्थ्याचे फेस रिकग्नीशन केले जाईल. त्याचबरोबर संशयित परीक्षार्थीची आधार पडताळणीही परीक्षा कालावधीत केली जाईल. परीक्षा केंद्रात मूळ विद्यार्थ्यांऐवजी अन्य परीक्षार्थी प्रवेश केल्याचे आढळल्यावर फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशारा राज्य परीक्षा परिषदेने दिला आहे.परीक्षा केंद्र आणि परिसर, परीक्षा दालनात सीसीटीव्ही हे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित असणार आहेत. कनेक्टमध्ये संपर्कासाठी प्रत्येक परीक्षा केंद्र संचालक, परीक्षा संनियंत्रण कक्ष आणि राज्य परीक्षा परिषद यांच्याकडे इंटरनेट फोन ऊपलब्ध करून दिले जाणार (पान २ वर)



# आता आमदार व नगरसेवकही फोडणार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत दोन्ही शिवसेनेचे वर्धापन दिन साजरे झाले. दोन दिवसापूर्वीच शिंदे गटाने ठाकरे गटाचे सहा खासदार फोडले, या पार्श्वभूमीवर आरोप-प्रत्यारोप झाले. शिवसेनेचे नेते गुलाबराव पाटील यांनी यावेळी बोलताना ठाकरे गटाला इशारा दिला. 'आता फक्तखासदार फोडले, यापुढे आमदार आणि नगरसेवकही फोडणार', असा इशारा मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिला. ते गोरेगावच्या नेस्को येथील मेळाव्यात बोलत होते. गुलाबराव पाटील म्हणाले, वर्धापन दिनाचा हिरकमहोत्सवी ६० (पान २ वर)

## आता शरदचंद्र पवार गटाला धक्का

# तुतारीचे 5 खासदार घड्याळ हाती बांधणार?

**मुंबई/प्रतिनिधी :** सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास वाढलेला आहे. माजी खासदार-आमदार आल्यावर आता आजी खासदार-आमदारही आमच्या पक्षात येण्यास इच्छुक असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी केला आहे.शिंदेसेनेचे ऑपरेशन टायगर यशस्वी झाल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडींनी वेग घेतल्याचे पाहायला मिळत आहे. ऊद्धवसेनेचे बंडखोर खासदार शिंदेसेनेत सामील होणार असल्याची चर्चा आहे. ऊद्धवसेनेतील खासदारांनी बंडखोरी केल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला धक्का बसण्याची शक्यता आहे. तसा मोठा दावा राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) एका बड्या नेत्याने केला आहे. तुतारीमधील पाच खासदार आमच्याकडे येण्यास इच्छुक आहेत, असे म्हणत पक्षप्रवेशाची तारीखही सांगून टाकली आहे. आमचा पक्ष आता मजबूत होत आहे. माजी खासदार, आमदार आमच्या पक्षात आले आणि आता आजी खासदार, आमदारही येउ शकतात. त्यात काही अडचण येईल, असे मला वाटत नाही. पक्षाची ताकद वाढवण्याच्या दृष्टिकोनातून प्रत्येकाने काम केले पाहिजे, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धर्मराव बाबा आत्राम यांनी म्हटले आहे.

आम्ही ऑपरेशन वगैरे काही करणार नाही. ऑपरेशन तुतारीवालेच करतील. तुतारीचे पाच खासदार आमच्या पक्षात येउ शकतात. सगळ्यांना काम करणे गरजेचे आहे. पुढे निवडून यायचे असेल, तर त्यांना विकासासोबत राहणे गरजेचे आहे. सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वावर लोकांचा विश्वास वाढलेला आहे, असे आत्राम यांनी सांगितले.




**काही खासदार आमच्याकडे येण्यास इच्छुक आहेत-** काँग्रेसचे काही खासदार तुमच्या संपर्कात आहेत का, या प्रश्नावर बोलताना आत्राम म्हणाले की, आता बघू. भविष्यात काय होते, ते समजेल. तेव्हा ऑपरेशन करावे लागेल. वरिष्ठ पातळीवर काही चर्चा आहे. परंतु, काही खासदार आमच्याकडे येण्यास इच्छुक आहेत, असे सूचक विधान आत्राम यांनी केले.दरम्यान, मुद्दा विकासाचा आहे. लोकांना काम करणे आवश्यक आहे. लोकांची कामे होणेही गरजेचे आहे. यादृष्टीने वातावरणात फरक होईल. तुतारीचे पाच खासदार १२ डिसेंबरपर्यंत येउ शकतील, असा मोठा दावा धर्मराव बाबा आत्राम यांनी केला.

**आपल्या मुलीला तुतारीतून फोडून दाखवावे-** पवारांच्या राष्ट्रवादीचे काही खासदार फुटणार असल्याचे तथ्यहीन वक्तव्य बाबा आत्राम यांनी केले आहे. हे वक्तव्य पूर्णतः निराधार आहे. बाबा आत्राम यांची मुलगी पवार साहेबांच्या राष्ट्रवादीत आहे. आत्राम यांनी आधी आपल्या मुलीला तुतारीतून फोडून दाखवावे आणि मग आमदार-खासदार फोडण्याच्या वार्ता कराव्या!, असे प्रत्युत्तर शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी केला.

# दीपकेंचे पंतप्रधान मोदींना पत्र

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-**देशभरात गाजत असलेल्या पेपर लीक प्रकरणावरून तरु णांमधील असंतोष आता आणखी तीव्र झाला आहे. २० जून रोजी ढिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर विद्यार्थ्यांच्या प्रस्तावित मोठ्या आंदोलनापूर्वी, कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एक सविस्तर पत्र लिहून थेट हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.




या पत्रात त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हकालपट्टीच्या मागणीचा पुनरु च्चार केला असून, पेपर लीकच्या तणावामुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १ कोटी रु पयांची मदत देण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधान मोदींना लिहिलेल्या पत्रात अभिजीत दीपके यांनी अत्यंत भावनिक आणि गंभीर मुद्यांकडे लक्ष वेधले आहे. ते म्हणाले, मी आज अत्यंत जड अंतःकरणाने तुम्हाला पत्र लिहीत आहे. आपल्या देशाचे भविष्य असलेल्या युवा विद्यार्थ्यांचे जीवन आणि मानसिक आरोग्य सध्या एका मोठ्या संकटामुळे धोक्यात आले आहे. (पान २ वर)

# 10 हून अधिक कर्मचारी असलेल्या संस्थांना पॉश ऑडिट बंधनकारक

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-** कामाच्या ठिकाणी महिलांचे शोषण रोखण्यासाठी आणि त्यांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाने देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देशांची नियमावली जारी केली. यामध्ये शासकीय आणि खासगी अशा दोन्ही क्षेत्रांतील कंपन्यांना दरवर्षी पाश कायद्याचे ऑडिट करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. नाशिक टीसीएस प्रकरणात पाश कायद्याचे पालन झाले नसल्याचे महिला आयोगाच्या अहवालात निर्देशनास आले होते. यानंतर हे पाउल ऊचलण्यात आले आहे. या निर्देशांचे पालन न केल्यास कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा महिला आयोगाने दिला. राष्ट्रीय



महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर म्हणाल्या की, कोणत्याही महिलेला तिची प्रतिष्ठा आणि ऊपजीविका यांपैकी एकाची निवड करावी लागू नये. प्रत्येक कामाची जागा सुरक्षित आणि आदराची असणे हा केवळ कायदा नसून, महिला सक्षमीकरणासाठी आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले. सरकारी विभाग, शैक्षणिक संस्था, हास्पिटल्स आणि खासगी कंपन्या जिथे १० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांना दरवर्षी पाश अंतर्गत अंतर्गत समिती स्थापन करावी लागेल. तसेच वार्षिक ऑडिटचा अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर करावा लागेल. ऑडिट न केल्यास ती गंभीर बेकायदेशीर बाब मानली जाईल.

**जिल्हाधिका-यांवर थेट जबाबदारी-** या कायद्याची तळागाळापर्यंत (पान २ वर)

# सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण

**जळगाव/ प्रतिनिधी-**इराण आणि अमेरिका युद्धात सोन्याचे दर सतत घसरताना दिसले. युद्धाला सुरु वात होताच दरांमध्ये चढ-ऊतार बघायला मिळाला. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून सोने आणि चांदीचे दर घसरत आहेत. त्यामध्येच आता मोठी घसरण सोन्याच्या दरात झाल्याचे बघायला मिळत आहे.

सोने त्याच्या ऊच्चांकापेक्षा सतत घसरताना दिसत आहे. आज सोने आणि चांदी दोन्हीच्या दरात मोठी घसरण नोंदवण्यात आली. जळगावच्या सराफ बाजारामध्ये सोने आणि चांदीच्या दरात विक्रमी घसरण नोंदवण्यात आली. सोन्याच्या दरात ४ हजार ६०० रु पयांनी तर चांदीचे दर तब्बल १५ हजार रु पयांनी घसरले. ही अत्यंत मोठी (पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अष्टपैलू शिक्षणतज्ज्ञ, अभ्यासू लोकप्रतिनिधी आणि विदर्भाचा बुलंद आवाजः

## प्रा. बी. टी. देशमुख यांचा संघर्षमय व दैदीप्यमान जीवनप्रवास

विदर्भाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय वर्तुळात अत्यंत आदराने आणि सन्मानाने घेतले जाणारे नाव, म्हणजेच माजी शिक्षक आमदार प्रा. बी. टी. देशमुख (लाडके बापूसाहेब). त्यांचे नुकतेच झालेले दुःखद निधन ही केवळ अमरावती किंवा विदर्भाचीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र राज्याची एक कधीही भरून न निघणारी हानी आहे. एका ध्येयवादी शिक्षकापासून ते सलग ३० वर्षे विधानपरिषदेत शिक्षकांचे आणि विदर्भाचे प्रतिनिधित्व करणारे एक झुंजार लोकप्रतिनिधी, असा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे.

सभागृहाचा सर्वोच्च तांत्रिक अभ्यास, कायद्याची अचूक जाण, आकडेवारीचा सखोल व्यासंग आणि वकिली थाटाची पण संयत मांडणी यांमुळे त्यांनी विधिमंडळात स्वतःचा एक वेगळाच दरारा निर्माण केला होता. 'सभागृहाचा चालता-बोलता नियमसंग्रह' अशी त्यांची ओळख होती. केवळ शिक्षकांचेच प्रश्न नव्हे, तर विदर्भाचा सिंचनाचा आणि विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठी त्यांनी रस्त्यापासून ते सभागृहापर्यंत दिलेला लढा महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णअक्षरांनी लिहिला गेला आहे. त्यांच्या या दुःखद निधनाप्रसंगी, त्यांच्या उत्तुंग आणि बहुआयामी कार्याचा घेतलेला हा विस्तृत आढावा.

**बालपण, शिक्षण आणि शिक्षकी पेशाची सुरुवात-**प्रा. बी. टी. देशमुख यांचा जन्म अत्यंत सामान्य कुटुंबात झाला. गरिबी आणि संघर्षाचे चटके सोसत त्यांनी आपले उच्च शिक्षण पूर्ण केले. विदर्भाच्या मातीशी त्यांची नाळ पहिल्यापासूनच घट्ट जोडलेली होती. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमरावती येथील नामांकित महाविद्यालयात इंग्रजी आणि अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. वर्गात शिकवत असताना बापूसाहेबांचा दृष्टिकोन केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरता मर्यादित नव्हता. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच, ज्या शिक्षण व्यवस्थेत आपण काम करतो, तिचे प्रश्न काय आहेत, हे त्यांनी अगदी जवळून अनुभवले. खाजगी संस्थाचालकांकडून शिक्षकांची होणारी पिळवणूक, वेळेवर न मिळणारे वेतन, सेवाशर्तींची अनिश्चितता आणि शैक्षणिक धोरणांमधील त्रुटी यांमुळे त्यांचे मन अस्वस्थ व्हायचे. येथूनच त्यांच्यातील लढाऊ कार्यकर्त्याचा जन्म झाला.

**शिक्षक चळवळीची उभारणी आणि न्यूटा ची स्थापना-**शिक्षकांना न्याय मिळवून द्यायचा असेल, तर संघटित ताकदीशिवाय पर्याय नाही, हे बापूसाहेबांनी ओळखले होते. त्यांनी विदर्भातील महाविद्यालयीन शिक्षकांना एकत्र आणून ' न्यूटा (Nagpur University Teachers' Association - NUTA) या संघटनेची पायाभरणी केली.

'संघटना ही केवळ मागण्या मागण्याचे साधन नसून, ती वैचारिक प्रबोधनाचे आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचे हक्काचे व्यासपीठ असायला हवे,' हा बापूसाहेबांचा ठाम विश्वास होता. त्यांच्या नेतृत्वाखाली 'न्यूटाने शिक्षकांच्या हक्कांसाठी अनेक ऐतिहासिक लढे दिले. विद्यापीठाच्या कायद्यांमध्ये सुधारणा घडवून आणणे, शिक्षकांना सन्मानजनक वेतनश्रेणी मिळवून देणे आणि त्यांच्या सेवा सुरक्षित करणे, यात बापूसाहेबांच्या अभ्यासू मार्गदर्शनाचा सिंहाचा वाटा होता. त्यांनी संघटनेला केवळ आंदोलनात्मक न ठेवता अभ्यासू बनवले. बापूसाहेब जेव्हा कुठलाही प्रश्न मांडायचे, तेव्हा त्यांच्याकडे कायद्याचे पुस्तक आणि अचूक आकडेवारी असायची. त्यामुळे शिक्षण विभाग किंवा विद्यापीठ प्रशासनाला त्यांच्या मागण्यांची दखल घ्यावीच लागायची.

**विधानपरिषदेतील सलग ३० वर्षांची दैदीप्यमान कारकीर्द-**प्रा. बी. टी. देशमुख यांच्यातील नेतृत्वगुण आणि अभ्यासूपणा पाहून विदर्भातील शिक्षक मतदारांनी त्यांच्यावर प्रचंड विश्वास टाकला. ते अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून सलग पाच वेळा, म्हणजेच तब्बल ३० वर्षे विधानपरिषदेवर निवडून गेले. महाराष्ट्राच्या संसदीय इतिहासात सलग ३० वर्षे एकाच मतदारसंघातून अपक्ष किंवा शिक्षक प्रतिनिधी म्हणून निवडून येणे ही एक अभूतपूर्व घटना आहे.

विधानपरिषदेत बापूसाहेब बोलायला उभे राहिले की, सत्ताधारी आणि विरोधक दोन्ही बाजूंचे आमदार शांततेत त्यांचे भाषण ऐकायचे. नियम ५७, नियम ९७ किंवा औचित्याचा मुद्दा असो, संसदीय कामकाजाच्या नियमांवर त्यांचे प्रचंड प्रभुत्व होते. अनेकदा तर पीठासीन अधिकाऱ्यांना (सभापतींना) देखील नियमांचा कीस पाडताना बापूसाहेबांचा सल्ला घ्यावा लागायचा.

**शिक्षकांच्या प्रश्नांची तड लावणारा नेता-** महाराष्ट्रातील विनाअनुदानित शाळा आणि महाविद्यालयांमधील शिक्षकांच्या वेतनाचा आणि अनुदानाचा प्रश्न बापूसाहेबांनी अत्यंत आक्रमकपणे लावून धरला. शिक्षकांना हक्काची पेन्शन



मिळावी, ग्रॅच्युइटीचे नियम सुटसुटीत व्हावेत, यासाठी त्यांनी अनेक खाजगी विधेयके आणली आणि सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडले. शिक्षण क्षेत्राचे व्यापारीकरण होऊ नये आणि गरीब, वंचित घटकातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी सभागृहात नेहमीच आवाज उठवला.

**विदर्भाच्या सिंचन आणि विकासाच्या अनुशेषाचा लढा-**प्रा. बी. टी. देशमुख हे जरी शिक्षक आमदार म्हणून निवडून आले असले, तरी त्यांचे कार्य केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते. ते विदर्भाचे खरे सुपुत्र होते. विदर्भावर होणाऱ्या आर्थिक आणि प्रादेशिक अन्यायाची त्यांना तीव्र जाणीव होती.

विदर्भाचा सिंचन आणि विकास कामांचा अनुशेष नेमका किती आहे, हे शोधण्यासाठी स्थापन झालेल्या विविध समित्यांच्या अहवालांचा बापूसाहेबांनी अक्षरशः कीस पाडला. दांडेकर समितीच्या अहवालाचा आधार घेऊन त्यांनी विदर्भाच्या सिंचनाचा अनुशेष हजारो कोटी रुपयांचा कसा आहे, हे राज्य सरकारच्या डोळ्यात अंजन घालून दाखवून दिले.

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावर प्रकाश टाकणाऱ्या 'केळकर समिती'च्या अहवालाच्या वेळीही बापूसाहेबांनी अत्यंत महत्त्वपूर्ण सूचना केल्या होत्या. विदर्भाला त्याच्या हक्काचे पाणी आणि निधी मिळालाच पाहिजे, या मागणीसाठी त्यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात अनेकदा सरकारला धारेवर धरले. त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणामुळे अनेकदा सरकारला विदर्भासाठी विशेष पॅकेज किंवा निधीची घोषणा करावी लागली होती.

**साधी राहणी आणि उच्च विचारसरणी-**

आजच्या काळात राजकारणाचा आणि लोकप्रतिनिधींचा स्तर घसरत चालला असल्याची टीका होत असताना, प्रा. बी. टी. देशमुख हे एका वेगळ्याच उंचीवरचे नेते होते. त्यांनी ३० वर्षे आमदारकी भूषवली, पण त्यांच्या राहणीमानात कधीही बदल झाला नाही. अमरावतीतील त्यांचे घर किंवा त्यांचे राहणे अत्यंत साधे होते. आमदार म्हणून मिळणाऱ्या भत्त्यांचा किंवा सुविधांचा त्यांनी कधीही स्वतःच्या स्वार्थासाठी वापर केला नाही.

आपल्या आमदार निधीचा एक-एक रुपया कुठे आणि कसा खर्च झाला, याचा हिशोब ते दरवर्षी पुस्तिकेच्या माध्यमातून जनतेसमोर मांडायचे. अशी पारदर्शकता ठेवणारे लोकप्रतिनिधी दुर्मिळच. राजकारणात राहूनही त्यांनी आपली नैतिक मूल्ये कधीही ढळू दिली नाहीत. कोणत्याही पक्षाचे सरकार असो, जे चुकीचे आहे त्याला चुकीचे आणि जे बरोबर आहे त्याला बरोबर म्हणण्याचे धैर्य त्यांच्यात होते.

**साहित्यिक, वैचारिक आणि पत्रकारितेतील योगदान-** बापूसाहेब हे केवळ उत्तम वक्ते नव्हते, तर ते एक कसलेले लेखक आणि अभ्यासकही होते. त्यांनी शिक्षण, अर्थशास्त्र आणि विदर्भाच्या प्रश्नांवर विपुल लेखन केले.

त्यांनी विदर्भाचा अनुशेष, शैक्षणिक कायदे आणि संसदीय कार्यपद्धती यांवर अत्यंत अभ्यासपूर्ण पुस्तके व पुस्तिका लिहिल्या, ज्या आजच्या संशोधकांसाठी मार्गदर्शक आहेत. शिक्षकांमध्ये वैचारिक जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी 'न्यूटा बुलेटीन'चे संपादन केले. याद्वारे शिक्षकांना कायद्याचे ज्ञान सोप्या भाषेत दिले गेले.

अनेक तरुण आमदार, प्राध्यापक आणि सामाजिक कार्यकर्त्यांना संसदीय लोकशाहीची पाळेमुळे समजावून सांगण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले.

**बापूसाहेबांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी-** प्रा. बी. टी. देशमुख यांचे जाणे ही महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एका सुवर्णयुगाचा अंत मानली पाहिजे. आज शिक्षण क्षेत्रासमोर अनेक नवीन आव्हाने आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (NEP) अंमलबजावणी होत असताना, शिक्षकी पेशाचे कंत्राटीकरण होत असताना, बापूसाहेबांसारख्या खंबीर आणि अभ्यासू नेतृत्वाची आज देशाला आणि राज्याला नितांत गरज होती. त्यांच्या जाण्याने शिक्षकांनी आपला हक्काचा 'वाघ' गमावला आहे. विदर्भाने आपला हक्काचा, आकडेवारीनिशी लढणारा 'कैवारी' गमावला आहे. महाराष्ट्र विधिमंडळाने आपला एक 'चालता-बोलता नियमसंग्रह' आणि मार्गदर्शक गमावला आहे.

प्रा. बी. टी. देशमुख यांचे जीवन हा एक आदर्श वस्तुपाठ आहे. सामान्य पार्श्वभूमी असलेला माणूस जर अभ्यासाची, निष्ठेची आणि प्रामाणिकपणाची कास धरून चालला, तर तो व्यवस्थेला झुकवू शकतो, हे बापूसाहेबांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले. त्यांनी आयुष्यभर पदाचा वापर स्वतःच्या मोठेपणासाठी केला नाही, तर ज्या समाजाने आणि शिक्षकांनी त्यांना मोठे केले, त्यांच्या ऋणाची परतफेड करण्यासाठी केला.

आज बापूसाहेब आपल्यात नाहीत, पण त्यांनी उभी केलेली शिक्षक चळवळ, त्यांनी दिलेले वैचारिक नेतृत्व आणि विदर्भाच्या हक्कासाठी त्यांनी पेटवलेली संघर्षाची मशाल कायम तेवत राहील. त्यांच्या पवित्र स्मृतीस आणि ऐतिहासिक कार्यास संपूर्ण महाराष्ट्राच्या वतीने कोटी कोटी प्रणाम आणि भावपूर्ण श्रद्धांजली!

**-डॉ. विलास नांदुरकर (जनसंपर्क अधिकारी,**
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ)

पान १ व १० वरून

## अयोध्येतून रामलल्लाचे हार,

**६० हून अधिक लोकांची चौकशी-** तपास यंत्रणांनी आतापर्यंत अनेक कर्मचारी, सेवाधारी आणि दान मोजणी प्रक्रियेशी संबंधित लोकांची चौकशी केली आहे. आतापर्यंत ६० हून अधिक लोकांची चौकशी झाली असल्याचे लोकांचे म्हणणे आहे. तथ्यांची पडताळणी करण्यासाठी काही लोकांची एकापेक्षा जास्त वेळा चौकशी करण्यात आली आहे.

**दोषीला सोडले जाणार नाही-** तपासादरम्यान काही डिजिटल पुरावे आणि सीसीटीव्ही रेक?र्डिंगचीही तपासणी सुरू झाल्यानंतर हे प्रकरण अधिक गंभीर मानले जात आहे. संपूर्ण घटनेमागील सत्य समोर आणण्यात तांत्रिक पुरावे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात असे अधिका-यांचे मत आहे. विरोधक या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीची मागणी करत असताना सरकारचे म्हणणे आहे की कोणत्याही दोषीला सोडले जाणार नाही आणि तपास पूर्ण पारदर्शकतेने पुढे जाईल. सध्या एसआयटीचा तपास सुरू असून अंतिम अहवालाची प्रतीक्षा आहे.

## 'टीईटी' परीक्षेत बुरखा,

असल्याचे सांगण्यात आलं आहे. मागील वर्षी घेतलेल्या परीक्षार्थीची नावे आणि छायाचित्रे यांची यंदाच्या परीक्षांमधील परीक्षार्थीसोबत पडताळणी केली जाणार आहे. त्यासोबत एक परीक्षार्थी आणि दोन वेगवेगळी छायाचित्रे किंवा एकच छायाचित्र आणि दोन वेगवेगळी नावे असलेल्या परीक्षार्थीची यादी आहे. तसेच एकाच परीक्षार्थीने वेगवेगळ्या परीक्षा केंद्रांवर अनेक अर्ज भरलेले आहेत. या परीक्षार्थीची यादी परीक्षेपूर्वीच पडताळणीसाठी उपलब्ध केली जाणार आहे. त्यामुळे परीक्षेपूर्वी, तसेच परीक्षेच्या वेळी येणा-या डमी विद्यार्थ्यांची ओळख तत्काळ करणे शक्य होणार आहे, असे राज्य परीक्षा परिषदेने स्पष्ट केले.

**परीक्षार्थीना काय सूचना-**परीक्षेला जाताना परीक्षार्थीनी आधार कार्ड, पॅनकार्ड, वाहन परवाना, मतदान कार्ड यापैकी एक छायाचित्र ओळखपत्राची मूळ प्रत सोबत ठेवणे आवश्यक असणार आहे. यंदा प्रथमच प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक पानावर युनिक नंबर आणि क्यूआर कोड असणार आहे. त्यामुळे प्रत्येक उमेदवाराची प्रश्नपत्रिका ही कोणत्याही टप्प्यावर ओळखणे सोपे होणार आहे. परीक्षेत प्रत्यक्षात सोडवलेल्या प्रश्नांची संख्या उत्तरपत्रिकेमध्ये अनिवार्यपणे नमूद करावी लागणार आहे. कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रानिक साहित्य नेण्यास सक्त मनाई असणार आहे. परीक्षा केंद्रामध्ये सीसीटीव्हीचा वापर अनिवार्य आहे, त्यामुळे चेहरा स्पष्टपणे दिसण्यासाठी दुपट्टा, बुरखा, मास्क, टोपी यापैकी काहीही घालता येणार नाही. परीक्षार्थीना दिलेल्या उत्तरपत्रिकांसोबत दोन कार्बन कॉपी असणार आहेत. एक परीक्षार्थीसाठी आणि दुसरी परीक्षा परिषदेची असणार आहे. दिव्यांग परीक्षार्थीना आता लेखनिक म्हणून कुटुंबातील सदस्य नेण्यास बंदी असणार आहे. दिव्यांग परीक्षार्थीस लेखनिक घ्यायचा असेल, तर प्राथमिक शिक्षणाधिका-यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असणार आहे.

## आता आमदार व नगरसेवकही

हा आकडा नाही, संस्कार आहे. निष्ठा आहे. संघर्षाचा आधार आहे. १९८६ मध्ये मी शिवसेनेत आलो. मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी लढणारी संघटना म्हणून शिवसेनेचं काम सुरू केलं. आज आठवतंय, त्या ६० वर्षाची फलश्रुती म्हणून गर्दी दिसत आहे. यात शिवसैनिक दिसत आहेत. ४०-४० वर्ष काम करणारे शिवसैनिक आणि नवे शिवसैनिक आहेत. त्यावेळी सत्ता नव्हती, पैसा नव्हता, वाहनं नव्हती, फक्त एकच विश्वास होता मराठी माणसांवर होणारा अन्याय आणि हिंदूवर होणारा अन्याय आणि हिंदुत्वाचं रक्षण करण्यासाठी संघटनेच्या विचाराच्या भरवश्यावर काम सुरू झाले.'यांच स्वप्न साकार होणार नाही. मी तुम्हाला एक सांगतो सहा खासदारांचं मला माहित नाही. पण, यांचं पोरग माझ्या पोराच्या वयाचं आहे. ते म्हणायला लागलं की ती लोक पैशाच्या भरवशावर फुटले. अरे सोन्या तुमचे बापजादे मुख्यमंत्री होते. तेव्हा तुम्ही मंत्री होते.तेव्हा गल्लोगल्ली फिरले असते, आमदारांची नाराजी काढली असती तर ही वेळ आली नसती. आता बघा माजी मुख्यमंत्र्यांचा मुलगा गावागावात जातो, हेच जर काम तुम्ही केले असते तर हे दिवस आले नसते, असा टोलाही गुलाबराव पाटील यांनी लगावला. 'हा तर छोटाचा झटका आहे, विधानसभेचा अजून फटका आहे आणि महापालिकेचा मोठा चटका आहे, असा इशारा पाटील यांनी यावेळी दिला.

## दीपकेंचे पंतप्रधान मोदींना

गेल्या काही आठवड्यांत पेपर लीक आणि परीक्षांमधील अनिश्चिततेमुळे ११ विद्यार्थ्यांनी आपले जीवन संपवले आहे, ज्यापैकी ५ आत्महत्या तर गेल्या ४८ तासांत झाल्या आहेत. पुन्हा परीक्षा द्यावी लागणार की नाही, या अनिश्चिततेमुळे विद्यार्थ्यांमधील मानसिक ताण कमालीचा वाढला आहे.

**बाधित कुटुंबांना आर्थिक मदत द्या-**अनेक मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांनी आपल्या मुलांच्या उच्च शिक्षणाची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी बँकांकडून मोठी शैक्षणिक कर्जे घेतली होती. काहींनी आपल्या आयुष्याची संपूर्ण पुंजी मुलांच्या अभ्यासावर खर्च केली. अशा परिस्थितीत मुलांचा मृत्यू झाल्याने ही सर्व कुटुंबं पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने या सर्व प्रभावित कुटुंबांना तातडीने १ कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी दीपके यांनी केली आहे.

**शिक्षणमंत्र्यांना हटवा-** अभिजीत दीपके यांनी पत्रात म्हटले आहे की, कॉक्रोच जनता पार्टी गेल्या महिनाभरापासून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत देशभरात आंदोलने करत आहे. शिक्षण व्यवस्थेवरील लाखो विद्यार्थी आणि पालकांचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी नेतृत्वाला जबाबदार धरणे आवश्यक आहे. कारवाई न केल्यास प्रशासन सध्याच्या भ्रष्ट स्थितीला स्वीकारत असल्याचा चुकीचा संदेश जाईल. शिक्षणमंत्र्यांना पदावरू न हटवल्यास सरकार कमकुवत दिसणार नाही, उलट उत्तरदायित्वाप्रती सरकारची कटिबद्धता दिसून येईल आणि सरकारची प्रतिमा सुधारेल, असा युक्तिवाद त्यांनी पत्रात केला आहे.

**२० जूनला जंतर-मंतरवर जमणार-** यापूर्वी ६ जून रोजी अभिजीत दीपके यांच्या आवाहनावर शेकडो विद्यार्थी आणि तरु ण व्यावसायिक दिल्लीत एकत्र आले होते. त्यानंतर या संघटनेने विविध शहरांमध्ये मोहीम राबवून शिक्षणमंर्त्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. आता २० जून रोजी देशभरातून विद्यार्थी जंतर-मंतरवर आपल्या मागण्यांसाठी पुन्हा एकत्र येत असून, सरकार भारताच्या भविष्याचा आवाज नक्कीच ऐकेल, अशी आशा त्यांनी पत्राच्या शेवटी व्यक्त केली आहे.

## 10 हून अधिक कर्मचारी असलेल्या

अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा अधिकारी नियुक्त केले जातील. जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांच्यावर कायद्याच्या अंमलबजावणीची थेट जबाबदारी असेल.

**असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी स्थानिक समित्या**

घरकाम करणा-या महिला, लहान दुकानांमधील कर्मचारी किंवा जेथे १० पेक्षा कमी कर्मचारी आहेत अशा असंघटित क्षेत्रातील महिलांच्या तक्रारींसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक समित्या सक्षम केल्या जातील. तालुका आणि प्रभागाच्या पातळीवर यासाठी विशेष नोडल अधिकारी असतील.

**डिजिटल डॅशबोर्ड आणि शी-बाक्स-**राज्य स्तरावर या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र पाश मानिटरिंग सेल किंवा डिजिटल डॅशबोर्ड तयार केला जाईल. तसेच केंद्र सरकारच्या ऑनलाइन शी-बाक्स प्रणालीचा वापर वाढवण्याचे निर्देश दिले आहेत.

**तक्रार करणा-या महिलेला संरक्षण-** तक्रारदार महिला, साक्षीदार किंवा समिती सदस्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास, भेदभाव किंवा सूडबुद्धीने बदली सामोरी जावे लागणार नाही, याची काळजी घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रावर विशेष लक्ष-**विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, हास्टेल्स, कोचिंग क्लासेस तसेच हास्पिटल्समधील महिला कर्मचारी, विद्यार्थिनी, इंटर्न्स आणि कंत्राटी कामगार अधिक संवेदनशील घटकात येतात. त्यामुळे या सर्व ठिकाणी पॉश कायद्याचे नियम पाळले जात आहेत की नाही, यावर जिल्हा प्रशासन विशेष लक्ष ठेवणार आहे. कामाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, पुरेशी प्रकाश व्यवस्था आणि आपत्कालीन मदत यंत्रणा उभारून महिलांसाठी झिरो टॉलरन्स (अन्यायाविरुद्ध शून्य सहनशीलता) धोरण राबवण्याचे कडक आवाहन महिला आयोगाने सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना आणि पोलीस महासंचालकांना केले आहे.

## सोने-चांदीच्या दरात

घसरण म्हणावी लागणार आहे. सोन्याचा दर जीएसटीसह १ लाख ४८ हजार ९४८ रु पये झाला तर चांदीचा दर जीएसटीसह २ लाख ३८ हजार ९६० रु पये झाला. आज लोक मोठ्या संख्येने सोने खरेदी करण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. सोन्याच्या दरात सतत घसरण नोंदवली जात आहे. इराण आणि अमेरिका युद्ध थांबल्यानंतर सोन्याचे दर वाढतील असा एक अंदाज होता. प्रत्यक्षात उलटे घडत आहे. इराण आणि अमेरिका युद्ध थांबल्यानंतरही सोन्याचे दर घसरताना दिसत आहेत. त्यामध्येच आज विक्रमी घसरण नोंदवण्यात आली. आज भारतीय सराफा बाजारात तेजी येउ शकते. कारण लोक मोठ्या संख्येने आज सोन्याची खरेदी करू शकतात. गेल्या काही महिन्यांच्या तुलनेत सोने चांगलेच घसरले आहे.

## मनपा पशुवैद्यकीय अधिकारी

वाहनाचा वापर न करता तक्रारदाराच्या दुचाकीवर बसून जात असताना सचिन बोंद्रे यांना संशय आला. त्यामुळे त्यांनी लाचेची रक्कम न स्वीकारताच तक्रारदाराच्या दुचाकीवरून उतरून शासकीय वाहन बोलावून तेथून ते निघून गेले होते.तरी त्यांनी लाचेची मागणी केल्याचे चौकशीत पूर्णपणे सिद्ध झाले होते. त्यानुसार एसीबीच्या पथकाने मंगळवारी रात्री त्यांच्या राहत्या घरातून त्यांना ताब्यात घेतले होते. या कार्यवाही नंतर अखेर मनपा आयुक्तांनी त्यांना निलंबित केले आहे.

## महान शिक्षक व निष्कांचन

म्हणजे सरांचे जगणे होते. विदर्भाच्या मागास भागाला समृद्धतेचे बळ मिळावे, त्यांनी विदर्भ अनुशेषाचा संघर्ष सुरू केला. देशाचे लक्ष वेधले. विकासाच्या आठ निर्देशांकांत विदर्भाला स्थान मिळवून देणारी चिवट लढाई त्यांनी लढली. नितीनजी गडकरी, मा. देवेंद्रजी फडणवीस हेही या संघर्षात त्यांच्या सोबत होते. वैधानिक विदर्भ विकास मंडळाची निर्मिती ही बीटीसरांची देण आहे. नागपूर-मुंबई विदर्भ एक्सप्रेस असावी ही त्यांचीच संकल्पना. या बाणेदार नेत्याने दुष्काळी अमरावती जिल्ह्याला पाणी मिळवून दिले. विदर्भाला संतुलित विकासाच्या प्रवाहात आणले. त्यांचे जाणे विकासाच्या निर्मळ विचाराला मुकणे आहे. मी अमरावतीचा पालकमंत्री म्हणून या महान शिक्षक व निष्कांचन लोकप्रतिनिधीला श्रद्धांजली अर्पण करतो.

## विदर्भाचे बुलंद वैचारिक नेतृत्व

देवो, हीच प्रार्थना.'

**सतत लढणारा लढवय्या हरपला - प्रविण पोटे**

विदर्भाच्या विकासातील अनुशेष दूर करण्यासाठी आयुष्यभर झटणारे, अमरावतीचे माजी आमदार, ज्येष्ठ समाजसेवक तसेच लाडके नेते बी. टी. उर्फ भाऊराव देशमुख यांचे आज दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने विदर्भातील सामाजिक व राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपल्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनात समाजहित, जनकल्याण आणि सर्वसमावेशक विकासासाठी उल्लेखनीय योगदान दिले. विशेषतः विदर्भातील अनुशेषाच्या प्रश्नावर त्यांनी सातत्याने आवाज उठवला. विधानमंडळात त्यांनी या विषयावर सखोल अभ्यासपूर्ण आणि विवेचक चर्चा घडवून आणत अनेक प्रश्न प्रभावीपणे मांडले व त्यांच्या निराकरणासाठी प्रयत्न केले. एक संवेदनशील लोकनेता, अभ्यासू विधिमंडळ सदस्य आणि समाजासाठी झटणारा कार्यकर्ता म्हणून प्रा. बी. टी. देशमुख यांची ओळख कायम स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने विदर्भाने एक खंबीर, प्रामाणिक आणि लढवय्या नेतृत्व गमावले आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली.

## विदर्भाने एक अभ्यासू

त्यासाठी संघर्ष केला. त्यांच्या विचारांची खोली, समाजाविषयीची तळमळ आणि विदर्भाच्या विकासासाठीची त्यांची अखंड बांधिलकी पुढील पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील.

प्रा. डॉ. बी. टी. देशमुख यांच्या निधनाने विदर्भाच्या वैचारिक आणि सामाजिक नेतृत्वात निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना तसेच असंख्य विद्यार्थ्यांना, सहकाऱ्यांना व अनुयायांना हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली.'

**-ॲड. यशोमती ठाकूर, माजी मंत्री**

## अंजनगाव सुर्जी बाजार

आले असून, सध्या ते जामिनावर बाहेर आहेत.आरोपी रवि उपाध्ये हे अंजनगाव सुर्जी कृषी उत्पन्न बाजार समितीचे निवडून आलेले संचालक आहेत. नैतिक अधःपतनाच्या गुन्ह्यात अटक झाल्याने त्यांच्या पदावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन अधिनियम १९६३ नुसार, नैतिक अधःपतनाच्या गुन्ह्यात दोषी ठरल्यास संचालक अपात्र ठरतो. त्यामुळे पणन संचालकांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन कलम ४५ अन्वये चौकशी करून निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी बाजार समिती सदस्य, शेतकरी व नागरिकांमधून होत आहे. नातेवाईकांच्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन वडिलोपार्जित संपत्ती हडपण्याचा प्रयत्न झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पुढील कारवाई काय होणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## दस्तुरनगर परिसरात थकबाकीदार

असून त्यांना जप्ती नोटीस देण्यात आली.तसेच मालमत्ता क्रमांक ९३८ चे धारक किचन ३६५चे महेश पहुमल छाबडा यांच्याकडेही ९ लाख रुपयांची थकबाकी असल्याने त्यांनाही नोटीस बजावण्यात आली. याशिवाय एमआयडीसी परिसरातील मालमत्ता क्रमांक २२५५-३ चे धारक जाधव ग्रुप यांच्याकडे ५ लाख ५५ हजार रुपयांची थकबाकी असल्याने संबंधित मालमत्तेस जप्ती नोटीस देण्यात आली. ही कारवाई सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी शेखर सोनकांबळे, वसुली लिपीक दीपक सरसे, राज डेंडुले तसेच भागिरथ खैरकर उपस्थित होते. महानगरपालिकेने थकीत मालमत्ता कर त्वरित भरावा, अन्यथा जप्ती व पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा थकबाकीदारांना दिला आहे.

## 'एक पृथ्वी – एक आरोग्य'

आयोजनासाठी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा अंतर्गत शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचारी सहकार्य करीत आहेत. सदर योग कार्यक्रमामध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक, गावातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनाचा संकल्प करावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## एमडी ड्रग्जसह युवक

सांगितले. आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडून १८.८ ग्रॅम एमडी ड्रग्ज (किंमत ९४ हजार रुपये), एमएच-२७-सीएफ-११५५ क्रमांकाची मोपेड (किंमत ५० हजार रुपये) आणि २ हजार २०० रुपये रोख रक्कम असा एकूण १ लाख ४६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. घटनास्थळी उपस्थित फॉरेन्सिक पथकाने प्राथमिक तपासणीदरम्यान जप्त पदार्थ एमडी असल्याचे नमूद केले. याप्रकरणी उपनिरीक्षक जितेंद्र भार्गव यांच्या फिर्यादीवरून नागपुरी गेट पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(सी) व २१(बी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त शाम घुघे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, पोलीस निरीक्षक जनार्धन साळुंखे, उपनिरीक्षक जितेंद्र भार्गव, डीबी पथक प्रमुख मलिक अहमद यांच्या नेतृत्वाखाली पथकाने केली.

## अमरावती एनएसयुआयच्या शहराध्यक्षपदी

यामध्ये गेल्या चार वर्षांपासून एन.एस.यु .आय . मध्ये सदस्य म्हणून सक्रिय असणारा व विद्यार्थी संघटन बांधण्यात हातखंडा असणारा स्वराज पोटे यांचे नाव अग्रेसर ठरले. यासाठी स्वराज पोटे यांनी संघटन सृजन मध्ये केलेले प्रयत्न सुद्धा सार्थकी लागले.

स्वराज पोटे यांनी त्यांच्या या निवडीचे श्रेय माजी पालकमंत्री यशोमती ठाकूर,माजी पालकमंत्री सुनील देशमुख,खा . बळवंत वानखडे,अमरावती शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलू शेखावत,मनपा विरोधीपक्ष नेते विलास इंगोले,माजी महापौर मिलिंद चिमोटे,प्रदेश उपाध्यक्ष भय्याजी पवार,एन.एस.यु.आय.प्रदेश उपाध्यक्ष संकेत कुलट, जिल्हाध्यक्ष सर्वेश खांडे व मार्गदर्शक निलेश गुहे यांना दिले आहे.सदर नियुक्तीचे पत्र राष्ट्रीय अध्यक्ष विनोद जाखर व प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे यांच्या वतीने स्वराज पोटे यांना प्रदान करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष स्वराज पोटे यांनी स्पष्ट केले की,शहर एन.एस.यू.आय.च्या विविध पदांवर गेल्या अनेक वर्षांपासून निष्क्रिय असलेले काही पदाधिकारी कायम आहेत. अशा निष्क्रिय पदाधिकाऱ्यांची लवकरच हकालपट्टी करून संघटनेत नव्या आणि कार्यक्षम नेतृत्वाला संधी दिली जाईल. तसेच शहरातील प्रत्येक महाविद्यालय, विद्यापीठ आणि शैक्षणिक परिसरात एन.एस.यू.आय.चे संघटन बळकट करत व्यापक सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येईल.या माध्यमातून युवक व विद्यार्थ्यांना सोबत घेऊन एक सक्षम,सक्रिय आणि लढाऊ नवी एन.एस.यू.आय. टीम उभारण्यात येईल,असे आश्वासन त्यांनी दिले.

सदर नियुक्ती बाबत स्वराज पोटे यांचे अभिषेक वर्धन सिंह, नितीन काळे , राहुल येवले , अनिकेत ढेगळे , वैभव देशमुख , स्वप्निल साव , रोशन पिटेकर, आदित्य गडेकर, वैभव भोरे,निलेश नांदने, वेदांत केने, अजिंक्य धावणे , अभिनव गावनेर, श्रुतिका कुलट , अक्षिता तायडे, वेदांत साखरे , उमेर भाई यांच्या तर्फे अभिनंदन करण्यात आले.

## 'वाचाल तर वाचाल' की ग्रंथालय

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील अनेक ग्रंथालये महिनोनमहिने बंद असतानाही त्यांना नियमित अनुदान वितरित करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, काही प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष पाहणी न करताच कागदोपत्री अहवालांच्या आधारे बिले मंजूर केल्याचे आरोप पुढे येत आहेत.

या प्रकारामुळे जिल्हा ग्रंथालय अधिकारी आणि संबंधित यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाचन संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ग्रंथालय संघटनांनीही या प्रकाराकडे मौन बाळगल्याने संशय अधिकच गडद झाला आहे. 'ग्रंथालये जनतेसाठी की केवळ अनुदानासाठी?' असा संतप्त सवाल आता नागरिक उपस्थित करीत आहेत.हा प्रकार थांबवण्यासाठी प्रत्येक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांसाठी बायोमेट्रिक (थंब) आणि आयरिस स्कॅनरद्वारे हजेरी अनिवार्य करण्याची मागणी पुढे येत आहे. तसेच सर्व ग्रंथालये पूर्णवेळ सुरू ठेवून तेथे दर्जेदार पुस्तके, स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक साहित्य आणि वाचनासाठी अनुकूल वातावरण उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त होत आहे.

जिल्ह्यातील सर्व अनुदानित ग्रंथालयांची उच्चस्तरीय चौकशी करून प्रत्यक्ष स्थितीची पडताळणी करण्यात यावी, दोषी ग्रंथालयांचे अनुदान तत्काळ स्थगित करावे आणि गैरप्रकारात सहभागी अधिकारी व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा 'वाचाल तर वाचाल' हा संदेश केवळ फलकांपुरताच मर्यादित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, २० जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## प्रकल्पग्रस्त विशेष भरती आंदोलनाला यश २९ जूनला नियुक्ती आदेश देण्याचे आश्वासन

### आ. साजिद खान यांच्या मध्यस्थीने प्रशासन-आंदोलनकर्त्यांत तोडगा

■ प्रतिनिधी | अकोला ■

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील प्रकल्पग्रस्त विशेष भरती प्रक्रियेला गती मिळावी, या मागणीसाठी सुरू असलेल्या बेमुदत आंदोलनाला अखेर यश आले आहे. आमदार साजिद खान यांच्या हस्तक्षेपानंतर विद्यापीठ प्रशासनाने २९ जून रोजी होणाऱ्या बैठकीत पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याने चार दिवसांपासून सुरू असलेले आंदोलन मागे घेण्यात आले.



महाराष्ट्र शासनाच्या १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात प्रकल्पग्रस्त विशेष भरती अंतर्गत गट 'क' व गट 'ड' संवर्गातील विविध पदांसाठी फेब्रुवारी २०२५ मध्ये जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. भरती प्रक्रियेअंतर्गत शारीरिक, व्यावसायिक तसेच ऑनलाइन परीक्षा घेऊन निकालही जाहीर करण्यात आला. उमेदवारांच्या शैक्षणिक कागदपत्रांची व प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रांची पडताळणी पूर्ण झाली. जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनीही पडताळणी अहवाल विद्यापीठाला सादर केला होता.

मात्र सर्व प्रक्रिया पूर्ण होऊनही पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश न मिळाल्याने प्रकल्पग्रस्त उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी होती. अनेकदा पाठपुरावा करूनही ठोस निर्णय होत नसल्याने उमेदवारांनी १६ जूनपासून विद्यापीठ परिसरात बेमुदत आंदोलन सुरू केले होते. आंदोलनाच्या पहिल्या चार दिवसांत प्रशासनाने दखल घेतली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. दरम्यान, शुक्रवारी आमदार साजिद खान यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांची बाजू जाणून घेतली. त्यांनी तातडीने विद्यापीठाच्या कुलसचिव प्रीती रोडगे तसेच निवड समितीचे अध्यक्ष श्यामसुंदर माने यांच्याशी संपर्क साधून चर्चा केली. आंदोलनस्थळीच झालेल्या चर्चेनंतर २९ जून रोजी होणाऱ्या बैठकीत नियुक्ती आदेश देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. आमदार साजिद खान यांनी या प्रश्नात पुढाकार घेत प्रशासन व आंदोलनकर्त्यांमध्ये समन्वय साधत यशस्वी तोडगा काढल्याने आंदोलनकर्त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच नियुक्ती प्रक्रियेला विलंब न लावता २९ जूनच्या बैठकीत आश्वासनाची पूर्तता होईल, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

आंदोलनकर्त्यांनी आमदार साजिद खान यांच्यासह आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना आणि सहकाऱ्यांचे आभार मानले. प्रलंबित भरती प्रक्रिया अखेर मार्गी लागण्याची चिन्हे दिसत असल्याने प्रकल्पग्रस्त उमेदवारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## अट्टल मोटारसायकल चोर स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात; ४ दुचाकींसह आरोपी अटकेत

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम जिल्ह्यात मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेने एका अट्टल वाहनचोराला अटक करून त्याच्याकडून चोरीच्या चार मोटारसायकली जप्त केल्या आहेत. जप्त वाहनांची एकूण किंमत सुमारे १ लाख ९५ हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

वाशिम शहर पोलीस ठाण्यात श्रीकांत मदनलाल दंबीवाल (वय ४५, रा. वाशिम) यांनी त्यांच्या घरासमोर उभी असलेली एमएच-३७ एएल-३३४७ क्रमांकाची हिरो सिटी डिलक्स मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानुसार वाशिम शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९७३/२०२५, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा नोंद करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांना गुप्त माहिती मिळाली की, चोरीस गेलेली मोटारसायकल धुमका (ता. जि. वाशिम) येथील एका व्यक्तीने चोरून नेली आहे. माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक निलेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करून धुमका परिसरात शोधमोहीम राबविण्यात आली. पथकाने १८ जून २०२६ रोजी संशयित आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने मोटारसायकल चोरीची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीस गेलेली हिरो सिटी



डिलक्स मोटारसायकल जप्त करण्यात आली. पुढील चौकशीत आरोपीने वाशिम शहर व मालेगाव परिसरातून आणखी मोटारसायकली चोरल्याची कबुली दिली. आरोपी उमेश किशन राठोड (वय ४५, रा. धुमका, ता. जि. वाशिम) याच्याकडून विविध गुन्ह्यांतील एकूण चार मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. जप्त वाहनांची किंमत सुमारे १ लाख ९५ हजार रुपये आहे. आरोपीला पुढील कारवाईसाठी वाशिम शहर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे. तसेच जिल्ह्यात चोरीस गेलेल्या आणखी काही मोटारसायकलींचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल, पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, पोलीस निरीक्षक नयना पोहेकर, पोलीस उपनिरीक्षक निलेश जाधव तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

## रसिका गोसावी सी ए च्या परिक्षेत उत्तीर्ण



**अकोला :** स्थानिक व्यावसायिक श्रीपाद गोसावी यांची कन्या रसिका गोसावी हिने सनदी लेखापाल(चार्टर्ड अकाउंटंट) च्या परीक्षेत उत्तम प्रकारे यश मिळवले आहे. हे यश तीनेपहिल्याच प्रयत्नात प्राप्त केले आहे. बालशिवाजी शाळेची विद्यार्थिनी असलेल्या रसिकाने माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षांमध्ये सुद्धा प्राविण्य श्रेणी प्राप्त केली होती. ती आपल्या यशाचे श्रेय आईवडील व गुरुजनांना देते.


## कारंजा भूमी अभिलेख कार्यालयातील अनागोंदी पुन्हा चर्चेत

### प्रथम अपील प्रकरणात विलंब, माहिती दडविण्याचा आरोप

■ प्रतिनिधी | कारंजा ■

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या प्रथम अपीलाचा कायद्यानुसार विहित मुदतीत निपटारा न झाल्याने उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, कारंजा लाड येथील प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याचबरोबर कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत असलेली अनियमितता, कार्यालयीन शिस्तीचा अभाव आणि नागरिकांना सहन करावा लागणारा मनस्ताप यामुळे संबंधित कार्यालय पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अर्जदाराने माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत मागविलेली माहिती निर्धारित कालावधीत



उपलब्ध न झाल्याने कायद्यातील तरतुदींनुसार प्रथम अपील दाखल केले होते. माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९(६) नुसार प्रथम अपीलीय अधिकाऱ्याने अपील प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत निर्णय देणे बंधनकारक आहे. अपवादात्मक परिस्थितीत कारणे लेखी स्वरूपात नमूद करून हा कालावधी जास्तीत जास्त ४५ दिवसांपर्यंत वाढविता येतो. मात्र संबंधित प्रकरणात विहित मुदत उलटून गेल्यानंतरही अपीलावर कोणतेही निकालपत्र अथवा लेखी आदेश देण्यात आले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.


विशेष म्हणजे अर्जदाराने मागविलेली माहिती ही वर्ग-दोन जमिनी वर्ग-एकमध्ये करण्याच्या प्रक्रियेशी संबंधित असल्याचे समोर आले आहे. संबंधित प्रक्रियेमध्ये नियमांचे पालन करण्यात आले की नाही, तसेच प्रशासकीय स्तरावर कोणती कार्यपद्धती अवलंबण्यात आली यासंबंधीची माहिती मागविण्यात आली होती. या माहितीमुळे वर्ग-दोन जमिनी वर्ग-एकमध्ये रूपांतरित करण्याच्या कार्यपद्धतीतील संभाव्य त्रुटी, अनियमितता किंवा आर्थिक गैरव्यवहार उघडकीस येण्याची शक्यता असल्यानेच माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात असल्याची साशंकता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे माहिती न देण्यामागे केवळ प्रशासकीय दिरंगाई आहे की काही बाबी लपविण्याचा प्रयत्न केला जात आहे, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

प्रथम अपीलाचा निर्णय न मिळाल्यामुळे अर्जदाराने कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता काही धक्कादायक बाबी समोर आल्याचे सांगितले जाते. शुक्रवारी कार्यालयीन वेळेत उपअधीक्षक विनोद जाधव हे कार्यालयात उपस्थित नसल्याचे आढळून आले. विशेष म्हणजे त्यांच्या अनुपस्थितीत कार्यालयाचा कार्यभार सांभाळणारे प्रभारी मुख्यालय सहाय्यक देखील कार्यालयात हजर नसल्याचे समोर आले.

## संगीतमय सुंदरकांड कार्यक्रमाला भक्तांचा प्रतिसाद

**वाशीम :** स्थानिक सिव्हिल लाईन येते सरनाईक परिवाराच्या प्रांगणात गायत्री सत्संग मंडळाच्या वतीने गायक श्रीराम करवा व समूहाच्या द्वारे आयोजित श्रीरामचरितमानस संपूर्ण संगीतमय सुंदरकांड पठन कार्यक्रमाला भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.. स्थानिक शिक्षक आमदार ॲड. किरण सरनाईक यांच्या निवासस्थानी मंगळवार १६ जून रोजी प्रांगणात आयोजित कार्यक्रमांमध्ये ३६ सुपरहिट भजनाच्या चालीवर संपूर्ण सुंदरकांड सामूहिक पठण करण्यात आले. यावेळी आयोजक शिक्षक आमदार ॲड. किरण सरनाईक, अनिता सरनाईक , डॉ. स्नेहदीप सरनाईक, देवयानी सरनाईक, अरुणराव सरनाईक, मंजुषा सरनाईक समवेत परिवारातील सदस्य , मित्रगण, सुंदरकांड लाखाला भजनी महिला मंडळ सदस्यगण, सुंदरकांड भजन मंडळ सदस्य गण उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी हॅपी फेसेसमध्ये ऑनलाईन शिकवणी वर्गाला सुरुवात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

विदर्भात जून महिन्यातही उष्णतेची तीव्रता कायम असल्याने राज्य शासनाने शाळांच्या नियमित वर्गांना ३० जूनपासून सुरुवात करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि नव्या शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रम वेळेत पूर्ण व्हावा यासाठी वाशीम येथील हॅपी फेसेस द कॉन्सेप्ट स्कूलने अभिनव उपक्रम हाती घेत ऑनलाईन शिकवणी वर्गांना प्रारंभ केला आहे. या उपक्रमाला विद्यार्थी आणि पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

सीबीएसई संलग्न हॅपी फेसेस द कॉन्सेप्ट स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी अध्यापन प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. शाळा प्रत्यक्ष सुरू होण्यास अद्याप काही दिवसांचा अवधी असला तरी विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा वेग खंडित होऊ नये यासाठी शाळेचे संचालक दिलीप हेडा यांच्या संकल्पनेतून ऑनलाईन शिकवणी वर्गाचे नियोजन करण्यात आले आहे.

## मेडशी येथे क्षयरोग तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; ९२ संशयितांची एक्स-रे तपासणी



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र मेडशी येथे संशयित क्षयरुग्णांसाठी विशेष एक्स-रे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण ९२ संशयित रुग्णांची एक्स-रे तपासणी करण्यात आली.

हे शिबिर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. परभणकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. खासबागे तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी संशयित रुग्णांची एक्स-रे तपासणी केली.

शिबिरादरम्यान ७० संशयित रुग्णांचे थुंकी (स्पुटम) नमुने संकलित करण्यात आले. तसेच कृष्णा डायग्नोस्टिकचे प्रवीण राऊत यांनी सिटीस्कॅन तपासणीबाबत मार्गदर्शन करून नागरिकांच्या शंकांचे निरसन केले.

यावेळी गजानन शिंदे, ताई जाटे, वंदना चव्हाण, प्रभात ढोबळे, रामकृष्ण फड, उदेभान राठोड, अनिस कुरेशी, प्रशांत तूरक, गणेश राऊत, सहदेव तायडे तसेच आशा कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

शिबिराचे नियोजन जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी केले. यावेळी उपस्थितांना क्षयरोग व डेंग्यू प्रतिबंध, लक्षणे आणि उपचार याबाबत सविस्तर आरोग्य शिक्षण देण्यात आले. या उपक्रमामुळे क्षयरोगाच्या लवकर निदानास चालना मिळून रोग नियंत्रणासाठी महत्त्वाची मदत होणार असल्याचा विश्वास आरोग्य विभागाने व्यक्त केला.

## श्री सालासर सुंदरकांड महिला मंडळाची श्री बालाजी चरणी ५६ भोग प्रसाद व भक्ती गीत सेवा अर्पण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक लाखाला येथील श्री सालासर सुंदरकांड महिला भजनी मंडळाच्या वतीने पुरुषोत्तम मास (अधिक मास) निमित्त भगवान पुरुषोत्तम मास तपस्या पर्व स्थानिक वाशिम चे आराध्य दैवत श्री बालासाहेब मंदिरामध्ये मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला. या पवित्र महिन्यात जप, तप, ध्यान, साधना, नामस्मरण, दीपदान, गौमाता पूजन, ब्राह्मण भोजन, पवित्र नद्यांमध्ये स्नान तसेच विविध धार्मिक ग्रंथांचे वाचन-पठण यांना विशेष महत्त्व आहे. या निमित्ताने श्री बालाजी मंदिर परिसरात भजन संध्या, हनुमान चालीसा पाठ, राम-राम माला जप



व ५६ छप्पनभोग महाप्रसादाचे भव्य आयोजन पार पडले.श्री सालासर सुंदरकांड महिला मंडळ लाखाळा तसेच सोमानी परिवार, वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात हजारो भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला. मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित महिलांनी भाविकांना प्रसादाचे वाटप करून सेवाकार्यात सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे आयोजन श्री बालाजी संस्थांचे विश्वस्त वहिवाटदार ॲड. भवानीपंत काळू यांच्या सहकार्याने करण्यात आले. श्री सालासर हनुमानजी सुंदरकांड ग्रुप लाखाळा यांच्या सेवाभावी कार्यकर्त्या व मार्गदर्शक सौ. सुशीला भगवानदास मंत्री आणि कांता सत्यनारायणजी सोमानी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

## खिर्डा येथे लोकवर्गणीतून माता रमाबाई आंबेडकर यांची मूर्ती साकार; महिलांच्या सहभागातून प्रेरणादायी उपक्रम

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव तालुक्यातील खिर्डा येथील त्रिरत्न बुद्ध विहार परिसरात रमाबाई महिला मंडळाच्या पुढाकारातून आणि ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांची सुंदर मूर्ती साकारण्यात आली. या उपक्रमात गावातील महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत सामाजिक ऐक्य आणि महिला सक्षमीकरणाचा आदर्श निर्माण केला.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात माता रमाबाई आंबेडकर यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या त्यागमय, संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनाचा आदर्श समाजासमोर ठेवण्याच्या उद्देशाने ही मूर्ती उभारण्यात आली असल्याचे महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.या कार्यासाठी गावातील महिलांनी लोकवर्गणी गोळा करून आर्थिक योगदान दिले. मूर्ती उभारणीपासून ते कार्यक्रमाच्या नियोजनापर्यंत सर्वच कामांमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग राहिला. त्यामुळे हा उपक्रम महिला एकजुटीचे आणि सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरला आहे. मूर्ती अनावरण प्रसंगी उपस्थितांनी माता रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनकार्याला अभिवादन करत त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला. त्रिरत्न बुद्ध विहार परिसरात उभारण्यात आलेली ही मूर्ती भाविकांसाठी प्रेरणास्थान ठरणार असून समाजात शिक्षण, समता आणि मानवतेचे मूल्य रुजविण्यास हातभार लावेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## मारवाड़ी युवा मंचचा राष्ट्रीय पुरस्कार रोहित रुंगटा यांना

**अकोला :** महानगरातील युवा कार्यकर्ते व गत १८ वर्षांपासून मारवाडी युवा मंचमध्ये सेवाकार्य करणारे।मंचचे प्रांतीय उपाध्यक्ष रोहित रुंगटा यांना मारवाडी युवा मंचच्या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अ भा. मारवाडी युवा मंचची झोन-५ ची प्रांतीय व राष्ट्रीय द्विदिवसीय संघटनात्मक कार्यशाळा 'उड़ान २६' मुंबई येथे मोठ्या उत्साहात नुकतीच पार पडली. या कार्यक्रमात महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तेलंगाना आणि आंध्र प्रदेश यांच्या शाखा व प्रांतीय पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवला.या कार्यक्रमाला मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष सुरेश जैन, मार्गदर्शक व माजी मंत्री जयप्रकाश मूंधडा, राष्ट्रीय कोषाध्यक्ष राहुल अग्रवाल, राष्ट्रीय उपाध्यक्ष झोन-५ साकेत रिटोलिया, प्रांतीय अध्यक्षा सौ. अमृता भूतड़ा आणि राष्ट्रीय सहायक मंत्री प्रकाश बिंदल आदी मान्यवर उपस्थित होते.

## वहिवाटीसाठी नकाशावर रस्ता असतानाही बेकायदेशीर रस्ता मागणा-या शेतक-याची महसूल विभागाकडून पाठराखण

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील वाईगौळ व सावळी येथील शेतशिवारात पूर्वीचा नकाशावरचा रस्ता ऐवजी सोयीचा आणि जवळचा रस्ता मिळावा म्हणून नविन शेतरस्त्याच्या मागणीवरून वाद निर्माण झाला असून, महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

संबंधित प्रकरणात रस्ता नसल्याचे कारण नमूद करून काही अर्ज प्राप्त झाल्याची तोंडी माहिती देत मंडळ अधिकारी संदीप आडे व ग्राम महसूल अधिकारी कटकतलवारे हे अर्जदारांसह शेतपाहणीसाठी आल्याचे आरोप



बाधित शेतकऱ्यांनी केला आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, आजू बाजूला अन्य शेत असूनही बाधित शेतकऱ्याच्या शेतजमिनीमधून प्रस्तावित रस्ता काढण्यात येणार आहे, त्या जमीनधारकांना कोणतीही आगाऊ लेखी सूचना न देता किंवा त्यांची बाजू ऐकून न घेता पाहणी केली जात आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांच्या मालमत्तेच्या हक्कांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाल्याचा दावा करण्यात आला आहे. याशिवाय, काही शेतकऱ्यांनी आरोप केला आहे की, अर्जदारांच्या हितसंबंधांना प्राधान्य देत महसूल अधिकाऱ्यांकडून दबावाचे वातावरण तयार केले जात असून, रस्ता मंजुरीसाठी अनुकूल अहवाल देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

> बेकायदेशीर रस्त्याची मागणी ज्यांनी केली आहे ते अनिल जाधव आणि मंडळ अधिकारी आडे व ग्राम महसूल अधिकारी कटकतलवारे यांनी संगनमत करून शेजारील कोणत्याच शेतकऱ्याला न बोलवता मला बोलावून दमदाटी केली व रस्ता न दिल्यास कोर्टाच्या वाऱ्या करायला लावतो, अशी दमदाटीसुद्धा केली.
>
> **हितेश जाधव,** बाधित शेतकरी

> ङमहाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम १४३ अन्वये अर्ज आल्यानंतर तहसीलदार यांनी संबंधित शेतजमीनीला नकाशावर रस्ता उपलब्ध आहे अथवा नाही हे प्रारंभी नकाशावरून पाहूनच अर्जाची व्यवहार्यता तपासणे गरजेचे आहे अथवा ज्या शेतकऱ्यावर प्रतिकूल परिणाम होणार आहे त्यांना कायदेशीर सूचना देणे, बंधनकारक असूनही, महसूल अधिकारी यांची ही बेकायदेशीर कृती संशयास्पद वाटते.
>
> **-ॲड. श्रीकृष्ण राठोड**

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २०३ ■ शनिवार, २० जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# उन्हाने घात केला, आता शासनाने हात द्यावा : आष्टीतील संत्रा-मोसंबी उत्पादकांच्या वेदनांना खासदार अमर काळेंची साथ

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील संत्रा आणि मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांवर यंदाच्या अतिउष्णतेने अक्षरशः घाला घातला आहे. कडक उन्हाच्या झळांनी हजारो झाडे करपली, फळगळ झाली आणि वर्षभराच्या कष्टांवर पाणी फिरले. या भीषण परिस्थितीत प्रशासनाच्या कागदी हालचालींवर विसंबून न राहता खासदार अमरभाऊ काळे स्वतः शेताच्या बांधावर उतरले आणि नुकसानग्रस्त फळबागांची प्रत्यक्ष पाहणी करून अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करण्याचे व शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले.

यापूर्वी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी खासदार काळे यांच्याकडे निवेदन देऊन मदतीची मागणी केली होती. या मागणीची गंभीर दखल घेत खासदारांनी गुरुवारी (१८ जून) आष्टी तालुक्यातील वडाळा, वर्धपूर, सत्तरपूर, बोरगाव, धाडी, साहूर आणि तळेगाव या गावांमध्ये दौरा करून करपलेल्या बागांची पाहणी केली. अनेक ठिकाणी झाडांची पाने सुकलेली, फळे गळालेली आणि संपूर्ण बागा उजाड झाल्याचे विदारक चित्र पाहून त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली.



पाहणीदरम्यान खासदार काळे यांनी उपस्थित कृषी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सुनावले की, शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. पंचनामे तातडीने पूर्ण करून शासनाकडे अहवाल पाठवा आणि नुकसानग्रस्तांना लवकरात लवकर आर्थिक मदत मिळवून द्या. त्यांच्या या भूमिकेमुळे प्रशासनालाही तत्परतेने हालचाली कराव्या लागल्या.

या दौऱ्यात उपविभागीय कृषी अधिकारी कांबळे, तालुका कृषी अधिकारी बनकर, मंडळ अधिकारी व कृषी सहाय्यक उपस्थित होते. खासदारांनी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष परिस्थिती दाखवून देत शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्याचे निर्देश दिले.

यावेळी ईश्वर वरकड, नानासाहेब जमालपुरे, बबनराव कोहळे, सुरज ढोले, गिरीधरजी निंभोरकर, राजू पोटे, विजय वाघमारे, हरिभाऊ निंभोरकर, सतीश गोहाड, रामदास उगले, दिलीप भाकरे, अरुण नेहारे, देवेंद्र उगले, रमेश मसरे, प्रवीण टापरे, राजकुमार कांदे, प्रसाद वरकड, जितू शेटे आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

संकटाच्या काळात लोकप्रतिनिधी स्वतः बांधावर येऊन परिस्थितीची पाहणी करत असल्याने आष्टी तालुक्यातील हवालदिल शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आता प्रशासन किती वेगाने पंचनामे पूर्ण करून शासनाकडून मदत मंजूर करून आणते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. करपलेल्या बागांना न्याय आणि शेतकऱ्यांना आधार मिळतो का, याची खरी परीक्षा आता यंत्रणेचीच आहे.

### स्मार्ट मीटर की स्मार्ट लूट

# खुर्ची रिकामी, कारभार बेपत्ता; स्मार्ट मीटरवरून महावितरणला घेरले

**वर्धा जनमाध्यम :** वीज ग्राहकांच्या माथी स्मार्ट मीटर लादण्याच्या निर्णयाविरोधात वर्धा जिल्हा युवक काँग्रेसने बुधवारी महावितरणच्या बोरगाव मेघे येथील कार्यालयावर धडक देत जोरदार आंदोलन छेडले. स्मार्ट मीटरची सक्ती नको, ग्राहकांची लूट बंद करा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. महावितरणच्या कार्यपद्धतीविरोधात संताप व्यक्त करत आंदोलनकर्त्यांनी थेट अधीक्षक अभियंत्यांच्या खुर्चीलाच निवेदन चिटकवून अनोखा निषेध नोंदविला.



महावितरणकडून १७ जून रोजी ग्राहकांना पाठविण्यात आलेल्या संदेशात केंद्र सरकारच्या राजपत्र अधिसूचनेनुसार विद्यमान वीज मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली होती. या निर्णयामुळे ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची भीती व्यक्त करत युवक काँग्रेसने आंदोलनाचा पवित्रा घेतला.

आंदोलनकर्त्यांनी विविध मागण्यांचे निवेदन देण्यासाठी महावितरण कार्यालय गाठले. मात्र, अधीक्षक अभियंता स्मिता पारखी कार्यालयात नसल्याचे सांगण्यात आले. सकाळी ११ वाजल्यापासून दुपारी दीड वाजेपर्यंत प्रतीक्षा करूनही वरिष्ठ अधिकारी न आल्याने आंदोलनकर्त्यांचा संताप अनावर झाला. अखेर अधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्चीलाच निवेदन चिटकवत महावितरणच्या कारभाराचा निषेध करण्यात आला.

जनतेच्या प्रश्नांवर उत्तर देण्यासाठी अधिकारी उपलब्ध नसतील तर ग्राहकांनी न्याय कुणाकडे मागायचा असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. स्मार्ट मीटर योजना राबविताना ग्राहकांची संमती, पारदर्शकता आणि आर्थिक परिणाम याबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणीही करण्यात आली.

या आंदोलनात काँग्रेस नेते शेखर शेंडे, शिवराज शिंदे, अंकित हिवरे, गगन आंबटकर, वैभव पंधराम, आयुष ढोमणे, हिमांशू ठाकरे, सचिन नराते, बाबा जाकीर, शशांक शर्मा, शुभम निमजे, संजय खडसे, स्वप्नील महादुळे, बाळू शिवणकर, राजन आंबटकर, विशाल मडावी, सचिन ढोबे, सुजय मालवडे, सौरभ गडघे यांच्यासह युवक काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनामुळे महावितरणच्या स्मार्ट मीटर मोहिमेभोवतीचा वाद पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# केळी उत्पादकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर हल्लाबोल

## भावातील लूट थांबवा, पीक विमा लागू करा

**वर्धा जनमाध्यम :** केळीला मिळणाऱ्या कमी बाजारभावा विरोधात आणि पीक विमा योजनेच्या मागणीसाठी वर्धा जिल्हा केळी उत्पादक संघाने शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत प्रशासनाचे लक्ष वेधले. संघाचे संयोजक डॉ. सचिन पावडे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

विदर्भातील केळी उत्पादकांना जळगाव, बुरहानपूर आणि इतर प्रमुख बाजारपेठांच्या तुलनेत अत्यल्प दर मिळत असल्याने मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. याशिवाय केळी पिकाचा पीक विमा योजनेत समावेश नसल्याने नैसर्गिक आपत्ती आणि हवामान बदलाचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना कोणतेही संरक्षण मिळत नसल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली.



यंदाच्या मे महिन्यातील तीव्र उष्णतेमुळे केळी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारात मिळणारे कमी दर शेतकऱ्यांच्या अडचणी अधिक वाढवत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. केळीच्या दरातील तफावतीची उच्चस्तरीय चौकशी करावी, व्यापारी कार्टेलची तपासणी करावी, शेतकऱ्यांना न्याय्य बाजारभावाची हमी द्यावी तसेच संपूर्ण वर्धा जिल्ह्यातील केळी पिकाचा पीक विमा योजनेत समावेश करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी शेतकऱ्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत संबंधित मागण्या शासन स्तरावर पाठवून आवश्यक कार्यवाहीसाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. या आंदोलनात मनोज नागपुरे, ज्ञानेश्वर मानकर, श्रीकांत देहारे, तुषार भोयर, प्रकाशसिंह बैस, घनश्याम माहुरे, श्याम माहुरे, त्र्यंबक माहुरे, जीवन माहुरे, ज्ञानेश्वर शिंदे, सचिन गरपाळ, श्याम भेंडे, कुणाल बैस, मेघराज ढाले, विनोद साळवे यांच्यासह मोठ्या संख्येने केळी उत्पादक सहभागी झाले होते. शेतकऱ्यांच्या मागण्यांवर शासन काय निर्णय घेते, याकडे आता जिल्ह्यातील केळी उत्पादकांचे लक्ष लागले आहे.

# प्रयागराजपर्यंत पाठलाग; अल्पवयीन मुलीचे अपहरण करणारा जेरबंद

**वर्धा जनमाध्यम :** वडनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून अल्पवयीन मुलीला पळवून नेणाऱ्या आरोपीला पोलिसांनी शिताफीने शोधून काढत प्रयागराज येथून अटक केली. या कारवाईमुळे एका गंभीर गुन्ह्याचा उलगडा झाला असून मुलीची सुरक्षित सुटका करण्यात पोलिसांना यश आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, वडनेर परिसरातील अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्यानंतर तिच्या पालकांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखा तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या अधिकाऱ्यांचे विशेष पथक तयार करण्यात आले. तपासादरम्यान आरोपी आणि पीडित मुलगी यांच्याबाबतची माहिती संकलित करण्यात आली. तांत्रिक तपास व गुप्त माहितीच्या आधारे दोघेही उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिस पथकाने तत्काळ प्रयागराज गाठून सौरभ गगनाईक (वय २२, रा. घुग्गूस, जि. चंद्रपूर) याला ताब्यात घेतले.

# वायफड पारधी बेड्यावर खाकीचा बुलडोझर

## विषारी गावठी दारूच्या साम्राज्यावर पोलिसांचा घणाघात; ८.६९ लाखांचा सडवा, भट्ट्या अन् दारूसाठा उद्ध्वस्त

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात अवैध गावठी दारूच्या व्यवसायाविरोधात पुलगाव पोलिसांनी मोठी धडक कारवाई करत वायफड पारधी बेडा परिसरातील दारूनिर्मितीच्या अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत तब्बल ८ लाख ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पाच नामनिर्देशित आरोपींसह अन्य इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांना मिळालेल्या खात्रीशीर गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांचे पथक सकाळच्या सुमारास वायफड पारधी बेडा येथे दाखल झाले. आरोपींनी आर्थिक फायद्यासाठी मानवी आरोग्याशी खेळ मांडत विषारी घटकांचा वापर करून दारू तयार केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले. कारवाईदरम्यान पोलिसांनी पाच दारूभट्ट्या, पाच जर्मन घमेले, पाच लोखंडी ड्रम, ५०० लिटर उकळता मोहा, ५० लिटर तयार गावठी दारू, १३३ प्लास्टिक ड्रम आणि १३ हजार ३०० लिटर मोहा सडवा जप्त केला. जप्त केलेल्या मालाची किंमत ८ लाख ६९ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.



या प्रकरणी सरनेसिंग सरनाना चव्हाण, सुनील सरनाना चव्हाण, मुकेश रमेशराव भोसले, चरणसिंग परम भोसले, अजय गणेश पवार तसेच अन्य काही इसमांविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस उपनिरीक्षक रोशन खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असून, या अवैध दारू रॅकेटचे जिल्ह्यातील इतर भागांशीही संबंध आहेत का, याचा शोध घेतला जात आहे. पोलिसांच्या या धडक कारवाईने गावठी दारू माफियांचे धाबे दणाणले असून जिल्ह्यातील अवैध धंदेवाल्यांना खाकीने स्पष्ट इशारा दिला आहे.

# कटरचा धाक, अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपीला ३ वर्षांची शिक्षा

## न्यायालयाचा कठोर निर्वाळा; दंडासह कारावासाची सुनावणी

**वर्धा जनमाध्यम :** अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला जिल्हा सत्र न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावत बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांविरोधात स्पष्ट संदेश दिला आहे. आरोपी अमित उर्फ विवेक ठाकरे (वय ३८) यास दंडासह तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली असून हा निर्णय जिल्हा न्यायाधीश-३ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. जे. अंसारी यांनी दिला.

प्रकरणातील माहितीनुसार, आरोपीने पीडितेच्या घरी जाऊन पिण्यासाठी पाणी मागितले. पीडितेने तिच्या लहान भावाला पाणी आणण्यास सांगितल्यानंतर आरोपीने कटरचा धाक दाखवत तिचा विनयभंग केला. अचानक घडलेल्या या प्रकाराने मुलगी घाबरली होती. मात्र, तिने धैर्य दाखवात कुटुंबीयांना संपूर्ण घटना सांगितली. त्यानंतर सावंगी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तपासानंतर प्रकरण न्यायालयात दाखल करण्यात आले. सुनावणीदरम्यान सादर करण्यात आलेले पुरावे, साक्षीदारांचे जबाब आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद विचारात घेऊन न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविले.



न्यायालयाने भादंवि कलम ४५२ व ३५४ अंतर्गत दोन वर्षांचा कारावास व एक हजार रुपये दंड, तसेच दंड न भरल्यास दोन महिन्यांच्या अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक (पोस्को) कायद्याच्या कलम ८ अंतर्गत तीन वर्षांचा कारावास व दोन हजार रुपये दंड, दंड न भरल्यास तीन महिन्यांच्या अतिरिक्त कारावासाची शिक्षा ठोठावली. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक अनुराधा फुकटे यांनी केला. न्यायालयात शासकीय पक्षाची बाजू अतिरिक्त सरकारी वकील विनय आर. घुडे यांनी प्रभावीपणे मांडली, तर पैरवी अधिकारी म्हणून आश्विनी वानखेडे यांनी काम पाहिले. न्यायालयाच्या या निर्णयाचे कायदा क्षेत्रात स्वागत करण्यात येत आहे.

# खासदारांच्या गडाला भगदाड : खंदे शिलेदार मनोहर जाधव कमळाच्या छावणीत

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी तालुक्यातील राजकारणात खळबळ उडविणारी घटना घडली असून विद्यमान खासदारांचे निकटवर्तीय व खंदे समर्थक म्हणून ओळखले जाणारे हिवरा (तांडा) येथील माजी उपसरपंच मनोहर गादूसिंग जाधव यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. आमदार सुमित वानखेडे यांच्या उपस्थितीत झालेल्या या पक्षप्रवेशामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

काँग्रेसपासून सुरू झालेला आणि नंतर 'तुतारी'च्या प्रचारात सक्रिय राहिलेला मनोहर जाधव यांचा स्थानिक राजकारणात प्रभाव मानला जातो. विद्यमान खासदारांच्या विजयासाठी त्यांनी मोठे योगदान दिल्याची चर्चा असताना, गावाच्या विकासाकडे सातत्याने दुर्लक्ष झाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त करत भाजपाची वाट धरल्याचे सांगितले जात आहे.



आर्वी मतदारसंघात आमदार सुमित वानखेडे यांनी राबविलेल्या विकासकामांवर विश्वास ठेवून हा निर्णय घेतल्याचे जाधव यांनी स्पष्ट केले. यावेळी आमदार वानखेडे यांनी त्यांचे स्वागत करून पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला भाजपचे तालुका ग्रामीण अध्यक्ष राजेंद्र ठाकरे, महामंत्री जितेंद्र ठाकरे, चंदू जाधव, भैय्या पवार, भागचंद पवार, अर्जुन चव्हाण, सरपंच सुधाकर राठोड, गजानन राठोड यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

मनोहर जाधव यांच्या पक्षप्रवेशामुळे भाजपाची ग्रामीण भागातील ताकद वाढल्याचे मानले जात असून, विरोधी गटासाठी हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

# वर्धेतील सहा केंद्रावर उद्या नीट परीक्षा

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरातील शाळा व महाविद्यालयातील ६ परीक्षा केंद्रावर २१ जुन रोजी दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षेचे (NEET-UG) आयोजन करण्यात आले आहे. परीक्षा सुरळीत, शांततापूर्ण व पारदर्शक वातावरणात पार पडावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी परीक्षा केंद्र परीसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहे. सदर आदेश दि.२१ जुन रोजी सकाळी ११ वाजता पासुन सायंकाळी ६ वाजेपर्यंतच्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात लागू राहणार आहे. या दरम्यान परीक्षा केंद्राभोवती १०० मीटर परिसरात दोन अथवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींच्या जमावावर आणि १०० मीटर परिसरातील सर्व झेरॉक्स, मोबाईल, एसटीडी, फॅक्स, संगणक, ई-मेल, इंटरनेट इत्यांदी ईलेक्ट्रॉनिक उपकरणे व ईलेक्ट्रॉनिक्स सुविधांच्या वापरावर व सुरु ठेवण्यावर निर्बंध घालण्यात आले आहे.

**नगर पंचायत कार्यालय सेलू, जि.वर्धा**
**निविदा सूचना शुध्दीपत्रक**

क्र.नपसे/निविदा/बां.वि./९४६/२०२६
कार्यालय नगर पंचायत सेलू, जि.वर्धा
दिनांक १८.०६.२०२६

नगर पंचायत सेलू यांचेवतीने सेलू शहरातील प्रभाग क्र.१७ मधील नमो उद्यान मध्ये बोअरवेल व तारेचे कम्पाऊंड (फेन्सिंग) बांधकाम करणे करीता कामाची अंदाजित रक्कम ७,८५,४४०/- निविदा प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाचे पंजीबध्द कंत्राटदारांकडून आवश्यक त्या वर्गानुसार दिनांक १८.०६.२०२६ ला दुपारी १२.०० वाजता ते दिनांक २४.०६.२०२६ ला दुपारी ३.०० वाजता पर्यंत निविदा सादर करण्याकरीता कळविण्यात आले होते. परंतु सदर निविदा तांत्रिक व प्रशासकीय कारणास्तव निविदा रद्द करण्यात येत आहे.

कु.स्नेहल अ.देवतारे,
अध्यक्षा,
नगर पंचायत सेलू

श्रीमती रेखाताई चं.खोडके
उपाध्यक्षा
नगर पंचायत सेलू

श्री.किशोर इरपाते
बांधकाम सभापती
नगर पंचायत सेलू

श्री.अनुप अग्रवाल
मुख्याधिकारी,
नगर पंचायत सेलू

**ग्रामपंचायत कार्यालय आंजी (ब) ता.देवळी, जि.वर्धा**
**निविदा सूचना**

ग्रामपंचायत कार्यालय आंजी (ब) ता.देवळी, जि.वर्धा कडून खालील कामाची निविदा अटी व शर्ती पूर्ण करणार अशा योग्य त्या नोंदणीकृत कडून बी-१ निविदा ग्रामपंचायत कार्यालयीन आंजी (ब) वेळेत दिनांक १६/०६/२०२६ ते २३/०६/२०२६ या कालावधीत सादर करावे.
निविदा उघडण्याची प्रक्रिया दिनांक २४/०६/२०२६ वेळ सकाळी १०.३० वाजता उघडण्यात येईल.

| कामाचे नांव | योजनेचे नांव | प्राकलन किंमत | तांत्रिक मंजूरी क्र. /दिनांक | कोरी निविदा फी | अनामत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. सार्वजनिक विहीर खोलीकरण व गाळ काढणे (मौजा बऱ्हाणपूर) | पाणी टंचाई | १,१८,४९४ | ६६/२९/०४/२६ | ५००/- | ११८५/- | ३० जून २०२६ |
| २. सार्वजनिक विहिरीवर लोखंडी जाळी बसविणे | १५ वा वित्त आयोग अंतर्गत | ६३,००० | १० | ५०० | ६३० | ३० जून २०२६ |

**अटी व शर्ती -**
१) मंजूर काम हे प्राकलनाप्रमाणे करण्यात यावे व तसेच काम करतांना कंत्राटदारांनी सक्षम अधिकाऱ्याचे मार्गदर्शन घ्यावे.
२) नियमानुसार देयकातून संवैधानिक कपाती करण्यात येईल.
३) शासनाकडून प्राप्त निधीनुसार कामाचे मुल्यांकन व सी.सी.प्राप्त झाल्यानंतर देयक अदा करण्यात येईल.
४) कंत्राटदारांनी नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, आधारकार्ड, जीएसटी प्रमाणपत्र, आयकर रिटर्न २ वर्ष इत्यादी आवयश्यक कागदपत्रे निविदा सोबत सादर करावे.
५) निविदा फी व सुरक्षा ठेव हे RTGS/NEFT व बॅंक खात्यामध्ये ग्रामनिधी ग्रामपंचायत आंजी (ब) पंजाब नॅशनल बॅंक अंदोरी खाते नं. 1149000100001689 IFSC Code PUNBO134900 मध्ये स्विकारण्यात येईल.
६) कामाचे प्राकलन ग्रा.पं.कार्यालयीन वेळेमध्ये पाहण्याकरीता उपलब्ध आहे.
७) निविदा मंजूर अथवा न ामंजूर करण्याचे अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवले आहेत.

**आर.आर.आंडे**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत, आंजी (ब)**

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## प्रादेशिकचे अस्तित्व?

महाराष्ट्रात 'उबाठा'त पडलेली फूट आणि त्याच वेळेला पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचे झालेले पूर्ण विघटन यामुळे प्रादेशिक पक्षांच्या अस्तित्वाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. सत्तेचे भागीदार असेपर्यंत प्रादेशिक पक्षांचा संसार सुरळीत चालतो; पण सत्ता गमावताच हे प्रादेशिक पक्ष एखाद्या पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळतात. त्यामुळे, प्रादेशिक पक्षांची बांधणी, त्याला सत्तेचा असलेला गोंद आणि त्यांची काळाशी सुसंगतता या तीनही मुद्द्यांच्या आनुषंगाने गंभीर चर्चा करण्याची गरज भासू लागली आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा काँग्रेस हा एकच एक मजबूत राष्ट्रीय पक्ष होता. त्या काँग्रेसच्या पोटात विविध प्रादेशिक गट, मध्यम आणि डाव्या विचारसरणीचे (किंचित उजवेही) गट होते. फाळणी आणि त्यानंतर म. गांधींची हत्या या दोन लागोपाठ घडलेल्या दुर्घटनांनी भारतीय लोकशाहीची नौका डळमळेल,असा अनेक आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचा अंदाज होता. पण, तो खोटा ठरला. तत्कालीन सर्व राजकीय पक्षांनी आपापसातील मतभेद कायम ठेवून, त्याबाबत जाहीर टीकाटिप्पणी करूनही या दोन्ही प्रसंगातून भारताचे स्वातंत्र्य आणि लोकशाही प्रक्रिया व्यवस्थित तारून नेली. भारतासारख्या प्रचंड विविधता आणि अंतर्विरोध असलेल्या देशात एकच एक पक्ष आणि त्याभोवती सर्व राजकारण फिरत राहणे अवघड होते. त्यामुळे साठच्या दशकातच विविध राजकीय पक्षांची ताकदीने उभारणी सुरू झाली आणि त्याद्वारे देशात मोठे राजकीय ध्रुवीकरण झाले. १९६२ च्या निवडणुकीपासूनच त्याच्या पाऊलखुणा दिसू लागल्या होत्या. ८०-९० च्या दशकात प्रादेशिक पक्षांनी चांगला जोर धरला आणि त्यांचे सिंडिकेट काँग्रेसच्या सत्तेला थेट आव्हान देऊ लागले. काँग्रेसची ताकद या आव्हानाने कमी होत असताना आणि दुसऱ्या समर्थ राष्ट्रीय पक्षाचा प्रभावी उदय तोपर्यंत झाला नसल्याने छोट्या प्रादेशिक पक्षांना आपापसातील समीकरणे बदलत केंद्र सरकारच्या घडण्या-बिघडण्यात मोठा वाटा उचलण्याची संधी मिळाली. त्यानंतर 'अयोध्ये'ची लाट आली; त्यात दुसऱ्या राष्ट्रीय पक्षाचा दमदार पर्याय उभा राहिला. सुरुवातीला केंद्रात सत्ता स्थापन करण्यासाठी झालेली धडपड त्यानंतर मिळालेला कौल असा प्रवास करत २०१४ पासून या पक्षाने केंद्रात आपला भरभक्कम जम बसवला. सध्या देशाच्या ७८ टक्के भूभागावर आमची सत्ता आहे, असा भाजपचा दावा आहे.भारतीय मतदाराने केंद्रात भारतीय जनता पक्षाला कौल दिला आणि लगेच राज्यांची सूत्रे त्यांच्या हाती दिली, असे झाले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारख्या प्रभावी नेत्याच्या हाती केंद्राची सूत्रे दिल्यानंतर या पक्षाने आपल्या सत्ताविस्ताराची सूत्रे गृहमंत्री अमित शहा यांच्या हाती सोपवली. सुरुवातीला प्रत्येक राज्यात तिथल्या प्रभावी प्रादेशिक पक्षाला हाताशी धरूनच भाजपला राज्याराज्यात सत्तेत पाय ठेवता आला. ओदिशात विजू जनता दल,आंध्र प्रदेशात तेलुगू देसम पार्टी,पंजाबात शिरोमणी अकाली दल,काश्मीरमध्ये पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी, तामिळनाडूत अण्णा द्रविड कळघममध्ये, महाराष्ट्रात शिवसेना, बिहारमध्ये संयुक्त जनता दल, उत्तर प्रदेशात काही काळ बहुजन समाज पक्ष-अशी मोठी यादी आहे. केवळ दाखला म्हणून त्या त्या राज्याच्या प्रमुख पक्षांची नांवे इथे घेतली आहेत. प्रत्यक्षात केंद्रात सत्ता स्थापन करण्यासाठी आणि राज्यातील सत्ता हस्तगत करण्यासाठी भाजपने कितीतरी स्थानिक पक्षांशी जमवून घेतले; आपल्या मित्र पक्षांची यादी विस्तारत नेली. संघराज्य असणाऱ्या भारतात सत्ता मिळवण्याचा आणि तिचा विस्तार करत जाण्याचा हाच व्यवहारी,जवळचा आणि सर्वोत्तम मार्ग होता. एकेकाळी काँग्रेसचे मित्र असलेल्या पक्षांना आकर्षित करण्यासाठी भाजपने आपल्या कठोर वैचारिक भूमिकेला मुरडही घातली. बिहार-उत्तर प्रदेशात 'बिगर काँग्रेसवादा'ने पछाडलेल्या समाजवादी नेत्यांना, त्यांच्या आदर्शानाही स्थानिक प्रेरणास्थान म्हणून स्वीकारले; त्यांचे गुणगान केले आणि पुतळेही उभारले. भाजप पद्धतशीरपणे स्वतःच्या कक्षा अशा रुंदावत असताना नेमका काँग्रेसमध्ये नेतृत्वाचा दुष्काळ पडला. काँग्रेस ज्या प्रादेशिक नेतृत्वाच्या खांद्यावर उभी होती, ते खांदे काँग्रेसकडून एकामागे एक काढून आपल्या खुर्चीसाठी टेकू म्हणून वापरण्याची नीती भाजपने अवलंबली. 'काँग्रेसमुक्त भारत' करण्याचा कार्यक्रम त्यांनी असा मोहीम म्हणून राबवला. त्यामुळे २०१४ नंतर पाच-सात वर्षांतच भाजप देशात बलाढ्य पक्ष म्हणून उभा राहिला. काँग्रेसने आपली बहुतेक भूमी याच काळात गमावली.ज्या प्रादेशिक पक्षांची मदत भाजपने घेतली, ते पक्ष आज कुठे आहेत? असा प्रश्न भाजपचे विरोधक नेहमी विचारतात. त्याचे पहिले उत्तर 'ते सर्व भाजप बरोबरच आहेत' हेच येते. फक्त त्यांच्या राजकीय बलाबलात आता फरक झाला आहे. म्हणजे, जिथे कधीकाळी भाजपने त्यांचा आधार घेतला होता, तिथे आज ते भाजपच्या आधाराने उभे आहेत किंवा सत्तेत आहेत! याला कारण जागतिक परिस्थिती आणि त्या आनुषंगाने बदललेले देशांतर्गत राजकारण. गेले तप हे आंतरराष्ट्रीय पातळीवर अस्थिरतेचे,युद्धाचे,संघर्षाचे तप होते. पाकिस्तानला वठणीवर आणणे ही देशाची गरज होती. कोरोनासारखी जागतिक महामारी याच काळात आली. भारताने आपल्या कररचनेत आमूलाग्र सुधारणा याच काळात केल्या. कर संकलन केंद्रात एकवटले. राज्यांचे कर आकारणीचे अधिकार जवळजवळ संपले. ते फक्त केंद्राच्या कर उत्पन्नातले वाटेकरी झाले. मोदी यांनी देशातील जनतेशी हिंदीतून उत्तम संवाद ठेवलाच; शिवाय आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांची प्रतिमा 'विश्वगुरू' अशी झाली. या सगळ्या धोरणात साहजिकपणे राज्यातील नेतृत्व खुजी दिसू लागली. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय मुद्द्यांमध्ये जनमत अडकत गेले. प्रादेशिक पक्षांनी, त्यांच्या नेत्यांनी या याचा विचार केल्याचे कुठे दिसले नाही. राजकीय अजेंडा बदलला, राजकारणाचा आवाकाही बदलला. भाजपने जिंकलेल्या या राजकीय पर्यावरणाने प्रादेशिक पक्ष,नेते निष्प्रभ होत गेले. यापुढेही होत जातील. काँग्रेसच्या आधाराने त्यांचं अस्तित्व किती टिकेल?हा या पुढचा प्रश्न आहे

## 'आ..बैल मुझे मार'

सुमारे २ ते ३ महिन्यांपासून होणार होणार म्हणून बहुचर्चेत असलेले 'ऑपरेशन टायगर' अखेर एकदाचे पार पडले. २ दिवसांपासून राज्यात आणि दिल्लीत प्रचंड वेगात आणि तितक्याच गुप्तरितीने राजकीय हालचाली घडल्या; आणि या मोहिमेला अंतिम स्वरूप मिळाले. एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा आपण किती निष्णात 'सर्जन' आणि मुरलेला राजकारणी आहे,हे सिद्ध करून दाखवले आहे,असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

मंगळवार (दि. १७) रोजी दुपारी या 'बंडखोरी'वर जवळपास 'शिक्कामोर्तब' झाले; आणि मग 'उबाठा' गटाचे 'वरातीमागून घोडे' याप्रमाणे बंडखोर ६ खासदारांना 'या चिमण्यांनो परत फिरा रे' यासाठी प्रयत्न सुरू झाले.गटाचे मुख्य प्रतोद अनिल देसाई यांनी तातडीने सर्व खासदारांची तातडीची संसदीय दलाची बैठक बोलावली; आणि प्रत्येक खासदाराने हजर रहावे, असा 'व्हिप' बजावला. किमान ओमराजे निंबाळकर आणि संजय दिना पाटील हे २ खासदार बैठकीला हजर राहतील, असा गटाला विश्वास होता. या २ खासदारांनी आदल्या दिवशी माधम्यांना तशा प्रतिक्रियाही दिल्या होत्या. त्यामुळे या प्रकरणात नवा ट्विस्ट येईल, असेही त्यांना वाटले. पण,'भरवशाच्या म्हशीला टोणगा' देत, या दोघांनी गैरहजर राहत, गटाच्या भळभळीत जखमेवर मीठ चोळून त्यांच्या संतापात अजून भर टाकली. खरेतर, गेले २ महिने या विषयावर सर्वत्र चर्चा होत होती. पण, संजय राऊत यांनी नेहमीप्रमाणे 'या अफवा आहेत. सर्व खासदार आमच्या सोबतच आहेत. सर्व काही अलबेल आहे.' अशा थापा मारत, 'उबाठा' आणि उध्दव ठाकरेंना पूर्णपणे गाफिल ठेवले. यावरून, 'संजय राऊताने पूर्ण 'उबाठा' संपविण्याची सुपारी घेतली आहे', या त्यांच्यावर सतत होणा-या आरोपाला पुष्टी मिळते, हे मात्र नक्की. उध्दव ठाकरे यांच्या बालिश बुद्धीची कीव करावीशी वाटते. तुमच्या घरावर ज्याला दरोडा टाकायचा आहे. तो वाजत गाजत न येता, छुप्या पावलांनीच येणार, हे जगजाहीर आहे. विशेष म्हणजे याआधीही तुमच्या घरावर 'महादरोडा' पडलेला आहे. तरीसुद्धा तुम्ही इतके गाफिल कसे राहिलात? आज 'उबाठा' गटाचे अनेक शकले उडून, तो संपण्याच्या मार्गावर आहे. अशी दयनीय अवस्था का झाली आहे? याचे एका वाक्यात वर्णन करायचे झाल्यास, 'काळू-बाळूं'नी 'स्वतःच्या हातानेच स्वतःच्या पायावर कु-हाड' मारून घेतली, असे करणेच



योग्य ठरेल.

४ वर्षांपूर्वी जून महिन्यात विधान परिषदांच्या निवडणुका होत्या. उध्दव ठाकरेंच्या तत्कालीन शिवसेनेचे आमदार मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये होते. त्यांना मार्गदर्शन करतांना उध्दव म्हणाले होते की,'आईचे दूध विकणा-यांची अवलाद मला पक्षात नको' त्यावेळी एकनाथ शिंदे हे नगरविकास मंत्री होते. हे वाक्य त्यांनाच उद्देशून केले गेले होते. यामुळे शिंदे अत्यंत व्यथित आणि नाराज झाले. झालेला अपमान गिळत त्यांनी ती वेळ मारून नेली. तत्पूर्वी,'मविआ' सरकारमध्ये मुख्यमंत्री म्हणून शिंदेंचाच अधिकार होता. पण, बायकोच्या हट्टामुळे त्यांना डावलण्यात आले. पुढे आदित्य ठाकरे यांनी शिंदेंच्या नगरविकास खात्यात ढवळाढवळ करायला सुरुवात केली.राज्यसभेच्या निवडणुकीतही शिंदेंना अपमानास्पद वागणूक दिली गेली. त्यामुळे शिंदेंच्या मनातील खदखद वाढतच गेली. त्यानंतर मुख्यमंत्री असताना उध्दव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांना 'एकतर तू तरी राहशील नाहीतर मी राहील', अशी जाहीरपणे जवळजवळ धमकीच दिली होती.त्यानंतर, गृहमंत्री अमित शहा यांचे शरीर आणि चालण्याच्या सवयीवरुन त्यांचा 'औरंगजेब' असा उल्लेख केला होता. आजही करतात. हे तिन्हीही नेते संयमी आणि सहनशील आहेत. 'एखाद्याने गाय मारली तर आपण वासरू मारायचे नसते' याची समज असलेल्या राजकारणातील या'धुरंदर त्रिमूर्तींनी' तेव्हाच ठरवले की, ठाकरेंना 'जोरका झटका धीरेसे' द्यायचा. आज उध्दवची आणि त्यांच्या पक्षाची या 'त्रिमूर्तीं'नी काय आणि कशी वाट लावली, हे आपण बघतच आहोत.

४ वर्षांपूर्वी नाराज आमदारांना ओंजारून गोंजारून त्यांची मनधरणी करुन, त्यांना परत आणण्याची राऊतांची मनापासून इच्छाच नव्हती.शेवटी व्हायचे तेच झाले. आजही त्यांनी तेच काम केले आहे. त्या ६ खासदारांचा 'गद्दार' असा उल्लेख तर केलाच. पण, 'भडवे' अशी अश्लील शिविगाळ करत, आपली 'लोकप्रतिनिधी' आणि 'संपादक' होण्याची लायकी नाही, हे सिद्ध केले.तेव्हा आणि आज झालेल्या 'पक्षफुटी'ला हीच 'काळू-बाळू'ची जोडी जबाबदार आहे. पण, 'नाचता येईना अंगण वाकडे' अशी सवय लागल्याने यावेळीही आपल्या नाकर्तेपणाचे खापर पुन्हा एकदा भाजप आणि शिवसेनेवर फोडून मोकळे झाले. एकनाथ शिंदे जर खरेच गद्दार असते तर, प्रत्येक निवडणुकीत त्यांच्यावर विश्वास दाखवत जनतेने त्यांना भरभरुन मतदान केलेच नसते. पक्ष होता तेव्हा आणि गट झाल्यावरही आपले आमदार, खासदार सांभाळता न आल्याने उध्दव ठाकरेंचे नेतृत्व उघडे पडले, हे मात्र नक्की.'तुम्हाला देण्यासाठी माझ्या हातात काहीच नाही. ते रिकामे आहेत' या तुमच्या रोजच्या रडगाण्याला लोकप्रतिनिधी वैतागले असावेत. आता तरी उध्दव ठाकरे 'धृतराष्ट्रा'च्या भूमिकेतून बाहेर पडून आत्मचिंतन करतील, ही अपेक्षा. अन्यथा, पुढील 'ऑपरेशन टायगर-२' अटळ आहे.

**-प्रदीप खोलमकर,** नाशिक
मो-८७६७५९२९८०

## खा.संजय देशमुखांची 'एकादशी शिवरात्रीच्या घरी!'



**माझेही मत**

वाशिम यवतमाळ लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीमान संजयजी देशमुख यांनी उबाठाला 'जय महाराष्ट्र' करून संसदेत स्थापन झालेल्या वेगळ्या गटात सामिल झाले.उबाठाचा व्हीप झुगारून त्यांनी वेगळी चूल मांडली.कायदेशीर बाबी काहीही असोत पण जमिनी हकिकतही विचारात घेणे जरूरीचे आहे.ते शिंदेसेनेत किंवा भाजपात जाणार असल्याच्या खबरा अनेक महिन्यांपासून ऐकिवात होत्या.

श्री.संजय देशमुख यांच्याशी माझी उठबस नसली तरी बऱ्यापैकी जिव्हाळा होता.मी जर एखादी सूचना केली तर ते गांभीर्याने घेत.त्यांच्याप्रति माझ्या मनात सद्भावना होत्या.आता ते शिंदेसेनेत येणार असतील तर प्रेमात वृद्धीच होईल.असे असले तरी त्यांनी उबाठा सोडू नये असे माझे स्पष्ट मत होते.ही बाब त्यांना मी बोललो नसलो तरी त्यांच्या कार्यकर्त्यांशी अनौपचारिक गप्पात मी आवर्जून बोलत असे.

खरं तर ! वाशिम यवतमाळ लोकसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा अभेद्य गड आहे.त्यातही अपराजित खासदार भावना गवळी यांनी त्यांचा एकखांबी तंबू मजबूत ठेवला आहे.मागील वेळी मा.एकनाथजी शिंदे यांना दुर्बुद्धी झाली आणि त्यांनी वाशीमची उमेदवारी ऐन वेळेवर हेमंत पाटलांना दिली.त्यावेळी हेमंत पाटलांना हिंगोली आणि यवतमाळ भावना गवळींना दिली असती तर दोन्ही जागा शिंदेसेनेच्या असत्या.दुर्दैवाने तसे झाले नाही .त्याचा फायदा खा.संजय देशमुखांना झाला.ते निवडून आले.हे कटू सत्य आहे.

शिंदेसेनेने शेवटच्या क्षणी केलेला आगाऊ उपद्व्याप शिंदेंना भोवला.खा.संजय देशमुखांना उमेदवारी पुरेशी आधी जाहिर झाल्यामुळे समीकरणे बदलली.प्रचारात योग्य बाबी मांडल्याने खा.संजय देशमुखांना तटस्थ मतदारांनी एकसंघ मतदान केले.वाशिम शहरात तर मतांचा फुलोरा खूपच बहारदार झाला.लोकांनी संजय देशमुखांना प्रचंड मतांनी निवडून दिले.

वाशीमकरांनी इतके मतदान केले की एका खाजगी भेटीत खा.देशमुख मला म्हणाले की

'मी वाशीमला रहायला येतो!'सर्वांनी पक्षभेद विसरून विकासकामात मदत करण्याचेही ठरविले.या मतदारसंघात त्यांना जनतेची कुठलीच अडचण नव्हती.महायुतीतही त्यांचे बरे होते.केंद्रातील नितीनजी सह अनेक मंत्री त्यांना विकासकामात मदत करीत होते.जनतेच्या मनात त्यांनी बऱ्यापैकी स्थानही मिळवले होते.सर्व सुरळीत चालू असतांना पक्ष सोडण्याची दुर्बुद्धी त्यांना का झाली असेल? हा प्रश्न अनुत्तरीत आहे.त्यांनी उचललेल्या पाऊलामुळे त्यांच्या जवळचा कार्यकर्ता वर्ग विरोधात गेला.त्यांच्या कारभारी कार्यकर्त्यांनीच त्यांचे पुतळे जाळले.

श्री.देशमुख शिंदेसेनेत आले तर आ.भावना गवळी आणि ना.संजय राठोड यांच्याशी त्यांचे कितपत जुळेल याबाबत शंका आहे.अशा स्थितीत काही लोक त्यांच्यासोबत राहतीलही पण ते छद्मवेषात असतील.

केंद्रातही ते शिंदेसेनेत असतील.इथून पुढे शिंदेसेना संसदेत दबावगटासारखे काम करण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे उपद्रवमूल्यासाठी यांचा वापर शिंदेगट निश्चित करेल.त्यामुळे भाजपचे मंत्री सापत्न वागणूक देतील.म्हणजे आगीतून उठले अन फुफुट्यात पडले.अशी स्थिती निश्चित होणार.म्हणजे 'एकादशीच्या घरी शिवरात्र' होणार आहे.उघड्या पाशी नागडे गेले.

आता त्यातही त्यांनी काही गोष्टी केल्या तर वावटळीत दिवा लागू शकतो.

१) मतदारसंघात आ.भावना गवळी आणि ना.संजय राठोड यांच्याशी हृदयाच्या गर्भितार्थाने जुळवून घ्यावे.

२) भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र मंत्र्यांशी जराशी 'पण'नजरेत येणार नाही अशी गाठ बांधावी.

३) शिंदेसेनेतील सर्व गटाचे,घटक पक्षातील सर्व गटाच्या सामान्य कार्यकर्त्यांच्या घरी जावून संपर्क करावा.तेच तारणहार ठरू शकतात.

४) खंबीरपणे,विचलित न होता दौरे सुरू ठेवावेत.

५)इकडे आधिच पायलीचे पन्नास नेते आहेत तिथे आपली उदबत्ती लावायची म्हणजे दिव्यच पण करा अचूक प्रयत्न.

६) गट तट मठ यांच्या नादी लागू नका.

खरं सांगू ! खा.देशमुखांनी उचललेले पाऊल भविष्यासाठी आत्मघात आहे.पुढे त्यांची डाळ शिजेल याची शक्यता धूसरच आहे.

पण घेतलाच आहे निर्णय तर 'लोकविरुद्ध'बाबी टाळून पुढे जाणे हाच शुभ मंत्र कामी येईल.

सत्तेत गेलाच आहात तर विकास कामाचा धडाका सुरू ठेवा.काहीतरी ठोस करून दाखवा.त्यासाठी इच्छाशक्ती ठेवा.

पन्नास खोके बिके यावर मी विश्वास ठेवत नाही.तितका मी भोळा आहे.पण मिळालेच असतील तर जनसेवेत लावा !

**विद्यावाचस्पती प्रा.दिलीप जोशी,वाशिम.**
मो.९८२२२६२७३५

## कराराची चौकट आणि ट्रंप

इराणाबरोबरचे युद्ध थांबवण्यासाठी करायच्या कराराची चौकट ठरवणारा समझोता ट्रंप यांनी तयार केला आहे. या चौकटीनुसार पुढल्या ६० दिवसात करार व्हायचा आहे. ही चौकट आहे, करार नाही. ट्रंपना युद्धातून बाहेर पडायचे होते, तेवढेच या करारामुळे शक्य झाले.

समझोत्यातली कलमे अशी. होर्मुझ खाडी मुक्त होईल. इराण आणि लेबनॉनमधले युद्ध थांबेल. इराण अणुबाँब तयार करणार नाही. इराणची गोठवलेली संपत्ती मोकळी केली जाईल. युद्धामुळे उध्वस्थ झालेला इराण पुन्हा उभा करण्यासाठी इराणला ३०० अब्ज डॉलर देणारा फंड तयार केला जाईल. इराणवरचे आर्थिक निर्बंध उठवले जातील.

हा करार इस्रायलला मंजूर नाही. युद्ध थांबवणे, इराणला ३०० अब्ज डॉलर देणे, इराणवरचे आर्थिक निर्बंध उठवणे, इराणला तेल व्यापार पूर्वीप्रमाणेच करू देणे, यामुळे इराणला स्वतःची ताकद वाढवण्याची आणि आर्थिक जमवाजमव करायची उसंत मिळेल असे इस्रायलला वाटते.

ट्रंप यांच्या अमेरिकन पाठीराख्यांना समझोता मंजूर नाही. इराणला ठेचायचे म्हणून तर अब्जावधी रुपये खर्चून अमेरिकेने इराणवर हल्ले केले. इराणला पैसे देणे, इराणचे गोठवलेले पैसे परत करणे, इराणला व्यापाराला परवानगी देणे म्हणजे केलेले युद्द चुकीचे होते असा अर्थ होतो. ट्रंप पाठीराख्यांना ते मंजूर नाही.ट्रंपचे पाठीराखे नसलेल्या लोकांना मुळातले युद्धच मान्य नव्हते.त्यामुळे त्यांचा ट्रंपना विरोध आहेच.

ट्रंपना समझोता महागात पडला असून युद्धही महागात पडलेले आहेच. ट्रंप करार करण्यासाठी प्रसिद्ध आहेत, करार अमलात आणण्यासाठी नाहीत.ट्रंप जे करार करतात ते भुसभुशीत, विसविशीत आणि संदिग्ध असतात. इराण मदतीचा ३०० अब्ज डॉलरचा फंड कसा तयार होणार? इस्रायल एक पैसाही देणार नाही. आखातातल्या देशांना युद्द महागात पडले. इराणने केलेले हल्ले आणि बंद पडलेली तेल निर्यात यामुळे आखाती देशांचे प्रचंड नुकसान झाले. ते भरून काढायचा विषय ट्रंप काढत नाहीत, उलट म्हणतात की इराण पुनर्निर्माण फंडात आखाती देशांनी पैसे घालावेत. आखाती देश अजिबात तयार नाहीत. युरोप, जपान, ऑस्ट्रेलिया इत्यादी लोक युद्धापासून दूरच होते. एक खडकूही देणार नाहीत.



अमेरिकन जनतेचो तर विचारायलाच नको. अमेरिकन काँग्रेस पैसे देणार नाही. मेक अमेरिका ग्रेट वाले तर ट्रंपना दारातही उभे करणार नाहीत. ट्रंप ज्या देशाचे वर्णन खूंख्वार दहशतवादी मुस्लीम देश असे करत त्या देशाला पैसे?

इराणवरचे आर्थिक निर्बंध (सँक्शन्स) उठवणार?युद्धाला सुरवात होण्याच्या आधी घातलेले निर्बंध युद्ध झाल्यावर उठवणे म्हणजे युद्ध केल्याबद्दल बक्षीस देण्यासारखेच होईल.ओबामा यांनी अण्वस्त्र निर्मिती १५ वर्षासाठी पुढे ढकलणारा करार करून इराणवरचे निर्बंध उठवले होते. त्यांना बसता उठता त्यासाठी शिव्या देणाऱ्या ट्रंपनी निर्बंध उठवले तर ट्रंपच्या पाठीराख्यांची होणारी गोची भीषण असेल.

इराणामधील दहशतवादी सत्ता उध्वस्थ करणे यासाठी ट्रंपनी युद्ध उचकवले होते. तिथली सत्ता अजिबात उध्वस्थ झाली नाही. अतिरेकी धर्मवादीच सत्तेत व्यवस्थित शिल्लक आहेत. पाच दहा नेते मारले, त्यांची जागा त्यांच्यापेक्षा अधीक जहाल अनुयायांनी घेतली.

### इराणचा धोका कोणाला होता?

अमेरिका कित्येक हजार किमी दूरवर आहे. इराणची रॉकेट अमेरिकेपर्यंत पोचू शकत नाहीत. धोका असल्यास इस्रायलला होता. इस्रायलचे दुखणे अमेरिकेने उसने घेतले. इस्रायलचा धोका कमी झालेला नाही.अमेरिकेने इराणवर चाळीस हजार पेक्षा जास्त हवाई हल्ले केले. अमेरिकेच्या सीआयएने अहवाल दिला की ड्रोन आणि रॉकेटे यांची ७० टक्के संख्या इराणमधे अजूनही शाबूत आहे. १०० ड्रोन आणि रॉकेटे यातली ९८ ड्रोन रॉकेटे अमेरिका-इस्रायल हवेतच पाडतात अशी आकडेवारी अमेरिका सांगते. याचा अर्थ ० हजार ड्रोन, रॉकेटातली २०० इस्रायल आणि आखाती देशांवर पडतात. त्याने नुकसान तर होतेच ना.

एक अपाचे हेलेकॉप्टर ४५०कोटी डॉलरचे असते. एक बाँबर विमान ९०० कोटी डॉलरचे असते. ४ ते ४० लाख डॉलर किमतीचे रॉकेट आणि २५ ते ३० लाख किमतीचे ड्रोन अपाचे आणि बाँबर पाडू शकतात, त्यांचे नुकसान करू शकतात. इराण कित्येक वर्षं लढाई चालवू शकते. अणुबाँबची आवश्यकताच नाही.

या साऱ्या गोष्टी अमेरिकन लष्कराला माहीत होत्या, पण ट्रंप त्यांचे ऐकत नव्हते, आजही ऐकत नाहीत. इराणच्या अण्वस्त्र निर्माण करणाऱ्या इमारतींवर केलेल्या हल्ल्यांमुळे इमारतींचे नुकसान झाले, अणु कार्यक्रम नष्ट झाला नाही असा रिपोर्ट अमेरिकन गुप्तचरांनी दिला. ट्रंप म्हणतात की गुप्तचर विभागाला काही कळत नाही.

अमेरिका आणि इस्रायल यांची लष्करी ताकद इराणच्या ताकदीपेक्षा किती तरी मोठी आहे. इराणला ते माहीत आहे. अमेरिका आणि इस्रायलची दमछाक करणे, त्यांना छळ छळ छळणे असे इराणचे धोरण आहे. अमेरिकेचा पराभव हे इराणचे धोरण नाही, अमेरिकेला रडवायचे असे इराणचे धोरण आहे.

युद्ध होणे, युद्ध लांबणे,अमेरिकेला परवडत नाही. अमेरिकेच्या संरक्षक छत्रीत सुखाने वावरणाऱ्या आखाती देशांनाही युद्ध परवडत नाही. युद्ध थांबवणे ही ट्रंप यांची गरज आहे, पण एका परीने ती ट्रंप यांची फजिती आहे. ट्रंपना युद्ध थांबवण्यावाचून गत्यंतर नाही. त्यातूनच प्रस्तुत समझोता तयार झाला.

ट्रंप खुष, ट्रंप स्वतःवर खुष येवढी एकच गोष्ट घडत असते.तेच समझौत्यात घडले. इस्रायल-इराण-पॅलेस्टाईन वैर संपणार नाही, मारामाऱ्याही संपणार नाहीत.माणसाची आर्थिक-वैज्ञानिक वगैरे प्रगती खूप झाली. मन अजून रानटीच आहे. त्याला काय करणार?

**-निळू दामले**

## सुंभ जळला पण पिळ कायम

अमेरिकेने संपूर्ण जगाचा ठेका घेतला आहे असे वाटते. ओमानच्या आखातामध्ये व्यापारी नौकेवर आक्रमण करून अमेरिकेने भारताच्या तीन खलाशांचा जीव घेतला. कारण काय म्हणे तर त्या भागात शांती आणि सुरक्षित वातावरण राहण्यासाठी अमेरिकन सैन्याने आदेश दिल्यानंतरही नौका थांबली नाही आणि त्यामुळे आम्ही आक्रमण केले. इथे अमेरिकेला कोणी अधिकार दिला की त्यांनी इतर देशांच्या खलाशांवर आक्रमण करायचे आणि त्यांचे जीव घ्यायचे. नको तिथे नाक खुपसण्याची अमेरिकेची सवय अजून गेलेली नाही! संपूर्ण जगावर आपली मक्तेदारी आहे असे अमेरिकेला वाटते काय? या प्रसंगानंतर भारत आणि अमेरिका यांच्यातील तणाव वाढल्याचे लक्षात येत आहे. पहिले टेरिफ अव्वाच्या सव्वा लावून त्यांनी भारताशी प्रतारणा केली आणि आता खलाशांचा मृत्यूमुळे भारत अमेरिका संबंध खराब होऊ पाहत आहेत.परराष्ट्रमंत्री डॉ. एस्. जयशंकर यांनी अमेरिकेची यासंदर्भात कान उघडणी केली आहे. व्यापारी नौकांवर करण्यात आलेले आक्रमण भारताला अमान्य असल्याचे त्यांनी सांगितले. अमेरिकेची दादागिरी संपूर्ण विश्वावर अशीच चालू राहील का? इकडे नोबल शांतीचा पुरस्कार मागायचा आणि तिकडे युद्ध करायचे अशा विसंगत वागण्याला काय म्हणायचे?

**डॉ. भारती हेडाऊ,** यवतमाळ

## मुंबई-अमरावती गाडीचा वेग वाढवा

अकोला-अमरावती हे अंतर फक्त ८८ किलोमीटर आहे. १२१११ मुंबई-अमरावती मार्गावर हे अंतर २ तास २० मिनिटांत पार होते. आपल्या देशात ताशी सरासरी ३०० किलोमीटर वेगाची बुलेट ट्रेन चालवण्याची चर्चा आहे. मात्र, जर ही सुपरफास्ट ट्रेन अशा स्थितीत असेल, तर बुलेट ट्रेनचा वेग काय असेल ही चिंतेची बाब आहे. आम्ही रेल्वे विभागाला विनंती करतो की, त्यांनी सर्वप्रथम सुपरफास्ट ट्रेनचा वेग वाढवावा. या मार्गावर धावणाऱ्या बहुतेक सुपरफास्ट ट्रेन्सना २ तासांपेक्षा जास्त वेळ लागतो. आम्हाला आशा आहे की रेल्वे विभाग याकडे लक्ष देईल.

**राजेश पी, कारिया**
राधे नगर,अकोला

## संक्षिप्त




### प्राथमिक आरोग्य केंद्रात शिबीर

**नांदगाव खं-**प्राथमिक आरोग्य केंद्र सातरगाव अंतर्गत उपकेंद्रात 'माझ गाव आरोग्य संपन्न गाव' मोहीम अंतर्गत आरोग्य तपासणी शिबीर वैद्यकीय अधिकारी डॉ.राजीव धोत्रे यांच्या प्रेरणात्मक मार्गदर्शनाने आयोजित करण्यात आल. शिबिरामध्ये गर्भवती महिला, पीएनसी महिला तपासणी, बीपी, शुगर, इसीजी तपासणी, क्षयरोग रुग्णांचे थुंकी नमुने घेण्यात येऊन त्यांना योग्य आरोग्य शिक्षण देण्यात आले. सिकलसेल आजाराबाबत जनजागृती व मार्गदर्शन करण्यात आले पॉलिटिव केअर रुग्णा संबंधित योग्य जोपासना करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.शिबिराकरिता शितल ननावरे उपसरपंच,अनुराधा उभाळे आरोग्य सामुदाय अधिकारी, प्रीती डोंगरे आरोग्य सेविक दत्ता केणे आरोग्य सेवक,मीना भागत,मनोज ताठे जलसुरक्षक,पद्मा ढगे आशा वर्कर,शालिनी इंगोले यांच्या सहकार्याने शिबीर पार पडले.

### रविवारी रंगणार पाऊसगाणी 'जरा जमके बरसो'

**अमरावती-**पावसावर आधारित मराठी- हिंदी गीतांचा बहारदार कार्यक्रम 'जरा जमके बरसो' रविवारी ता. २१ ला संध्याकाळी ६ वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर रंगमंचावर रंगणार आहे. साहस वैदर्भीद्वारा आयोजित आणि मैत्र जिवांचे प्रस्तुत या कार्यक्रमात आशुतोष देशपांडे, शीतल भट, केतकी मोहदरकर- देशपांडे आणि आदित्य खारोकर पावसाची जुनी, नवी गाजलेली गाणी सादर करतील. लोकप्रिय निवेदक नितीन भट मैफलीचे निवेदन करतील. सिंथसायझरवर रामेश्वर काळे, तबल्यावर विशाल पांडे, ढोलकवर मनीष आत्राम आणि ऑक्टोपॅडवर वीरेंद्र गावंडे संगत करतील. स्वरा शास्त्रीय संगीत वर्ग, सरोदे ऑप्टिकल्स, ज्योती चेम्पोरियम आणि जोशी व्हेक्टर अॅकॅडमी यांच्या सह्योगाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अमरावतीकर रसिकांनी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून गाण्यांचा आस्वाद घेण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने हेमंत थेटे यांनी केले आहे.




### जिल्हाधिकारी कार्यालयात महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन

**अमरावती-**महान योद्धा मेवाडचे क्रांतीसूर्य राजे महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण अभिवादन केले. यावेळी उपस्थित अधिकारी-कर्मचारी यांनीही राजे महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

### महाराणा प्रतापसिंह यांना आदरांजली

**अमरावती-**महान योद्धा मेवाडचे क्रांतीसूर्य राजे महाराणा प्रतापसिंह



यांच्या जयंती निमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण अभिवादन केले.यावेळी उपस्थित अधिकारी-कर्मचारी यांनीही राजे महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.



### महानगरपालिकेत महाराणा प्रतापसिंह जयंती

**अमरावती-**महाराणा प्रतापसिंह जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम महानगरपालिकेत संपन्न झाला. महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते महाराणा प्रतापसिंह यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले.यावेळी स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, जनसंपर्क अधिकारी प्रविण इंगोले, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, शिवा फुटाणे,अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

---

मालमत्ता कर थकबाकीदारांवर महानगरपालिकेची कारवाई

# गोल्डन किड्स हायस्कूल व अग्रेसन पेट्रोल पंपाला जप्तीच्या नोटीस

**अमरावती/का.प्र.**

उत्तर झोन क्र.१ चे सहाय्यक आयुक्त यांच्या आदेशान्वये मालमत्ता कर थकबाकीदारांवर विशेष वसुली मोहीम राबविण्यात येत असून १७ जून २०२६ रोजी दोन थकबाकीदार आस्थापनांवर जप्तीची कारवाई करण्यात आली.या अंतर्गत गोल्डन किड्स हायस्कूल यांच्याकडे मालमत्ता कराची रुपये ११,२३,८०८/- इतकी थकबाकी असल्याने जप्तीची नोटीस बजावण्यात आली. तसेच संबंधितांना सात दिवसांच्या आत थकबाकीची रक्कम भरण्याबाबत सूचना देण्यात आल्या. निर्धारित



मुदतीत रक्कम जमा न केल्यास मालमत्ता जप्ती संदर्भात सिलिंगची कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

तसेच अग्रेसन पेट्रोल पंप यांच्याकडे मालमत्ता कराची रुपये ४,२२,५०६/- इतकी थकबाकी असल्याने त्यांनाही जप्तीची नोटीस बजावण्यात आली. संबंधितांना सात दिवसांच्या आत थकबाकीची रक्कम भरण्याचे निर्देश देण्यात आले असून, रक्कम न भरल्यास जप्ती संदर्भात सिलिंगची कारवाई करण्यात येईल, याबाबत अवगत करण्यात आले.महानगरपालिकेने मालमत्ता कर थकबाकीदारांनी तात्काळ कर भरणा करून कठोर कारवाई टाळावी, असे आवाहन केले आहे.सदर कारवाई झोन क्रमांक १ सहायक आयुक्त अंतर्गत करण्यात आली. यावेळी सहायक क्षेत्रीय अधिकारी केशव ठाकरे, कर निरीक्षक संजय खडसान, माहुरे, सचिन गोहर, जितेंद्र श्रीवास्तव तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

## दस्तुरनगर परिसरात थकबाकीदार मालमत्ता धारकांना जप्ती नोटीस



**अमरावती-**अमरावती महानगरपालिका पूर्व झोन क्र. ३ अंतर्गत दस्तुरनगर परिसरात मालमत्ता कराच्या थकीत देयकांच्या वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान थकबाकीदार मालमत्ता धारकांना जप्ती नोटिसा बजावण्यात आल्या. महानगरपालिकेच्या माहितीनुसार, वार्ड क्र. ८ मधील मालमत्ता क्रमांक ११४ चे धारक रविराज हिम्मतराव देशमुख यांचे पेट्रोल पंप, विद्यापीठ कॉलनी, एमआयडीसी रोड यांच्याकडे सुमारे ९ लाख रुपयांची थकबाकी असून त्यांना जप्ती नोटीस देण्यात आली. तसेच मालमत्ता क्रमांक ९३८ चे धारक किचन ३६५चे महेश पहुमल छाबडा यांच्याकडेही ९ लाख रुपयांची थकबाकी असल्याने त्यांनाही नोटीस बजावण्यात आली.याशिवाय एमआयडीसी परिसरातील मालमत्ता क्रमांक २२५५-३ चे धारक जाधव ग्रुप यांच्याकडे ५ लाख ५५ हजार रुपयांची थकबाकी असल्याने संबंधित मालमत्तेस जप्ती नोटीस देण्यात आली.ही कारवाई सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी शेखर सोनकांबळे, वसुली लिपीक दीपक सरसे, राज डेंडुले तसेच भागिरथ खैरकर उपस्थित होते.महानगरपालिकेने थकीत मालमत्ता कर त्वरित भरावा, अन्यथा जप्ती व पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा थकबाकीदारांना दिला आहे.

## शहानुर प्रकल्पात केवळ ३५ टक्के पाणीसाठा शिल्लक

### ऑगस्ट महिन्यापुरतेच पाणी; म.जी.प्रा.चे नागरिकांना जपून वापरण्याचे आवाहन

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

यंदा दुष्काळाचे सावट गडद होत असताना अंजनगाव सुर्जी तालुक्यासाठी जीवनदायिनी ठरणाऱ्या शहानुर प्रकल्पातील पाणीसाठ्याने चिंता वाढवली आहे. सध्या प्रकल्पात केवळ ३५ टक्के इतकाच पाणीसाठा शिल्लक असून तो फक्त येणाऱ्या ऑगस्ट महिन्यापुरताच पुरेल, असा इशारा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासनाने दिला आहे.महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपकार्यकारी अभियंता अनिकेत केलो यांनी नागरिकांना पाण्याचा काटकसरीने व जपून वापर करण्याचे आवाहन केले आहे.



पाणीटंचाई टाळण्यासाठी प्रशासनाने काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. नळांना तोट्या बसवा. पाणी वाया जाणार नाही याची काळजी घ्या. गळती तात्काळ दुरुस्त करा. घरातील व सार्वजनिक नळांची गळती थांबवा.पुनर्वापरावर भर द्या. भाज्या धुतलेले पाणी झाडांना द्या. वाहने धुणे, अंगण शिंपडणे टाळा. अतिरिक्त पाणी वापरणारे कामे पुढे ढकला. अशा सुचना नागरिकांना अंजनगाव सुर्जी जीवन प्राधिकरण उपकार्यकारी अभियंता अनिकेत केलो यांनी नागरिकांना केल्या आहे.

## धनंजय औंढेकर महावितरणच्या संचालक पदी रूजू

**अमरावती/का.प्र.**

महावितरण कंपनीचे संचालक (संचालन) म्हणून धनंजय औंढेकर यांनी गुरूवारी कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते कार्यकारी संचालक (वितरण/प्रकल्प) म्हणून कार्यरत होते. श्री. औंढेकर गेल्या २९ वर्षांपासून महावितरणमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत.

नवनियुक्त संचालक (संचालन) धनंजय औंढेकर हे मूळचे औंढा नागनाथचे (जि. हिंगोली) आहे. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी तसेच एमबीए (फायनान्स), एनर्जी ऑडिटर, नवी दिल्ली येथून अॅडव्हॉन्स सर्टिफिकेट इन पॉवर डिस्ट्रीब्यूशन मॅनेजमेंट अभ्यासक्रम विशेष प्रावीण्यासह पूर्ण केला आहे. संचालक श्री. औंढेकर हे १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून माजलगाव (जि. बीड) येथे रूजू झाले. सन २००६ मध्ये थेट निवड प्रक्रियेतून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. त्यानंतर २०१६ मध्ये थेट निवड प्रक्रियेतून अधीक्षक अभियंता तर २०१९ मध्ये पदोन्नतीने मुख्य अभियंता पदी निवड झाली. या विविध पदांवर श्री. औंढेकर यांनी बीड, परभणी, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे, सोलापूर, कल्याण, मुंबई मुख्यालयात काम केले आहे.



संचालक (संचालन) औंढेकर हे २०२४ पासून कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या या कार्यकाळात महावितरणने मागेल त्याला सौर कृषिपंपमध्ये देशात प्रथम स्थान मिळवले. एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्याचा जागतिक विक्रम केल्याचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने जाहीर केले आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घराच्या छतावरील सौर प्रकल्पांमध्ये देशात द्वितीय स्थान पटकावले. या योजनेसाठी महावितरणने देशात सर्वप्रथम फेसलेस-पेपरलेस ही ऑनलाइन सुविधा सुरु केली. नवीन वीजजोडणी, ग्राहक नावात बदल आणि वीजभार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजुरीची प्रक्रिया सुरु केली. यामध्ये संचालक श्री. औंढेकर यांचे मोठे योगदान आहे.'अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात सांघिक कामगिरीतून कंपनीला अधिक सक्षम, ग्राहकस्नेही व हरित ऊर्जेकडे नेण्यास आणखी प्राधान्य देण्यात येईल. नवीन वीजजोडणीची प्रक्रिया फेसलेस-पेपरलेस म्हणजे पूर्णतः ऑनलाईन करण्यात येईल. सुरळीत वीजपुरवठा, दर्जेदार ग्राहकसेवा, वीज हानीमध्ये घट आणि महसूलवाढ हे मुख्य ध्येय आहे', असे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी सांगितले.

# आमदाबाद स्मशानभूमीचे बांधकाम निकृष्ट

### कंत्राटदार विरोधात ग्रामस्थ आक्रमक, शव पंचायत स. कार्यालयात जाळण्याचा इशारा

**कुऱ्हा/वार्ताहर**

तिवसा पंचायत समिती कक्षेत येणाऱ्या गट ग्रामपंचायत पालवाडी मधील आमदाबाद येथे जनसुविधा योजनेअंतर्गत मंजूर स्मशानभूमी बांधकाम मंजूर झाले व कंत्राटदाराने काम थातूर-माथुर काम लगबगीने केले. मात्र कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याच्या अनेक तक्रारी ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे केल्या व अखेर काम सुस्थितीत न केल्यास अहमदाबाद येथील प्रत्येक शव तिवसा पंचायत समितीच्या आवारात अग्नी दिल्या जाईल असा इशारा ग्रामस्थांनी देताच गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे यांनी कामाची पाहणी केली.कामांमध्ये दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे निष्पन्न झाले.

आमदाबाद येथील स्मशानभूमी करता जन सुविधे योजनेअंतर्गत सात लक्ष रुपये मंजूर झाले होते त्यानुसार कामाचा



कंत्राट दिल्या गेला कंत्रालदाराने बांधकामात प्रारंभ केला मात्र पायाभरणी पोकळ केल्या मुळे बांधकामाला तडे गेले सदर स्मशानभूमीचे लोकार्पण होण्यापूर्वीच ठिकठिकाणी भेगा गेल्या असून पायाभरणीच्या वेळी अत्यंत निष्काळजीपणा केल्याचे प्रत्यक्ष पाहणी निश्चित झाले आहे.राजकीय आशीर्वाद व हस्तक्षेपाच्या दडपणात तालुक्यातील काही कंत्राटदार कामाची निविदा दाखल करतात व काम मिळवण्यासाठी राजकीय दबाव तंत्राचा उपयोग करतात हे सर्व सूत असून सुद्धा ज्या राजकीय व्यक्तीने कंत्राटदाराची शिफारस केली त्याने कामाचा किमान दर्जा राखून काम करणे गरजेचे आहे मात्र अहमदाबाद स्मशानभूमीचे काम कंत्राटदाराने अत्यंत निकृष्ट केले असून या कामाला कॉलिटी कंट्रोल विभाग कशी मंजुरात देते हे सुद्धा न उलघडणारे कोडेच असून सदर कंत्राटदाराला कायमचे ब्लॅक लिस्ट करा अशी मागणी ग्रामस्थांनी केलेली आहे. याबाबत दिवसा गटविकास अधिकारी विकास अभिषेक कासोदे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सदर काम अत्यंत निकृष्ट दर्जाहीन असल्याचे सांगितले असून वरिष्ठाकडे अहवाल पाठवणार असे बोलताना सांगितले.


अमदाबाद येथील स्मशानभूमीच्या कामाबद्दल ग्रामस्थांच्या वारंवार तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. दोनदा भेट दिली असता तक्रारीत तथ्य असल्याचे दिसून येते. सदर बाबतीत कंत्राटदारांना सूचना देऊनही सुधारणा न झाल्याने याबाबत कारवाईचा प्रस्ताव वरिष्ठ स्तरावर पाठवला आहे.

**अभिषेक कासोदे,**
गट विकास अधिकारी तिवसा

## जैन क्रिकेट कार्निव्हल सीझन १ चे पहिला पर्व उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

जैन क्रिकेट कार्निव्हल सीझन १ चा पहिला पर्व बडनेरा रोडवरील खेळ कट्टा मल्टीस्पोर्ट्स टर्फ अरेना येथे उत्साहात झाला. ९ संघ आणि ९५ खेळाडूंच्या सहभागाने चार दिवस रंगलेल्या या स्पर्धेत क्रिकेटप्रेमींना रोमांचक सामने अनुभवायला मिळाले.ही स्पर्धा मूळतः शनिवार व रविवार आयोजित करण्यात आली होती. मात्र, मुसळधार पावसामुळे सामने पुढे ढकलावे लागल्याने स्पर्धा मंगळवार रात्रीपर्यंत वाढविण्यात आली. अत्यंत चुरशीच्या साखळी फेरी व अव्वल पाच संघांमधील थरारक बाद फेरीच्या सामन्यांनंतर निशांत मुनोत यांच्या नेतृत्वाखालील प्रेरणापुंज पँथर्स संघाने अंतिम सामन्यात विपिन जैन यांच्या सोलर किंग्स संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले. स्पर्धेतील वैयक्तिक पुरस्कार विजेत्यांमध्ये उत्कृष्ट फलंदाज: विपिन जैन (सोलर किंग्स),उत्कृष्ट गोलंदाज : पूर्वेश देवडा (पारस स्ट्रायकर्स), सर्वोत्कृष्ट खेळाडू : स्मिथ दोशी (दोशी डायनामाइट्स),या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक करण कोठारी ज्वेलर्स होते. फोनबुक हे सहप्रायोजक, राजलक्ष्मी




इलेक्ट्रॉनिक्स व्यवस्थापन भागीदार, जालाराम मिठाईया पॉवर्ड बाय भागीदार आणि ब्लुवा को-पॉवर्ड बाय भागीदार होते. तसेच बॉम्बे डाइस (ट्रॉफी पार्टनर), खेळ कट्टा (स्थळ भागीदार), मल्टी क्रिएशन (क्रिएटिव्ह पार्टनर) आणि बाबुजी पॉलीक्लिनिक (हेल्थ पार्टनर) यांनीही मोलाचे सहकार्य केले.प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीतही स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी मोहित बोकरिया, डॉ. अभिनंदन बोकरिया आणि रोहन देओलासी यांच्या विशेष परिश्रमांचे कौतुक करण्यात आले.स्पर्धेचे आयोजकांनी सर्व सहभागी खेळाडू, संघनायक, प्रायोजक आणि समर्थकांचे आभार मानत जैन क्रिकेट कार्निव्हलच्या पहिल्या पर्वाला भरघोस यश मिळवून दिल्याबद्दल अभिनंदन केले. क्रिकेट आणि क्रीडाभावनेचा हा उत्सव सर्वांसाठी अविस्मरणीय ठरल्याचे त्यांनी नमूद केले.

---

# 'एआय'च्या आकर्षणापलीकडे: संगणक अभियांत्रिकी का ठरते व्यापक?




एमएचटी-सीईटी चा निकाल लागल्यानंतर विद्यार्थी आणि पालकांसमोर उभा राहणारा सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे अभियांत्रिकीची कोणती शाखा निवडावी? सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स-एआय) या क्षेत्राची मोठी चर्चा असल्यामुळे अनेक विद्यार्थी एआय शाखेकडे आकर्षित होत आहेत. मात्र शाखा निवडताना केवळ नाव किंवा सध्याचा ट्रेंड न पाहता काही महत्त्वाच्या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही संगणक विज्ञानातील एक विशेषीकृत शाखा आहे. तर संगणक अभियांत्रिकी (कम्प्युटर इंजीनीरिंग) ही अधिक व्यापक स्वरूपाची शाखा आहे. यामध्ये प्रोग्रामिंग, सॉफ्टवेअर विकास, डेटाबेस, नेटवर्किंग, सायबर सुरक्षा, क्लाउड कॉम्प्युटिंग, डेटा सायन्स तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता यांसह अनेक विषयांचा समावेश असतो. त्यामुळे संगणक अभियांत्रिकीमधील विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये करिअरच्या संधी उपलब्ध होतात.

याच संदर्भात प्रवेश प्रक्रियेतील मागील काही वर्षांच्या कटऑफचा अभ्यास करणेही उपयुक्त ठरते. अनेक नामांकित महाविद्यालयांमध्ये संगणक अभियांत्रिकी शाखेचा कटऑफ कृत्रिम बुद्धिमत्ता शाखेपेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. याचा अर्थ असा की गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा कल अजूनही व्यापक आणि सर्वसमावेशक असलेल्या संगणक अभियांत्रिकी शाखेकडे अधिक आहे. यामागे मुख्य कारण म्हणजे संगणक अभियांत्रिकीमुळे विद्यार्थ्यांसमोर करिअरचे अधिक पर्याय खुले राहतात. पुढे जाऊन विद्यार्थी कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा, क्लाउड कॉम्प्युटिंग किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवू शकतात.



**प्रा.डॉ.मंदार कृष्णराव देशमुख**
सहयोगी प्राध्यापक, संगणक अभियांत्रिकी विभाग, अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, अकोला

याचा अर्थ एआय शाखा कमी दर्जाची आहे असे अजिबात नाही. उलट, भविष्यात एआय क्षेत्राची मागणी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. मात्र विद्यार्थ्यांनी हे समजून घेतले पाहिजे की एआय शिकण्यासाठी केवळ एआय शाखेत प्रवेश घेणे आवश्यक नाही. संगणक अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनाही एआय, मशीन लर्निंग आणि डेटा सायन्समध्ये उच्च शिक्षण घेण्याच्या आणि करिअर घडविण्याच्या समान संधी उपलब्ध असतात.

सर्वप्रथम हे लक्षात घ्यावे की महाविद्यालयाची गुणवत्ता ही शाखेइतकीच, किंबहुना काही वेळा शाखेपेक्षाही अधिक महत्त्वाची असते. जर विद्यार्थ्याला चांगल्या दर्जाचे महाविद्यालय मिळत असेल, जिथे अनुभवी प्राध्यापक, उत्कृष्ट प्रयोगशाळा, उद्योगांशी संबंध, इंटर्नशिपच्या संधी आणि चांगले प्लेसमेंट उपलब्ध असेल, तर अशा महाविद्यालयात एआय असो किंवा संगणक अभियांत्रिकी, दोन्ही शाखांमधून उत्तम करिअर घडविता येते. आज उद्योगक्षेत्रात विद्यार्थ्यांची निवड केवळ शाखेच्या नावावर होत नाही, तर त्यांच्या कौशल्यांवर, प्रकल्पांवर, इंटर्नशिपवर आणि समस्यांचे निराकरण करण्याच्या क्षमतेवर होत असते.

शाखा निवडताना विद्यार्थ्यांनी स्वतःची आवड, क्षमता, महाविद्यालयाची गुणवत्ता, उपलब्ध सुविधा आणि भविष्यातील करिअरच्या संधी यांचा समतोल विचार करणे आवश्यक आहे. केवळ सोशल मीडियावरील चर्चांवर किंवा सध्याच्या ट्रेंडवर आधारित निर्णय घेणे टाळावे. शाखा निवडीच्या प्रक्रियेत पालक, शिक्षक आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन महत्त्वाचे असले तरी अंतिम निर्णय विद्यार्थ्यांची आवड, क्षमता आणि ध्येयांशी सुसंगत असणे आवश्यक आहे. याच संदर्भात संत तुकाराम महाराज ज्ञानलालसेचे महत्त्व अधोरेखित करताना म्हणतात,

'मुंगीचिया घरा कोण जाये मूळ। देखोनिया गुळ धाव घाली।।'

मुंगीला गुळापर्यंत पोहोचण्यासाठी कोणी निमंत्रण देत नाही; ती स्वतःच त्याचा शोध घेत धडपड करते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनेही स्वतःच्या आवडीच्या ज्ञानक्षेत्राचा शोध घेतला पाहिजे. एआय असो वा कॉम्प्युटर इंजीनीरिंग, योग्य शाखेची निवड दुसऱ्यांच्या अपेक्षांवर नव्हे तर स्वतःच्या जिज्ञासेवर आणि ध्येयावर आधारित असली पाहिजे.संत तुकाराम यांचेच महाराज आणखी एक विचारप्रवर्तक वचन आहे,

'मीचि मज व्यालो। पोटा आपुलिया आलो।।'

या ओळी विद्यार्थ्याला अंतर्मुख होऊन स्वतःतील गुण, क्षमता आणि स्वप्ने ओळखण्याचा संदेश देतात. करिअरचा मार्ग इतरांनी ठरवून देण्यापेक्षा तो स्वतःच्या जाणिवेतून निवडला, तरच त्यात समाधान आणि यश दोन्ही मिळते.

'असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे.'

एआय असो किंवा कॉम्प्युटर इंजीनीरिंग, यश शाखेत नसते; ते विद्यार्थ्याच्या अभ्यासात, जिज्ञासेत, कौशल्यविकासात आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमध्ये असते. शाखा निवडताना ट्रेंडपेक्षा स्वतःची क्षमता, आवड आणि भविष्यकालीन ध्येय यांना प्राधान्य द्या. योग्य निर्णय, चांगले महाविद्यालय आणि प्रामाणिक प्रयत्न यांच्या बळावर कोणतीही शाखा उज्ज्वल भविष्य घडवू शकते.शाखा तुमचे भविष्य ठरवत नाही; त्या शाखेत तुम्ही स्वतःला किती घडवता, हेच तुमचे भविष्य ठरवते.

# फ्रीडम स्कूलच्या अतिक्रमणावर अखेर नगरपालिकेचा बुलडोझर धावणार?

## रस्ता गिळंकृत केल्याच्या तक्रारीनंतर २४ तासांची नोटीस; माहिती अधिकारातील कागदपत्रांवरही प्रश्नचिन्ह

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट शहरातील गजानन नगर परिसरात असलेल्या फ्रीडम स्कूलच्या कथित अतिक्रमण प्रकरणाने अखेर निर्णायक टप्पा गाठला असून अकोट नगरपालिकेने संबंधित संस्थेला २४ तासांच्या आत अतिक्रमण हटविण्याची नोटीस काढली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांनी जारी केलेल्या या नोटिशीमुळे शहरातील बांधकाम परवानग्या, नगररचना नियमांचे पालन आणि प्रशासकीय पारदर्शकता यावरील प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत.



माझ्याजवळ बांधकाम परवानगी आहे. माझे काम ही सर्व नियमाने आहे. बाकी सर्व प्रशासकीय विषय हे शाळेतील क्लार्क सांभाळतात उर्वरित माहिती त्यांना विचारून देतो.

**मनोज झाडे**
संचालक, फ्रीडम शाळा

विशेष म्हणजे, या प्रकरणात केवळ अतिक्रमणाचा मुद्दाच नाही तर नगरपालिकेने माहिती अधिकारांतर्गत मागविण्यात आलेली माहिती देण्यास टाळाटाळ केल्याच्या आरोपामुळे संपूर्ण प्रकरण अधिकच गडद झाले आहे. नगरपालिकेच्या नगररचना विभागाने जारी केलेल्या नोटिशीनुसार सर्व्हे क्रमांक ८, नझुल शीट क्रमांक १८, नझुल प्लॉट क्रमांक २४ मधील मंजूर अभिन्यासात दर्शविण्यात आलेल्या ६ मीटर रुंद सार्वजनिक रस्त्यावर अतिरिक्त बांधकाम करण्यात आले असून त्यामुळे रस्त्याचे अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे.

नोटिशीत स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, संबंधित बांधकाम २४ तासांच्या आत काढून जागा पूर्ववत करावी. अन्यथा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील कलम ५२, ५३ आणि ५४ नुसार थेट कारवाई करून अनधिकृत बांधकाम हटविले जाईल तसेच संबंधितांवर फौजदारी स्वरूपाची कारवाईही करण्यात येऊ शकते.

### एका तक्रारीतून उघडकीस आले गंभीर प्रकरण

या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात सामाजिक कार्यकर्ते जयदीप प्रल्हाद चऱ्हाटे यांनी केलेल्या तक्रारीतून झाली. त्यांनी नगरपालिकेकडे दिलेल्या निवेदनात फ्रीडम स्कूलने सार्वजनिक रस्ता गिळंकृत करून बांधकाम केल्याचा गंभीर आरोप केला होता. तक्रारीत केवळ अतिक्रमणाचाच मुद्दा नव्हता. शाळेच्या बांधकाम परवानगीची वैधता, मंजूर नकाशा, मालमत्ता कर आकारणी, पार्किंगची उपलब्धता, खेळाचे मैदान आणि मालकी हक्काची कागदपत्रे याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. शैक्षणिक संस्थांना लागू असलेल्या नियमांनुसार विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक व्यवस्थेसाठी आवश्यक जागा राखीव असणे अपेक्षित असते. मात्र या सर्व बाबींची पूर्तता झाली आहे की नाही, याची चौकशी करण्याची मागणी तक्रारदारांनी केली होती.

### माहिती अधिकारात माहिती मागितली; पण उत्तरच नाही!

या प्रकरणातील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला आहे तो माहिती अधिकाराचा. तक्रारदार जयदीप चऱ्हाटे यांनी माहिती अधिकार कायद्यानुसार शाळेची बांधकाम परवानगी, मंजूर नकाशा, कर आकारणी पावत्या, पार्किंग जागेची माहिती, खेळाच्या मैदानाचा तपशील आणि मालकी हक्काशी संबंधित कागदपत्रे मागितली होती.मात्र नगरपालिकेने ही माहिती देणे टाळल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. जर सर्व कागदपत्रे नियमबद्ध असतील तर माहिती देण्यास प्रशासनाने टाळाटाळ का केली? माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदींना हरताळ फासण्याचे कारण काय? आणि संबंधित फाईलींमध्ये असे काय आहे की त्या सार्वजनिक करण्यास प्रशासन तयार नव्हते? हे प्रश्न आता केवळ तक्रारदारांचे राहिले नसून संपूर्ण शहराच्या चर्चेचा विषय बनले आहेत.

### अतिक्रमणावर कारवाई की केवळ नोटीसपुरते प्रकरण?

अकोटमध्ये यापूर्वीही अनेक अतिक्रमण प्रकरणांमध्ये नोटिसा देण्यात आल्या; मात्र प्रत्यक्ष कारवाई अनेकदा रखडल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे फ्रीडम स्कूल प्रकरणातही नगरपालिकेची भूमिका कसोटीवर लागणार आहे. २४ तासांची मुदत संपल्यानंतर प्रशासन खरोखरच अतिक्रमण हटविण्याची धडक कारवाई करणार का? की प्रकरण पुन्हा कागदोपत्री हालचालींपुरते मर्यादित राहणार? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### शहरासाठी महत्त्वाचा ठरणार निर्णय

फ्रीडम स्कूल प्रकरण हे केवळ एका शाळेपुरते मर्यादित नाही. सार्वजनिक रस्ते, नगररचना नियम, माहिती अधिकारातील पारदर्शकता आणि प्रशासकीय जबाबदारी यांची खरी परीक्षा या प्रकरणातून होणार आहे. नगरपालिकेने नोटीस बजावत पहिला टप्पा पूर्ण केला आहे; मात्र आता प्रत्यक्ष कारवाई, चौकशीचा अहवाल आणि माहिती अधिकारातील कागदपत्रे सार्वजनिक होतात का, यावरच प्रशासनाची विश्वासार्हता अवलंबून राहणार आहे.

### प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात?

नगररचना विषयातील जाणकारांच्या मते, कोणतेही मोठे बांधकाम उभारले जात असताना विविध स्तरांवर तपासणी आणि परवानग्यांची प्रक्रिया पार पडते. अशा परिस्थितीत जर सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण झाले असेल, तर ते अनेक वर्षे प्रशासनाच्या निदर्शनास कसे आले नाही? बांधकाम सुरू असताना पाहणी झाली होती का? पूर्णत्व प्रमाणपत्र देण्यात आले होते का? मालमत्ता कर आकारणी कोणत्या क्षेत्रफळावर करण्यात आली? रस्त्याच्या हद्दीची पडताळणी कोणी केली? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनालाच द्यावी लागणार आहेत.

---

# सामाजिक अंकेक्षण की वसुली मोहीम?; तेल्हारा तालुक्यातील मनरेगा तपासणी प्रक्रियेवर संशयाची सावली

## ६० हून अधिक ग्रामपंचायतींमध्ये महिनाभर चालली मोहीम

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कामांच्या पारदर्शकतेसाठी राबविण्यात येणाऱ्या सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेवर तेल्हारा तालुक्यात संशयाचे सावट निर्माण झाले आहे. पंचायत समिती तेल्हारा कार्यालयाकडून २४ मे ते २४ जून २०२६ या कालावधीत तालुक्यातील ६० हून अधिक ग्रामपंचायतींमध्ये सामाजिक अंकेक्षण मोहीम राबविण्यात आली. मात्र या मोहिमेदरम्यान काही ठिकाणी कामे सुरळीत असल्याचे दाखवून देण्यासाठी पैशांची मागणी झाल्याचे आरोप समोर येत असल्याने संपूर्ण प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पंचायत समिती कार्यालयातून निर्गमित करण्यात आलेल्या चार स्वतंत्र पत्रांनुसार ही मोहीम प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ अशा चार टप्प्यांत राबविण्यात आली.

प्रत्येक टप्प्यात गावनिहाय सामाजिक अंकेक्षण पथके नियुक्त करून मनरेगा अंतर्गत झालेल्या विविध विकासकामांची तपासणी करण्यात आली. संबंधित ग्रामपंचायतींना सर्व अभिलेखे, मस्टर रोल, आर्थिक नोंदी, ग्रामसभा ठराव आणि इतर आवश्यक कागदपत्रे तयार ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले होते. सामाजिक अंकेक्षणाच्या प्रक्रियेदरम्यान काही ग्रामपंचायती, कृषी सहाय्यक आणि ग्राम रोजगार सहाय्यक यांच्याकडून आर्थिक व्यवहारांसाठी दबाव टाकण्यात आल्याचे आरोप स्थानिक स्तरावर चर्चेत आहेत. कामांमधील त्रुटींकडे दुर्लक्ष करण्यासाठी अथवा अहवाल अनुकूल ठेवण्यासाठी पैशांची मागणी झाल्याचा दावा काही संबंधितांकडून केला जात आहे. जरी या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसली तरी त्यामुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

मनरेगा योजनेतील सामाजिक अंकेक्षणाचा उद्देश कामांची गुणवत्ता, खर्चाची सत्यता आणि लाभार्थ्यांचा सहभाग तपासणे हा आहे. मात्र याच प्रक्रियेबाबत गैरव्यवहारांच्या चर्चा सुरू झाल्याने पारदर्शकतेसाठी असलेली यंत्रणाच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. प्रशासनाच्या आदेशानुसार आणि अधिकृत नियोजनातून ही मोहीम राबविण्यात आली असल्याने, जर कुठे गैरप्रकार झाले असतील तर त्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अंकेक्षण पथके, पंचायत समिती प्रशासन किंवा वरिष्ठ अधिकारी यापैकी कोण जबाबदार ठरणार, याकडे लक्ष लागले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, या प्रकरणासंदर्भात काही संबंधितांकडून लेखी तक्रारी वरिष्ठ पातळीवर पाठविण्याची तयारी सुरू आहे. तसेच संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी मागणीही होत आहे. आरोपांमध्ये तथ्य आहे की नाही, हे चौकशीनंतरच स्पष्ट होणार असले तरी या चर्चांमुळे सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. जर आरोप खोटे असतील तर प्रशासनाने वस्तुस्थिती स्पष्ट करणे आवश्यक आहे. आणि आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास दोषींवर कठोर कारवाई होणे तितकेच गरजेचे आहे. तेल्हारा तालुक्यातील सामाजिक अंकेक्षण मोहिमेभोवती निर्माण झालेल्या या वादामुळे आता प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले असून, चौकशीची मागणी अधिक जोर धरत आहे.

---

# राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णालयात फळे, बिस्किटांचे वाटप

## महानगर अध्यक्ष महेंद्र गवई यांचा पुढाकार



■ प्रतिनिधी | अकोला ■

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त अकोला शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शुक्रवारी शासकीय रुग्णालयात दाखल रुग्णांना फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत गरजूंना मदतीचा हात देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

अकोला शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र गवई यांच्या पुढाकाराने आयोजित कार्यक्रमात रुग्णांची विचारपूस करण्यात आली. तसेच त्यांच्या प्रकृतीची माहिती घेऊन त्यांना फळे व बिस्किटांचे वितरण करण्यात आले. देशभरात राहुल गांधी यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी आमदार साजिद खान पठाण यांनी राहुल गांधी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. समाजसेवा आणि जनकल्याण ही काँग्रेस पक्षाची परंपरा असून, समाजातील गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्यासाठी पक्ष सातत्याने कार्यरत असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले. या प्रसंगी माजी उपमहापौर निखिलेश दिवेकर, योगेश थोरात, श्रीकांत सरोदे, सुनील वानखडे, विनोद नालट, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे शहराध्यक्ष संदेश वानखडे, हर्षित दामोदर, कपिल रावदेव, मोहम्मद युसुफ यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महेंद्र गवई यांनी सांगितले की, राजकारणासोबतच सामाजिक उत्तरदायित्व जपत समाजातील गरजू आणि वंचित घटकांसाठी अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, भविष्यातही विविध जनहिताचे कार्यक्रम राबविले जाणार आहेत.

---

**Change In Name**

I Have Change My Name From (Old Name)
**ARSHIYA SYED ASGHAR**
-TO-
(New Name)
**ARSHIYA TARANNUM SYED ASGHAR**
My Residential Address is - Nirman Nagar Ganga Nagar Washim Bypass Akola Maharashtra 444002.

### आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जूनला साजरा होणार

**अकोला :** जिल्हा प्रशासनातर्फे आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त २१ जून रोजी सकाळी ६.३० ते ८ वा. दरम्यान डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथील दीक्षांत समारंभ सभागृहात योग मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील नागरिक, खेळाडू, स्वयंसेवी संस्था व क्रीडा मंडळांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून यशस्वी करावा.

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८१८/२०२६ — प्रोसेस नं.७४९१/२०२६
चौ.ता. २७/०७/२०२६ — दिनांक : ११/०६/२०२६

**अर्जदार :** १. अमोल चंद्रशेखर देशमुख २. चित्रा चंद्रशेखर देशमुख दोघेही रा. जिवन बोध, सुधिर कॉलनी, वृंदावन नगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. अमृता श्रीराम परिचारक रा. व्दारा श्रीराम परिचारक, २६८३, उमडे गल्ली, पंढरपूर, ता. पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर. ४. दिशा दिपकराव देशमुख रा. २१ दिप, महसूल कॉलनी, तहसिल ऑफिसर, कळंब, जि. उस्मानाबाद.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : चंद्रशेखर गोपालराव देशमुख
**पत्ता :-** रा. जिवन बोध, सुधिर कॉलनी, वृंदावन नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत चंद्रशेखर गोपालराव देशमुख यांचे दि. ०७/११/२०२५ रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १९३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# जिल्हाधिकाऱ्यांची बार्शिटाकळी येथे भेट

## विविध यंत्रणांच्या कामांचा आढावा

**अकोला :** जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज बार्शिटाकळी येथे भेट देऊन विविध यंत्रणांच्या कामाचा आढावा घेतला. या दौ-यात त्यांनी तहसील कार्यालय, नगरपंचायत, दगडपारवा धरण, तिवसा येथील जनसंवाद कार्यक्रम आदी ठिकाणी भेट देऊन अपेक्षित कामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

जिल्हाधिका-यांनी तहसील कार्यालयाला भेट देऊन विविध विभागांची पाहणी केली. त्यांनी तालुक्यातील २९ ग्रामपंचायतींच्या चालू निवडणूक कार्यक्रमाचा आढावा घेऊन विशेष पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत ऑनलाईन मॅपिंगची पूर्वतयारी तपासली. 'ॲग्रीस्टॅक' च्या कामाची विचारणा करून शेतकऱ्यांचे प्रलंबित फार्मर



आयडी त्वरित पूर्ण करण्याचे आदेश यावेळी देण्यात आले.

पुरवठा शाखेला भेट देऊन त्यांनी रेशन कार्डधारक संख्या, धान्य पासिंग आणि पुरवठा प्रणालीच्या ऑनलाईन कामकाजाचे सविस्तर मार्गदर्शन केले. सेतू केंद्राची तपासणी करून त्यांनी शाळा सुरू होत असल्याने विद्यार्थ्यांचे उत्पन्न आणि जातीचे दाखले विनाविलंब देण्याचे आदेश दिले. जिल्हाधिकारी यांनी बार्शिटाकळी येथील नगर पंचायत कार्यालयास भेट दिली. शहरातील नालेसफाईचे काम पूर्ण करावे. मुदत संपूनही केवळ ६८ टक्के काम झालेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले. बस स्थानक परिसरातील अतिक्रमणे काढण्याची संयुक्त कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले. दगडपारवा धरणाची पाहणीही त्यांनी केली. पावसाची स्थिती लक्षात घेता पाणी जपून वापरण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे, त्यांनी ग्रामीण रूग्णालयातील सुविधांची पाहणी केली आणि नवीन बांधलेली इमारत हस्तांतरित करून घेण्याचे निर्देश अधीक्षकांना दिले. तिवसा बु. येथे जनसंवाद कार्यक्रमात उपस्थित राहून जिल्हाधिका-यांनी ग्रामस्थांशी चर्चा केली. तेथील पाण्याची समस्या, जलजीवन मिशनचे बंद काम आणि डिजिटल शाळेची मागणी या तक्रारींची तत्काळ चौकशी करून त्वरित कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला.

### २३ जून रोजी जिल्हास्तरीय बैठक

**अकोला :** महाराष्ट्र शासनामार्फत राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी स्वतंत्र व व्यापक 'एकल महिला धोरण' तयार करण्यात येत आहे. या धोरणाच्या निर्मितीत नागरिकांचा सक्रिय सहभाग मिळावा आणि धोरण अधिक परिणामकारक व लोकाभिमुख व्हावे, यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने मंगळवार, दिनांक २३ जून २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता महिला व बाल विकास भवन, संतोषी माता मंदिराजवळ, अकोला येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले.

---

# कृषी मार्गदर्शनाअभावी शेतकरी अनुदानापासून वंचित

## शेतकरी राजा ग्रुपचा 'भीक मांगो' आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | पातूर ■

पातूर तालुक्यातील अनेक शेतकरी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान), मुख्यमंत्री नमो शेतकरी महासन्मान निधी तसेच पोखरा योजनेच्या लाभापासून कृषी विभागाच्या अपुऱ्या मार्गदर्शनामुळे वंचित राहत असल्याचा गंभीर आरोप शेतकरी राजा ग्रुपने केला आहे. या संदर्भात तालुका कृषी अधिकाऱ्यांना निवेदन देऊन विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले असून, १५ दिवसांत तोडगा न निघाल्यास कृषी कार्यालयासमोर 'भीक मांगो' आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

शेतकरी राजा ग्रुपच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या



तांत्रिक प्रक्रियांबाबत अनेक शेतकऱ्यांना पुरेसे मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे अर्ज प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असून अनेक पात्र शेतकरी अनुदानापासून वंचित राहत आहेत. या समस्यांमुळे शेतकऱ्यांना वारंवार कृषी कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असून आर्थिक तसेच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, काही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली अनुदानाची रक्कम वारसांना मिळण्यातही अडचणी निर्माण होत आहेत. संबंधित तांत्रिक त्रुटी आणि कागदपत्रांच्या प्रक्रियेमुळे लाभार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर तालुक्यातील प्रत्येक मंडळ स्तरावर कृषी विभागाने विशेष मार्गदर्शन शिबिरे आयोजित करून शेतकऱ्यांच्या समस्या सोडवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच योजनांशी संबंधित तांत्रिक बाबी, नोंदणी प्रक्रिया, ई-केवायसी, खाते पडताळणी आणि वारस नोंदणी याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

'पातूर तालुक्यातील अनेक शेतकरी पीएम-किसान, मुख्यमंत्री नमो शेतकरी महासन्मान निधी आणि पोखरा योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. कृषी विभागाने पुढील १५ दिवसांत मंडळनिहाय मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करून शेतकऱ्यांच्या अडचणी दूर कराव्यात. अन्यथा कृषी कार्यालयासमोर 'भीक मांगो' आंदोलन करण्यात येईल.'

**रवि सोनोने,**
शेतकरी राजा ग्रुप, पातूर

दरम्यान, निवेदन देताना शेतकरी राजा ग्रुपचे रवि सोनोने, गणेश पाटील, दशरथ सरदार, अरविंद सावंत, परसराम भोलणकर यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## तुकाराम मुंढेंच्या धाडसत्राची ग्रामीण भागातही धास्ती
# अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईच्या भीतीने विरूळच्या पानटपऱ्या दिवसभर बंद
## गुटखा-तंबाखू शौकीनांची मात्र चांगलीच पंचाईत

विरूळ (आकाजी) जनमाध्यम : अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या राज्यव्यापी धाडसत्राची धास्ती आता ग्रामीण भागातही पोहोचल्याचे चित्र दिसून येत आहे. विरूळ येथे भरलेल्या आठवडी बाजाराच्या दिवशी अचानक गावातील बहुतांश पानटपऱ्या बंद राहिल्याने नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले.विरूळ येथे आठवडी बाजार असल्याने परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी होते. विशेषतः पानटपरी व्यावसायिकांसाठी हा दिवस कमाईचा मानला जातो. मात्र, गुरुवारी सकाळपासूनच अनेक पानटपऱ्यांचे शटर खाली असल्याने गुटखा, तंबाखू व पानमसाला घेण्यासाठी आलेल्या ग्राहकांची गैरसोय झाली. काहींना तर गावभर फिरूनही इच्छित वस्तू मिळाल्या नाहीत.दरम्यान, तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर अन्नपदार्थ, दुग्धजन्य पदार्थ तसेच तंबाखूजन्य वस्तूंच्या विक्री व गुणवत्तेबाबत तपासणी मोहीम सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाची धाड विरूळमध्येही पडू शकते, अशी चर्चा व्यापाऱ्यांमध्ये होती. याच भीतीपोटी अनेकांनी खबरदारीचा उपाय म्हणून दुकाने बंद ठेवल्याचे बोलले जात आहे. मात्र, विरूळ येथे अन्न व औषध प्रशासनाची अधिकृत कारवाई अथवा धाड पडल्याची कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही. पानटपऱ्या बंद राहण्यामागील नेमके कारण संबंधित व्यापाऱ्यांकडून स्पष्ट झालेले नसून गावात याबाबत चर्चांना उधाण आले आहे.

# जिद्दीच्या बळावर सेलूच्या लेकीची झेप; ग्लॅम महाराष्ट्रचा किताब आरती सोनटक्केच्या नावावर
## वर्धा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा; ग्रामीण तरुणींसाठी ठरली प्रेरणादायी यशोगाथा

**सेलू जनमाध्यम :** प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर सेलूच्या आरती प्रशांत सोनटक्के हिने राज्याच्या ग्लॅमर विश्वात आपला ठसा उमटवला आहे. पुनम प्रॉडक्शन आयोजित प्रतिष्ठित मिस ग्लॅम महाराष्ट्र सीझन ६ या राज्यस्तरीय सौंदर्य स्पर्धेत ग्लॅम महाराष्ट्र चा मानाचा किताब पटकावत तिने सेलू तालुक्यासह संपूर्ण वर्धा जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे.

नागपूर येथील सेव्हन वॅचन हॉलमध्ये १४ जून रोजी पार पडलेल्या महाअंतिम सोहळ्यात राज्यभरातून सहभागी झालेल्या शेकडो स्पर्धकांमधून आरतीने आपले वेगळेपण सिद्ध केले. रॅम्प वॉक, व्यक्तिमत्त्व विकास, संवादकौशल्य आणि बौद्धिक क्षमता अशा विविध फेऱ्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत तिने परीक्षकांची मने जिंकली.

आर्थिकदृष्ट्या प्रतिकूल परिस्थिती असूनही हार न मानता यशाचा ध्यास घेतलेल्या आरतीने सातत्यपूर्ण मेहनतीच्या बळावर हे यश संपादन केले. यापूर्वी याच स्पर्धेत तिने फर्स्ट रनर-अप चा मान मिळवला होता. त्या अनुभवाचा उपयोग करत यंदा तिने थेट विजेतेपदावर



मोहोर उमटवली.

सौंदर्य स्पर्धेसोबतच अभिनय क्षेत्रातही आरतीने आपली छाप पाडली आहे. पुनम प्रॉडक्शन निर्मित डिझायनर ड्रीम या लघुपटात तिने मुख्य भूमिका साकारली आहे. आरतीच्या या उल्लेखनीय यशामुळे सेलू व वर्धा जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातील मुलींनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी धैर्याने प्रयत्न करावेत, असा प्रेरणादायी संदेश तिच्या यशातून मिळत आहे.



## संक्षिप्त

### अवैध सावकारांची चौकशी

**वर्धा-** जिल्ह्यात अवैध सावकाराविरुध्द ६ तक्रारी प्राप्त झाल्या असून या तक्रारीची संबंधित सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या स्तरावर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १६ अंतर्गत चौकशी सुरु आहेत. जिल्ह्यात परवाना धारक सावकारांविरुध्द एकही तक्रार प्राप्त नसून शेतकऱ्यांना शेती विषयक कर्जवाटप केलेले असल्याचे उपनिबंधक कार्यालयाच्यावतीने परवाना धारक सावकारांच्या कागदपत्राची तपासणी केलेल्या कार्यवाहीत दिसून आले आहे. महाराष्ट्र शासनाने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना २०२६ जाहीर केलेली असून योजनेबाबत माहिती (डेटा) अद्यावत करणे चालू आहे. सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कर्जमाफी बाबत कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हा उपनिबंधक गौतम वालदे यांनी सांगितले.

### दोन महिलांचे मंगळसूत्र लंपास

**वर्धा-** घरासमोरील अंगणात झोपलेल्या दोन महिलांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घाटसावली परिसरात घडली.या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी तिप्रशांत अंकुश ठाकरे (रा. घाटसावली) यांनी वडनेर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, त्यांच्या आई व भाची रात्री अंगणात झोपलेल्या असताना चोरट्यांनी संधी साधून गळ्यातील दागिने चोरून नेले. तसेच परिसरातील सूरज बिडकर यांच्या आईचेही सोन्याचे दागिने लंपास करण्यात आले. या चोरीत सुमारे २० हजार रुपयांचा मुद्देमाल गेल्याचे सांगण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी पंचनामा करून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

### क्षुल्लक कारणावरून व्यक्तीला मारहाण

**वर्धा-** लाकूड जवळ आणून देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून एका व्यक्तीला मारहाण करण्यात आल्याची घटना नंदोरी परिसरात घडली. या प्रकरणी बादलसिंग दिलीपसिंग डांगी (रा. संत चोखोबा वॉर्ड) यांनी समुद्रपूर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीनुसार, किरकोळ कारणावरून वाद निर्माण झाला आणि त्यानंतर दोघांनी त्यांना शिवीगाळ करत मारहाण केली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तक्रारीच्या आधारे नेपालसिंग रामसिंग बावरी व हड्डी नेपालसिंग बावरी, दोघेही रा. गिट्टी खदान सावंगी (मेघे), यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास समुद्रपूर पोलिसांकडून सुरू असून संबंधित आरोपींची चौकशी करण्यात येत आहे.

### चोरीच्या तयारीत असलेला युवक पोलिसांच्या ताब्यात

**वर्धा-** चोरी करण्याच्या उद्देशाने अंधारात संशयास्पदरीत्या लपून



बसलेल्या युवकाला पोलिसांनी ताब्यात घेत त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. मानस मंदिर परिसरात ही कारवाई करण्यात आली. पोलिस गस्तीदरम्यान संबंधित युवक संशयास्पद हालचाली करताना आढळून आला. चौकशीदरम्यान त्याच्याकडे समाधानकारक उत्तर नसल्याने पोलिसांनी त्याची झडती घेतली व पुढील कारवाई केली. वृषभ ऊर्फ कट्टू गजानन निधेकर (वय २५, रा. आदिवासी कॉलनी) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक स्वरूपाचा गुन्हा दाखल केला असून त्याच्या हालचालींची चौकशी सुरू आहे. शहरात वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून गस्त वाढविण्यात आली आहे.

# पेरणीपूर्वी बिजप्रक्रिया करूनच बियाणांची पेरणी करावी

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी पावसाच्या सरी कोसळल्यामुळे शेतकऱ्यांनी खरीप पेरण्या सुरू केल्या आहेत. आधी शेतकऱ्यांनी कपाशीची पेरणी केली व आता सोयाबीन पिकाच्या पेरणीला लागले आहेत. परंतु सद्यस्थितीत पेरणीयोग्य पाऊस पडला नाही. त्यामुळे पेरणी योग्य किमान ७० ते ८० मिमी पाऊस झाल्यानंतरच व पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

सोयाबीन पिकावरील खोडमाशी, बुरशीजन्य रोग तसेच तूर पिकावर मर रोगाचा प्रादुर्भाव प्राथमिक अवस्थेत नियंत्रणात आणण्याकरिता पेरणी अगोदर बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे. कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा येथे जैविक खते उत्पादन प्रयोगशाळा सुरू करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सोयाबीन व चवळी गटाचे रायझोबियम, स्फुरद विरघळविणारे जिवाणू व ट्रायकोडर्मा विक्रीस उपलब्ध आहेत. याचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन कृषि विज्ञान केंद्राचे वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जीवन कतोरे यांनी केले आहे.

पिकाच्या रोपावस्थेत पोषक वातावरणामुळे उदा. जास्त पाऊस, जास्त आर्द्रता आणि शेतात पाणी साचल्यामुळे मुळकुज व खोडकुज या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतांना दिसतो. त्यामुळे जमिनीमार्फत होणाऱ्या रोगांच्या बुरश्या पोषक वातावरणामुळे जमिनीमध्ये वाढतात व त्या ५ ते ७ वर्ष जगतात. त्यानंतर पीक वाढीच्या अवस्थेमध्ये ह्या बुरश्यांचा पिकांवर प्रादुर्भाव होतांना दिसतो. सोयाबीन पिक रोपावस्थेत असतांना उष्ण तापमान, जास्त आर्द्रता, जास्त पाऊस व त्यानंतर कोरड्या वातावरणामुळे खोडमाशीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो.

अश्या किडी व रोगांचे प्राथमिक अवस्थेत कमी खर्चात बीजप्रक्रिया करून व्यवस्थापन करता येते. तसेच जिवाणू संवर्धकाची बीज प्रक्रिया केल्यामुळे बियाण्याची उगवण क्षमता वाढते, रोपांची वाढ जोमाने होते, उत्पादनात वाढ होऊन जमिनीची सुपीकता वाढते. बीजप्रक्रिया करतांना पिकनिहाय शिफारशीनुसार प्रथम रसायनिक बुरशीनाशक, त्यानंतर कीटकनाशकाची व सर्वात शेवटी जिवाणू संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. बीज प्रक्रिया केल्यानंतर बियाणे सावलीत वाळवल्यानंतर पेरणी करावी.

सोयाबीन पिकासाठी बीज प्रक्रिया करतांना कार्बोक्झिन ३७.५ टक्के अधिक थायरम ३७.५ टक्के (संयुक्त बुरशीनाशक) ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे, त्यानंतर थायामेथोक्झाम ३० टक्के एफएस (पोलोगोल्ड,स्लेयर प्रो, टाटा ट्राँट) या कीटकनाशक १० मिलि प्रती किलो बियाणे, त्यानंतर जिवाणू संवर्धक रायझोबियम जापोनिकम अधिक स्फुरद विरघडविणारे जिवाणू (पीएसबी) व त्यानंतर ट्रायकोडर्मा या बुरशीनाशकाची बियाण्यास चोळून बीजप्रक्रिया करावी.

तूर पिकामध्ये पेरणीपुर्वी माती प्रक्रिया करताना जमिनीमध्ये थोडाफार ओलावा असतांना एक एकर क्षेत्रफळामध्ये ट्रायकोडर्मा मित्रबुरशी २ किलो प्रति २ लिटर २५ ते ३० किलो चांगल्या कुजलेल्या व ओलावा असलेल्या शेणखतामध्ये मिसळवून घमेल्यात घेऊन एक एकर क्षेत्रफळामध्ये पेरणीच्या अगोदर समप्रमाणात पसरविणे किंवा फेकून देणे,

त्यानंतर बीजप्रक्रिया करतांना कार्बोक्झिन ३७.५ टक्के अधिक थायरम ३७.५ टक्के (संयुक्त बुरशीनाशक) ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे त्यानंतर जिवाणू संवर्धक रायझोबियम अधिक स्फुरद विरघडविणारे जिवाणू (पीएसबी) व त्यानंतर ट्रायकोडार्मा या बुरशीनाशकाची बियाण्यास चोळून बीजप्रक्रिया करावी, कृषि विज्ञान केंद्राच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# डीव्हायडरमध्ये झाडांऐवजी डांबराचा खच
## दोन वर्षे उलटली तरी वृक्षारोपणाचा पत्ता नाही; ठेकेदारावर कारवाई कधी
## सुशोभीकरण प्रकल्पावर प्रश्नचिन्ह

**आर्वी/जनमाध्यम**

शहराच्या सौंदर्यीकरणासाठी आणि पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने आर्वी–तळेगाव महामार्गावरील शिवाजी चौक ते जुन्या पुलगाव नाक्यापर्यंतच्या रस्त्यावर उभारण्यात आलेल्या डीव्हायडरमधील कॅरी आजही झाडांच्या प्रतीक्षेत आहेत. मार्गाचे काम पूर्ण होऊन जवळपास दोन वर्षांचा कालावधी लोटला, तरी एकही झाड लावण्यात आले नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

विशेष बाब म्हणजे, झाडे लावण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कॅरीमध्ये सुपीक काळी माती भरण्याऐवजी जुन्या डांबरी रस्त्याचे खोदकामातून निघालेले मटेरियल, गोटे आणि निकृष्ट अवशेष टाकण्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. यासंदर्भात यापूर्वी वृत्त प्रसिद्ध होऊनही संबंधित ठेकेदार अथवा जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई झाल्याचे दिसून आलेले नाही.

नागरिकांच्या मते, या कॅरीमधील डांबरी मटेरियल हटवून त्याठिकाणी सुपीक काळी माती भरल्याशिवाय वृक्षारोपण शक्य नाही. त्यामुळे अतिरिक्त खर्च कोण उचलणार, सार्वजनिक बांधकाम विभाग की संबंधित ठेकेदार, हा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

शहरातील मुख्य मार्गाच्या सौंदर्यीकरणाचा प्रकल्प सध्या कागदावरच असल्याचे चित्र असून प्रशासनाने तत्काळ दखल घेऊन निकृष्ट कामाची चौकशी करावी, दोषींवर कारवाई करावी आणि डीव्हायडरमध्ये वृक्षारोपण करून शहराला हिरवाईची भेट द्यावी, अशी आर्वीकरांची जोरदार मागणी आहे.



# राज्यातील एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण

**वर्धा/जनमाध्यम**

एकल महिला धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख व वास्तवाधिष्ठीत करण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात नागरिक, एकल महिला, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, तज्ञ व्यक्ती व संबंधित विभागांचे अधिकारी यांच्याकडून सूचना व अभिप्राय प्राप्त करण्यासाठी २३ जुन रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा परिषद सभागृह येथे जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बैठकीस संबंधितांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर बैठकीत एकल महिला व त्यांच्या संघटना, महिला व बालकांसाठी कार्यरत स्वयंसेवी संस्था, बाल संगोपन संस्था व बालगृहे चालविणाऱ्या संस्था, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व माध्यम प्रतिनिधी, विषयतज्ञ, संशोधक व अभ्यासक, विविध शासकीय विभागांचे अधिकारी, समाजातील विविध क्षेत्रातील कार्यरत मान्यवर, व्यक्तींकडून एकल महिलांच्या समस्या केवळ मांडण्याऐवजी त्या समस्यांवर कोणत्या ठोस उपाययोजना कराव्यात, कोणत्या नवीन योजना सुरु कराव्यात, विद्यमान योजनांमध्ये कोणते बदल करावेत तसेच आवश्यक असल्यास कोणत्या कायद्यांमध्ये किंवा नियमांमध्ये सुधारणा करण्यात याव्यात, याबाबत सविस्तर सूचना विचाराधीन घेण्यात येऊन शासनास कळविण्यात येणार आहे. एकल महिलाशी संबंधित सर्व घटकातील व्यक्तींनी सदर बैठकीस उपस्थित राहून एकल महिला धोरण अधिक व्यापक बनविण्यासाठी मदत करावी, अधिकारी यांनी कळविले आहे.

# 'एकता व अनुशासन' हीच एनसीसीची ताकद- कर्नल संदीप कुमार सिंग

**सेवाग्राम/ जनमाध्यम**

देशाला शिस्तबद्ध, राष्ट्रनिष्ठ आणि जबाबदार नागरिकांची गरज असून एनसीसीच्या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये एकता, अनुशासन आणि नेतृत्वगुण विकसित होतात, असे प्रतिपादन २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कमान अधिकारी तथा कॅम्प कमांडंट कर्नल संदीप कुमार सिंग यांनी केले. ते कम्बाईंड ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प-६०३ व स्थलसेना पूर्वतयारी शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलत होते.

स्थानिक बापूरावजी देशमुख फाउंडेशनच्या वसतिगृह परिसरात झालेल्या या दहा दिवसीय शिबिरात नागपूर विभागातील ४५० छात्रसैनिक सहभागी झाले होते. शिबिरात ड्रिल, मॅप रिडिंग,फायरिंग, बॅटल क्राफ्ट, फिल्ड क्राफ्ट, सिग्नलिंग, हेल्थ अँड हायजिन यांसह विविध सैनिकी प्रशिक्षण देण्यात आले.



तसेच प्रश्नमंजुषा, रांगोळी, लेखनकला,पोस्टर मेकिंग व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

विविध क्रीडा व बौद्धिक स्पर्धांतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. उत्कृष्ट नेतृत्वासाठी कॅम्प सीनियर अंडर ऑफिसर प्रसाद आरव व अरुणा मनुराम यांचा विशेष सन्मान करण्यात आला.शिबिरादरम्यान ड्रोन तंत्रज्ञान, सायबर क्राईम, वाहतूक सुरक्षा, व्यक्तिमत्त्व विकास,पर्यावरण संवर्धन आणि सैन्यदलातील करिअर संधी या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.चार कंपन्यांमध्ये विभागलेल्या छात्रसैनिकांमध्ये अल्फा कंपनीने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपदाची ट्रॉफी पटकावली. कार्यक्रमाचे संचालन कॅप्टन मोहन गुजरकर यांनी केले. राष्ट्रभक्तीपर हम सब भारतीय हैं या गीताने समारोप सोहळ्याची सांगता झाली.

# पीएम किसानच्या २३ व्या हप्त्याचे वितरण व शेतकरी मार्गदर्शन

**वर्धा/जनमाध्यम**

केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत देशातील शेतकरी बांधवांच्या खात्यात २३ वा हप्ता जमा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण कृषि विज्ञान केंद्र सेलसुरा येथे होणार आहे. सोबतच शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

२० जुन रोजी दुपारी ३ वाजता आयोजित या सोहळ्यादरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते एका क्लिकवर देशभरातील शेतकऱ्यांच्या बँक खात्यात सन्मान निधीची रक्कम थेट जमा केली जाणार आहे. मुख्य कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण सेलसुरा केंद्रावर उपस्थित शेतकऱ्यांना दाखविले जाणार आहे.

जिल्ह्यातील हजारो शेतकरी कुटूंबांना थेट आर्थिक हातभार मिळणार असून खरीप व रब्बी हंगामाच्या पुर्वतयारीसाठी किंवा व्यवस्थापनासाठी या निधीचा मोठा फायदा होणार आहे.

या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपण कार्यक्रमादरम्यान कृषि विज्ञान केंद्रातील तज्ञ शास्त्रज्ञांद्वारे उपस्थित शेतकऱ्यांना खरीप हंगामातील पीक व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञान तसेच कीडरोग व्यवस्थापनाविषयी महत्वपूर्ण तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येणार आहे, असे कृषि विज्ञान केंद्राच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# संस्कारांच्या शिदोरीतून घडते सुसंस्कृत पिढी
## कोळोणा येथे संस्कार शिबिराचा प्रेरणादायी सोहळा

**कोळोणा (चोरे) जनमाध्यम**

संस्कार शिबिरे ही केवळ सुट्टी घालवण्याचे साधन नसून भावी पिढी घडविणारी आणि सुदृढ समाजरचनेचा पाया भक्कम करणारी केंद्रे आहेत. शिस्त, सहकार्य, राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि भारतीय संस्कृतीची मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या शिबिरांतून होत असते, असे प्रतिपादन वर्धा जिल्ह्यातील ज्येष्ठ समाजसेवक मोहनबाबू अग्रवाल यांनी केले.

ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरम व गायत्रीदेवी सेवा संस्था



यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संस्कार शिबिर व शालोपयोगी साहित्य वितरण सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन उपसरपंच शोभा कुरसंगे यांच्या हस्ते झाले.यावेळी ज्येष्ठ समाजसेवक श्यामसुंदर राठी, प्रशांत सांगवाई, इमरान राही, अबुबकर खान, किरण फुलझेले, विजय सत्याम, दिलीप मसने, डॉ. विद्या कळसाईत, पंकज वंजारे, दीक्षा मुनेश्वर, हरीश तांदळे, मोहन राठोड, विलास कुळकर्णी, उल्हास वाघ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास, नैतिक मूल्ये, सामाजिक जबाबदारी आणि संस्कारांचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कसं बोलावं ही कला आहे, पण कसं बोलू नये हा संस्कार आहे, असे विचार इमरान राही यांनी व्यक्त केले. तर एखादी गोष्ट बोलावी की नाही हे संयम आणि संस्कार ठरवतात, असे प्रशांत सांगवाई यांनी सांगितले.या प्रसंगी ६० विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्य व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. संचालन दयाराम भस्मे आभार हरीश तांदळे यांनी मानले.

### अल्पवयीन मुलाची गळफास घेऊन आत्महत्या

**वर्धा-** रामपूर शेतशिवारात एका १७ वर्षीय मुलाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली. युवराज सोनू गवते असे मृत मुलाचे नाव असून तो रामपूर येथील रहिवासी होता. मिळालेल्या माहितीनुसार, शेतातील लिंबाच्या झाडाला दोरी बांधून त्याने टोकाचे पाऊल उचलले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी धाव घेतली, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आणि मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस विविध अंगांनी तपास करीत आहेत. या घटनेमुळे रामपूर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २०३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# पावसाने दडी मारल्याने पेरण्या खोळंबल्या

## -बळीराजा चिंतेत, शेतीचे गणित बिघडले



**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** जून महिना अर्ध्यावर आला असतानाही अपेक्षित पाऊस न झाल्याने जिल्ह्यातील खरीप हंगाम धोक्यात आला आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांच्या पेरण्या खोळंबल्या असून बळीराजाच्या चिंतेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. दरवर्षी मृग नक्षत्राच्या आगमनानंतर पावसाची सुरुवात होत असल्याने शेतकरी पेरणीच्या तयारीला लागतात. मात्र यंदा आभाळात ढगांची वर्दळ दिसत असली तरी पाऊस हुलकावणी देत असल्याने शेतीचे संपूर्ण गणितच बिघडले आहे.

चांदुर तालुक्यातील अनेक भागांमध्ये शेतकऱ्यांनी मशागतीची कामे पूर्ण केली आहेत. बियाणे, खते आणि इतर कृषी साहित्य खरेदी करून ठेवले आहे. काही शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेतीसाठी आवश्यक खर्चही केला आहे. मात्र पाऊस नसल्याने पेरणी सुरू करता येत नसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. पेरणीसाठी योग्य कालावधी हातातून निघून जात असल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून वाढत्या तापमानामुळे जमिनीतील ओलावा पूर्णपणे नष्ट झाला आहे. त्यामुळे पाऊस पडला तरी सलग आणि समाधानकारक पाऊस होईपर्यंत पेरणी करणे धोक्याचे ठरणार असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत आहे. एकीकडे वाढलेले कृषी खर्च आणि दुसरीकडे पावसाची अनिश्चितता यामुळे शेतकरी आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर उभे आहेत.

ग्रामीण भागात सध्या सर्वत्र पावसाचीच चर्चा सुरू असून शेतकऱ्यांचे लक्ष आकाशाकडे लागले आहे. पाऊस वेळेत न झाल्यास सोयाबीन, कापूस, तूर, मूग आणि उडीद यांसारख्या खरीप पिकांच्या लागवडीवर मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शेतकरी वर्गात अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.दरम्यान, हवामान विभागाने आगामी काही दिवसांत पावसासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली असली तरी प्रत्यक्षात दमदार पाऊस कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भाजप 'जागतिक योग दिन' ७ मंडळांमध्ये आयोजित करणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारताचे प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने २०१५ पासून जगभर २१ जून रोजी 'जागतिक योग दिन' साजरा करण्यात येतो.

या वर्षी १२ व्या जागतिक योग दिनाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी अमरावती शहर जिल्हा तर्फे सर्व ७ मंडळांमध्ये जागतिक योग दिनाच्या निमित्ताने कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.


१) अंबा मंडळ - राजकमल चौक येथे सकाळी ७ वाजता, संयोजक हरीहर गिरोळकर, सहसयोजक मनीष सरवय्या, अंजली पाठक विकास पंचवटे. समन्वयक विनोद ठोसर. २) साई मंडळ - न्यू प्रभात कॉलोनी बगीचा सकाळी ७ वाजता,संयोजक राजेश कितुकले, सह आयोजक जोस्ना शेटे, वंदना हरणे. समन्वयक, भारती गुहे. ३) बडनेरा मंडल, मनपा शाळा, जुनी वस्ती सकाळी ७ वाजता, संयोजक प्रीती वाकेकर, सह संयोजक उपमा देवडा, किरण भगत,व समन्वयक उमेश निलगिरे. ४) विद्यापीठ मंडळ, वडाळी बगीचा, सकाळी ७ वाजता, संयोजक प्रफुल बोके, सह संयोजक संजय चव्हाण, भय्यासाहेब तिरपुडे, समन्वयक प्रफुल बोके. ५) संत गाडगे बाबा मंडळ - स्वामी विवेकानंद थीम पार्क, कठोरा नाका, सकाळी ७ वाजता , संयोजक रीता ताई मोकलकार, सह संयोजक अभिजित वानखडे, अमोल आगरकर. समन्वयक अभिजित वानखडे. ६) स्वामी विवेकानंद मंडळ - नारायण नगर बगीचा सकाळी ७ वाजता., संयोजक बरखा भोज्जे, सह संयोजक माया कांबळे,ऋषिकेश ठेलकर समन्वयक संतोष कावरे. ७) कॉटन मार्केट मंडळ - सहकार नगर सकाळी ७ वाजता, संयोजक कौशिक अग्रवाल, सह संयोजक सुशिल साहू प्रमोद राऊत. समन्वयक सचिन नाईक.

या सर्व कार्यक्रमांना शहर जिल्हा अध्यक्ष डॉ नितीन धांडे, महापौर श्रीचंद तेजवानी, प्रवीण पोटे, दिनेश सूर्यवंशी, शिवराय कुलकर्णी, जयंत डेहनकर. रवींद्र खांडेकर, किरण पातूरकर, चेतन गावंडे, बादल कुलकर्णी, ललित समदुरकर, राधा कुरिल, चेतन पवार 'जागतिक योग दिन' कार्यक्रमाचे जिल्हा संयोजक डॉ संजय तिराथकर, सह संयोजक शितल वाघमारे, विकी शर्मा,. सुनिल खराटे, सुनिल काळे, सचिन रासने, तसेच सर्व , जिल्हा पदाधिकारी व नगरसेवक आणि कार्यकर्ते उपस्थित राहतील.

# अचलपूर शहरातील अनेक मुख्य रस्त्याची दुरावस्था

## -सुलतानपूरा येथील डांबरीकरणांच्या रस्त्याचे पुन्हा सिमेंट काँक्रीटीकरण

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील 'अ' वर्ग दर्जा असलेल्या अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून जुळ्या शहरातील अनेक प्रभागात व मुख्य रस्त्याची अवस्था चांगली असताना सुद्धा लाखो रुपयांचा निधीतून सिमेंट काँक्रीटीकरण चे बांधकाम केले जात असल्याचा प्रकार यापूर्वी समोर आला आहे.त्याच प्रकाराची पुनरावृत्ती म्हणून सुलतानपूरा सह ग्रामीण भागात जाणाऱ्या व्यंकटेश शाळे जवळील बायपास डांबरीकरण रस्त्याची स्थिती चांगली आहे . मात्र या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण चे बांधकाम सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये अचलपूर नगर परिषद बांधकाम विभागाच्या उदासीन कारभाराबाबत रोष व्यक्त होत आहे. अचलपूर शहरातील अनेक मुख्य रस्त्याची दुरावस्था झाली आहे.रस्ते गायब झाले आहे मात्र त्या रस्त्याची सुधारणा व नवीन बांधकाम न होता डांबरीकरण झालेल्या रस्त्याचे पुन्हा सिमेंट काँक्रीटीकरण चे बांधकाम सुरू झाल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे .सोबतच या रस्त्याचे कामाचे स्थळी कोणत्याही प्रकारची माहिती फलक अनेक ठिकाणी गायब आहे. .यामुळे किती निधी आहे ? योजनाची माहिती आणि कंत्राटदार माहिती पासून नागरिक अनभिज्ञ राहत आहे .यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



जुळ्या शहरातील अनेक भागातील मुख्य रस्त्याची अवस्था चांगली असताना सुद्धा अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून लाखो रुपयांचा निधीतून डांबरीकरण व सिमेंट काँक्रिटीकरणाचे कार्य यापूर्वी ही करण्यात आले. असाच प्रकार पुन्हा सुलतानपूरा परिसरात घडला आहे . सुलतानपूरा कडे जाणाऱ्या बायपास रस्त्याचे डांबरीकरण ची अवस्था चांगली आहे .काही ठिकाणी खड्डे असून त्याची सुधारणा अचलपूर नगर परिषद बांधकाम विभागाने करणे अपेक्षित होते .मात्र माळवेशपुरा मुख्य रस्त्याची दुरावस्था झाली असून संपूर्ण रस्ता गायब झाला आहे . पण २- ३ वर्ष उलटूनही निधी मंजूर होऊन ही कामाला सुरुवात झालेली नाही .

पण सुलतानपुरा कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे पुन्हा बांधकाम होत असल्याने राज्य शासनाचा पैसा पाण्यात जात असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी दिली आहे. अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून जुळ्या शहरातील मुख्य रस्त्याचे बांधकामासाठी निधी व संबंधित ठेकेदाराची माहिती संदर्भात फलक गायब झालेले दिसत आहे. यामुळे हा मार्ग कोणत्या योजनेतून व किती निधीतून झाला? याबाबत सामान्य नागरिकांना कोणतीही कल्पना नसल्याचे चित्र आहे.

परंतु जुळ्या शहरातील अनेक मुख्य रस्ते आजही वाहनचालकासाठी डोकेदुखी ठरत आहे. अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून जुळ्या शहरात शहरात सुरू असलेल्या मुख्य रस्त्याचा बांधकामाचे दर्जा तपासणी का होत नाही? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.यामुळे दुरावस्था झालेल्या मुख्य रस्त्यावर प्रवास करणारे वाहनचालक त्रस्त झाले आहे . मालवेशपुरा येथील मुख्य रस्ता असो देवडी ,चवलमंडी मुख्य रस्त्याची दुरावस्था झालेली आहे . याचा कायापालट कधी होणार ? की जे रस्ते चांगल्या अवस्थेत आहे त्या रस्त्याचाच कायापालट होणार का ? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे.

अचलपूर नगर परिषद बांधकाम विभागाचे अभियंता शर्मा यांच्याशी आमच्या प्रतिनिधीने संपर्क करून सुलतानपुरा येथील त्या रस्त्याचा बांधकामा बाबत माहिती घेतली .त्यांनी सांगितले की,या रस्त्याचे बोपापुर रोड पर्यंत सिमेंट काँक्रीटीकरण चे काम सुरू झाले आहे.निधी बाबत त्यांनी माहिती देणे टाळले .तसेच माळवेशपुरा येथील रस्त्याचे लवकरच काम सुरू होणार असल्याचे सुद्धा त्यांनी सांगितले.

# अट्टल वाहनचोरांच्या टोळीचा पर्दाफाश



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी सिटी कोतवाली पोलिसांनी मोठी कारवाई करत अट्टल वाहनचोरांच्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी तीन आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून तब्बल २१ चोरीच्या मोटारसायकली जप्त केल्या असून सुमारे ८ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या कारवाईमुळे अमरावती शहर आयुक्तालयातील आणि इतर जिल्ह्यांतील मिळून १७ चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

सिटी कोतवाली हद्दीत बाजारपेठेचा परिसर असल्याने दुचाकी चोरीचे प्रमाण वाढले होते. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी विशेष आढावा घेऊन चोरीच्या गुन्ह्यांच्या तपासासाठी कठोर निर्देश दिले होते. त्यानुसार सिटी कोतवाली पोलिसांनी विशेष पथक स्थापन करून तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीदारांच्या मदतीने सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान वाहनचोरीच्या मालिकेमागे असलेल्या टोळीचा माग काढण्यात पोलिसांना यश आले. पोलिसांनी राहुल संतोष सोळंके (वय २४, रा. कारंजा लाड, जि. वाशिम), लखन उत्तमराव चव्हाण (वय २६) आणि महादेव उत्तमराव चव्हाण (वय २८, दोघेही रा. अळणगाव, ता. भातकुली) यांना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी अमरावतीसह विविध ठिकाणी वाहनचोरी केल्याची कबुली दिली. आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या मोटारसायकलींमध्ये होंडा युनिकॉर्न, होंडा शाईन, हिरो स्प्लेंडर, स्प्लेंडर प्लस, स्प्लेंडर प्रो, एचएफ डिलक्स आणि टीव्हीएस व्हिक्टर यांसारख्या वाहनांचा समावेश आहे.

या वाहनांबाबत सिटी कोतवाली, राजापेठ, गाडगेनगर, दर्यापूर, कारंजा (वाशिम) आणि चंद्रपूर शहर येथे गुन्हे दाखल असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

पोलिसांनी आतापर्यंत अमरावती शहरातील ११ आणि इतर ठिकाणांतील ६ असे एकूण १७ गुन्हे उघडकीस आणले आहेत. तसेच जप्त केलेल्या आणखी चार दुचाकींची मालकी आणि गुन्हेगारी संबंध तपासण्याचे काम सुरू आहे. ही उल्लेखनीय कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली सिटी कोतवालीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट व पोलीस निरीक्षक रामदास पालवे यांच्या नेतृत्वाखालील डीबी पथकाने केली. पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे वाहनचोरीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात यश आले.

---

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार अमरावती यांचे न्यायालय**

जन्म/मृत्यू बाबत जाहीरनामा रा.मा.क./एम.आर.सी.८१/अमरावती/२२९/२०२५-२६

**अर्जदार -** **श्री.शमीम बानो शेख छोटू**
**रा.अल्हीलाल कॉलनी, जमील हुसयेन मास्टरच्या घरी, अमरावती**

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** **निबंधक जन्म मृत्यू, आरोग्य विभाग,**
**महानगर पालिका, अमरावती, ता.जि.अमरावती**

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम रहिवासी आहेत. अर्जदार **श्री.शमीम बानो शेख छोटू**, रा.अलहिलाल कॉलनी, जमील हुसेन मास्टरच्या घरी, अमरावती, ता.जि.अमरावती यांच्या जन्माची नोंद दिनांक **०४.०६.१९५७** रोजी राहते घरी अमरावती, ता.जि.अमरावती येथे झाला. निबंधक, जन्म मृत्यू आरोग्य विभाग, महानगरपालिका, अमरावती येथे जन्माची नोंद घेतली नाही. अर्जदाराला उपरोक्त मृत्यू प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे जन्माची नोंद महानगरपालिका अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) नुसार जन्माच्या नोंदणीचा आदेश होण्याबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, ज्या कोणास सदर नायब तहसीलदार, अमरावती येथील दाखल अर्जातील **श्री.शमीम बानो शेख छोटू**, रा.अलहिलाल कॉलनी, जमील हुसेनच्या घराजवळ, अमरावती, ता.जि.अमरावती यांच्या जन्माची दिनांक ०४.०६.१९५७ रोजी राहत्या घरी अमरावती, ता.जि.अमरावती येथे झाला. त्यांच्या जन्माच्या दिनांकास किंवा त्याबाबत हरकत असल्याने ता.०८.०७.२०२६ पर्यत स्वतः किंवा वकीलामार्फत येऊन हरकत न घेतल्यास सदर्हु अर्जदार यांची साक्ष घेऊन जन्माची नोंद सदर कार्यालयात घेण्याचा आदेश किंवा तसे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१९.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

दिनांक १९.०६.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**तहसीलदार तथा करीता,**
**तालुका दंडाधिकारी,**
**अमरावती**

---

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार अमरावती यांचे न्यायालय**

जन्म/मृत्यू बाबत जाहीरनामा रा.मा.क./एम.आर.सी.८१/अमरावती/२२८/२०२५-२६

**अर्जदार -** **श्री.शहेनाज बानो शेख छोटू**
**रा.अल्हीलाल कॉलनी, जमील हुसयेन मास्टरच्या घरी, अमरावती**

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** **निबंधक जन्म मृत्यू, आरोग्य विभाग,**
**महानगर पालिका, अमरावती, ता.जि.अमरावती**

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम रहिवासी आहेत. अर्जदार **श्री.शहेनाज बानो शेख छोटू**, रा.अलहिलाल कॉलनी, जमील हुसेन मास्टरच्या घरी, अमरावती, ता.जि.अमरावती यांच्या जन्माची नोंद दिनांक **०४.०६.१९६८** रोजी राहते घरी अमरावती, ता.जि.अमरावती येथे झाला. निबंधक, जन्म मृत्यू आरोग्य विभाग, महानगरपालिका, अमरावती येथे जन्माची नोंद घेतली नाही. अर्जदाराला उपरोक्त जन्म प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे जन्माची नोंद महानगरपालिका अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) नुसार मृत्यूच्या नोंदणीचा आदेश होण्याबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, ज्या कोणास सदर नायब तहसीलदार, अमरावती येथील दाखल अर्जातील **श्री.शमीम बानो शेख छोटू**, रा.अलहिलाल कॉलनी, जमील हुसेनच्या घराजवळ, अमरावती, ता.जि.अमरावती यांच्या जन्माची दिनांक ०४.०६.१९५७ रोजी राहत्या घरी अमरावती, ता.जि.अमरावती येथे झाला. त्यांच्या जन्माच्या दिनांकास किंवा त्याबाबत हरकत असल्याने ता.०८.०७.२०२६ पर्यत स्वतः किंवा वकीलामार्फत येऊन हरकत न घेतल्यास सदर्हु अर्जदार यांची साक्ष घेऊन जन्माची नोंद सदर कार्यालयात घेण्याचा आदेश किंवा तसे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१९.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

दिनांक १९.०६.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**तहसीलदार तथा करीता,**
**तालुका दंडाधिकारी,**
**अमरावती**

---

**तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय**

**क्र. रामाक्र/६१/एमआरसी-८१/अडगांव/२०२५-२०२६**

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **मोहन रामकृष्ण कोंडे,** रा.बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांनी त्यांचे आजी नामे **पंचफुला पुंडलि ढहाणे** रा.**अडगांव**, ता.मोर्शी यांची मृत्यूची नोंद ग्रामपंचायत **अडगांव** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.**अडगांव** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.०५.०६.२०२६

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३५८/२०२६ ने.ता.१३.०७.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती गुनाबाई विश्रामजी सोनोने, वय ९० वर्षे, धंदा - घरकाम
रा.रिध्दपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. रामेश्वर विश्रामजी सोनोने, वय ५८ वर्षे, धंदा - मजुरी
रा.एमआयडीसी प्लॉट नं. १४ अमडापूर बडनेरा, ता.जि.अमरावती
३. सुधाकर विश्रामजी सोनोने, वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.रिध्दपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. निर्मला पांडुरंग मास्कर, वय ७८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.मांडगांव, ता.समुद्रपूर, जि.वर्धा

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** **निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील नामे **विश्रामजी बाबलाजी सोनोने** हे दि.**१५.०१.१९९९** रोजी **रिध्दपूर**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झाले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा**

दिनांक

आज दि.................. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अंकुश सुरेशराव वानखडे** अर्जात नमूद जन्म दिनांक **१९.०५.२००३** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४)

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
| --- | --- |
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री शे.जयसिंगपुरे | ५) अनुश्री शे.जयसिंगपुरे |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
नोंदणी क्रमांक **एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--

पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६९०/२०२६
**देव चौहान अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०५.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Shri Dev S/o Suresh Chauhan, Age20 Yrs. Occu.: Student
2. Smt.Sarika W/o Suresh Chauhan, Age 45 Yrs. Occu.: Nil
3. Ku.Minal D/o Suresh Chauhan, Age 22 Yrs. Occu.: Nil
4. Ku.Nandini D/o Suresh Chauhan, Age 19 Yrs. Occu.: Student

All R/o In front of Dainik Yuva Manch, Belpura, Rukhmini Nagar,Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Suresh Ramdayal Chauhan हे दिनांक 13.02.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Shri Dev S/o Suresh Chauhan + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Shri Dev S/o Suresh Chauhan + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**जाहीर नोटीस**

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, यांचे न्यायालय**

एम.ए.सी.पी. क्रमांक ४७७/२०२२ ने.ता.१७.०७.२०२६

**पिटीशनर - राजू उर्फ राजेंद्र इंगोले व ईतर**
**-- वि --**
**रिस्पांडंट - अब्दुल हामीद अब्दुल माजीद व ईतर**

**बनाम -** 1.Mihir Raghu Mahalle,
R/o Arun Mahalle, Vidyut Nagar, Amravati.

**Application U/Sec.166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation**

ज्याअर्थी वरील पिटीशनर **राजू उर्फ राजेंद्र दिगांबर इंगोले** यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०२, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार विकास सुधाकर गहलोत, यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक **१७.०७.२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **१९.०६.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

अमरावती
दिनांक १९.०६.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

---

प्रो.क्र.५३७/२०२६

**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**

**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक १८५/२०२६ ने.ता.२०.०७.२०२६

**अर्जदार ः**
१. सरस्वती नामदेवराव सोळंके, वय ७८ वर्षे, धंदा - गृहिणी
२. राजेंद्र नामदेवराव सोळंके, वय ५९ वर्षे, धंदा - मजुरी
३. रविंद्र नामदेवराव सोळंके, वय ५९ वर्षे, धंदा - मजुरी
अर्जदार नं.१ व २ रा.साऊर, ता.भातकुली, जि.अमरावती
४. मंदा केशव चव्हाण, वय ५६ वर्षे, धंदा - गृहिणी
रा.नालवाडा. ता.दर्यापूर, जि.अमरावती
५. शिला विनायक पवार, वय ५६ वर्षे, धंदा - गृहिणी
रा.बोराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
६. सुनंदा संजय प वार, वय ४७ वर्षे, धंदा - गृहिणी
रा.वासनी खुर्द, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **नामदेवराव यादवराव सोळंके** हे दि.**२१.०४.२०२४** रोजी मयत झाले. अर्जदार **सरस्वती नामदेवराव सोळंके**, वय ७८ वर्षे, धंदा - गृहिणी, रा.साऊर, ता.भातकुली, जि.अमरावती व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**०९.०६.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **नामदेवराव यादवराव सोळंके** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **नामदेवराव यादवराव सोळंके** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक **१५.०६.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २८२**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# पांढरकवडा नाक्यावर अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १९ : जिल्ह्यात अवैधरित्या सुपारी वाहतुकीवर अन्न व औषधि प्रशासन विभागाने मोठी कारवाई करत पांढरकवडा-आदिलाबाद मार्गावरील पांढरकवडा नाक्यावर सुपारीने भरलेले दोन ट्रक पकडून तब्बल ८९ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

## ८९.२५ लाखांची ६९.५ टन सुपारी जप्त



या कारवाईमुळे अवैध माल वाहतूक करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. प्राप्त माहितीनुसार, मोठ्या प्रमाणात सुपारीची खेप वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती अन्न व औषधि प्रशासन विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुरुवारी सायंकाळी पांढरकवडा नाक्यावर विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. तपासणीदरम्यान संशयित दोन ट्रक थांबवून त्यांची झडती घेतली असता, त्यामध्ये एकूण ६९ हजार ५०० किलो (६९.५ टन) सुपारी आढळून आली. ही कारवाई अन्न व औषधि प्रशासन विभागाचे अधिकारी अमित उपलप यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी विभागाचे अधिकारी नरवडे आणि जगदीश कापसे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत मालाच्या वाहतुकीशी संबंधित कागदपत्रे व वैधतेची तपासणी केली. प्राथमिक चौकशीनंतर दोन्ही ट्रकांसह सुपारीचा संपूर्ण साठा जप्त करण्यात आला.

विभागीय सूत्रांच्या माहितीनुसार, जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत सुमारे ८९ लाख २५ हजार रुपये इतकी आहे. सध्या संबंधित व्यापारी आणि वाहनचालकांची चौकशी सुरू असून, सुपारीचा उगम, वाहतुकीचा उद्देश आणि अंतिम गंतव्यस्थान याचा तपास केला जात आहे.अन्न व औषधि प्रशासन विभागाने खाद्यपदार्थांच्या वाहतूक, साठवण आणि व्यापारातील नियमांचे काटेकोर पालन करण्यासाठी भविष्यातही अशाच धडक कारवाया सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध मालवाहतुकीच्या साखळीवर मोठा आघात झाल्याचे मानले जात आहे.

# ३५ वर्षांनंतर शासन फसवणूक प्रकरणात कारवाई..!

### कासलीकर यांच्या कडून ३० दिवसांत वेतन वसुलीचे आदेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १९ :** तब्बल ३५ वर्षे प्रलंबित राहिलेल्या कथित शासन फसवणूक प्रकरणात जिल्हा परिषद यवतमाळच्या प्राथमिक शिक्षण विभागाने अखेर कठोर भूमिका घेत ध्रुव प्राथमिक शाळेचे तत्कालीन सहाय्यक शिक्षक तथा सध्याचे विशुद्ध शिक्षण संस्थेचे सचिव विजय दा. कासलीकर यांच्याविरुद्ध संबंधित कालावधीतील संपूर्ण वेतन वसुलीचे आदेश जारी केले आहेत. या आदेशामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

शिक्षण विभागाने शैक्षणिक सत्र १९९०-९१ मधील वेतनाची वसुली करून ती शासन खात्यात जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच १९ मार्च १९९१ रोजी पारित झालेल्या मूळ आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली होती की नाही, याची सखोल पडताळणी करून ३० दिवसांत अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. उपलब्ध नोंदीनुसार, सेवेत असताना विजय कासलीकर यांनी जिजाऊ शिक्षण महाविद्यालयात बी.एड. अभ्यासक्रमासाठी नियमित प्रवेश घेतला होता. शासकीय नियमानुसार, सेवेतील कर्मचाऱ्याला नियमित उपस्थिती देत व्यावसायिक शिक्षण घेण्याची परवानगी नसताना त्यांनी शाळेचे पूर्ण वेतन घेतल्याचा आरोप आहे. याच कारणावरून १९९१ मध्ये वेतन वसुलीचा आदेश पारित झाला होता. दरम्यान, सुनावणीवेळी संबंधित कालावधीतील अनेक महत्त्वाचे अभिलेख उपलब्ध नसल्याचे मुख्याध्यापकांनी लेखी कळविले. काही कागदपत्रे वाळवीमुळे नष्ट झाल्याचेही नमूद करण्यात आले. यामुळे हितसंबंधांचा संघर्ष आणि अभिलेखांच्या अनुपलब्धते बाबत स्वतंत्र चौकशीची मागणी पुढे आली आहे. प्रा. डॉ. विवेक देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले. सेवानिवृत्तीनंतर चार वर्षांनी विभागीय कारवाई करता येत नसल्याचा युक्तिवाद शिक्षण विभागाने फेटाळून लावत वेतन वसुलीसह जबाबदार अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे ३५ वर्षांपासून प्रलंबित असलेले हे प्रकरण आता निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याची चर्चा शिक्षण वर्तुळात रंगू लागली आहे.

# महसूल विभागाची मध्यरात्री रेती माफियांवर कार्यवाही

## तीन टिप्पर जप्त, खनिज माफियांमध्ये खळबळ

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे

**महागाव :** तालुक्यात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल प्रशासनाने बुधवारी रात्री धडक कारवाई करत रेतीची वाहतूक करणारे तीन टिप्पर जप्त केले. उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कारवाईमुळे अवैध रेती व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून प्रशासनाने यापुढेही अशाच कठोर कारवाया सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे.

महसूल विभागाच्या पथकाने १७ जूनच्या रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास मुडाणा, महागाव आणि फुलसावंगी परिसरात विशेष तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेदरम्यान विनापरवाना रेतीची वाहतूक करणारे तीन टिप्पर आढळून आले. तपासणीअंती वाहनांमधून रेतीची बेकायदेशीर वाहतूक सुरू असल्याचे स्पष्ट झाले.



### अवैध रेती वाहतुकीला प्रशासनाचा इशारा

**अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल विभागाची तपासणी मोहीम यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल. तसेच नागरिकांनीही अशा बेकायदेशीर प्रकारांची माहिती प्रशासनाला देऊन सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी केले आहे.**

कारवाईत एमएच-४० सीडी-३८९०, जेएच-०२ एडी-५६८० आणि जेएच-०२ एडी-८१६० क्रमांकाचे टिप्पर ताब्यात घेण्यात आले. प्रत्येक वाहनात सुमारे दोन ब्रास रेती आढळून आली. आवश्यक परवाने आणि कागदपत्रे सादर करण्यात अपयश आल्याने संबंधित वाहने जप्त करण्यात आली असून पुढील दंडात्मक कारवाईसाठी तहसील कार्यालय, उमरखेड येथे जमा करण्यात आली आहेत. महसूल प्रशासनाकडून गेल्या काही दिवसांपासून अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. शासनाच्या महसुलाचे नुकसान टाळणे आणि नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. ही संयुक्त कारवाई उपविभागीय अधिकारी राम मुळे यांच्या नेतृत्वाखाली तसेच तहसीलदार अभय मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये मंडळ अधिकारी गजानन सुरोशे (बिटरगाव), मंडळ अधिकारी मारुती एकुलवार (महागाव), महसूल सहाय्यक अक्षय बोनगुलवार आणि शिपाई मिलिंद पानपट्टे यांनी सक्रिय सहभाग घेतला

# पाच हजार योग साधकांचा महायोग सोहळा..!

### आंतरराष्ट्रीय योग दिनासाठी जय्यत तयारी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १९ :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून २०२६ रोजी सकाळी ६ वाजता दारव्हा रोडवरील पोलीस कवायत मैदान (हेलीपॅड ग्राऊंड) येथे भव्य सामूहिक योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, सुमारे पाच हजार योगसाधक सहभागी होणार आहेत.

पोलीस प्रशासन, पतंजली योग समिती, आर्ट ऑफ लिव्हिंग,जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळ, मेरा युवा भारत, महिला पतंजली योग समिती, भाजपा आणि योग नृत्य परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यंदाच्या योग दिनाची संकल्पना 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' अशी आहे. शहरातील विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व



स्वयंसेवी संस्थांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला असून, मोठ्या प्रमाणात जनसहभाग अपेक्षित आहे. पाऊस झाल्यास नगर परिषदेच्या इमारतीच्या पार्किंगमध्ये पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. यवतमाळकरांनी कुटुंबासह उपस्थित राहून योग चळवळीला बळ द्यावे, असे आवाहन मुख्य आयोजक मदन येरावार यांनी केले आहे.

## थोडक्यात



### राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप...

**यवतमाळ :** आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी,वाघाडी,यवतमाळ दि.१९ जून २०२६ यवतमाळ शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने देशाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत वाघाडी येथील "आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी" संस्थेमध्ये गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांसह पालकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले. कार्यक्रमाला यवतमाळ शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा.डॉ.बबलू उर्फ अनिल देशमुख,राजेंद्र गौतम पाटील,नंदू कुडमेथे,राजू राजगुरे,कृष्णा पुसनाके,शुभम शेंडे,कल्पनाताई मांगुळकर,नगरसेविका सपना लंगोटे,स्वाती येंडे,किरण मोघे,योगिता देशमुख तसेच "आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी" बहुउद्देशीय शैक्षणिक संस्थेच्या संचालिका पपीता माळवे,ईशू माळवे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत जिद्द,परिश्रम आणि सातत्याच्या बळावर उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले.राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे सामाजिक उत्तरदायित्वाचा संदेश देण्यात आला.



### युवा सेनेच्या दबावाने अवादा कंपनीने थकीत वेतन जमा..!

**यवतमाळ :** अवादा सोलर प्रकल्पा वरील सुरक्षारक्षकांच्या प्रलंबित वेतनाच्या प्रश्नावर युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळेकर यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेला मोठे यश मिळाले असून, बैठकीतील इशाऱ्यानंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी २०० हून अधिक कामगारांच्या खात्यात थकीत वेतन जमा करण्यात आले. कामगार प्रतिनिधी पंकज आडे यांनी यास दुजोरा दिला. मात्र नियुक्तीपत्र, प्रत्येक महिन्याच्या ७ तारखे पूर्वी नियमित वेतन आणि ३० दिवसांच्या पूर्ण पगाराचा प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याने कामगारांमध्ये नाराजी कायम आहे. अनेकांना ३० दिवसा ऐवजी २६ दिवसांचे वेतन मिळाल्याचा मुद्दाही पुढे आला आहे. प्रद्युम्न जवळेकर यांनी स्पष्ट इशारा देत, कामगारांना डावलून कोणतेही सेटलमेंट किंवा कॉम्प्रमाईज करण्याचा प्रयत्न झाल्यास युवासेना ते खपवून घेणार नाही. कामगारांच्या हक्कांशी तडजोड करणाऱ्यांना युवासेना स्टाईलने उत्तर दिले जाईल," असे ठणकावून सांगितले. उर्वरित मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# 'पाऊस दे रे देवा! पेरण्या रखडल्याने बाभुळगावात कृषी प्रतिनिधी व विक्रेत्यांचे सामूहिक साकडे

## मृग कोरडा गेल्याने बळीराजा चिंतेत..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभुळगाव, दि. १९ :** मृग नक्षत्र कोरडे गेल्याने आणि जून महिन्याचा मध्य उलटूनही समाधानकारक पाऊस न झाल्याने बाभुळगाव तालुक्यात खरीप हंगाम संकटात सापडला आहे. पेरणीयोग्य पाऊस नसल्याने शेतकरी हवालदिल झाला असून कृषी व्यवस्था विस्कळीत झाली आहे.

या पार्श्वभूमीवर तालुक्यातील विविध कृषी कंपनीचे प्रतिनिधी आणि स्थानिक कृषी विक्रेत्यांनी एकत्र येत गुरुवारी (दि. १८) पावसासाठी देवाकडे सामूहिक साकडे घालत 'नवसाचे जेवण' कार्यक्रमाचे आयोजन केले.येथील स्टेट बँकें समोर मंडप उभारून आयोजित या उपक्रमात शेतकरी, व्यापारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. 'पाऊस येऊ दे रे देवा' अशी सामूहिक



प्रार्थना करण्यात आली. सध्या बियाणे आणि खते दुकानांत पडून आहेत. काही शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी केले असले तरी अनेक जण पावसाची प्रतीक्षा करत आहेत. पाऊस पडल्याशिवाय पेरणी सुरू होणे अशक्य असल्याने शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.विज्ञान आपले काम करते, मात्र निसर्गाची साथ मिळाली नाही तर शेतीचे गणित जुळत नाही. म्हणूनच श्रद्धेचा आधार घेत देवाला साकडे घालण्याची वेळ आली आहे.अशी भावना आयोजकांनी व्यक्त केली. "बियाणे, खते घेऊन आम्ही तयार आहोत; पण पाऊस आल्याशिवाय शेतीची चाके फिरणार नाहीत," अशी व्यथा एका वृद्ध शेतकऱ्याने मांडली. या उपक्रमासाठी प्रवीण चेंडकापुरे, संदीप पवार, मनोज राऊत, प्रवीण मुळे, सचिन बेलसरे, निलेश भटकर, दिनेश जाठे, रुपेश सहारे, संकेत देशमुख, सागर परडखे, सूरज खूणकर, सुमित परोपटे, हेमराज लुक्कड, अक्षय डगवाल, ऋषिकेश गुल्हाने, मारोती कदम आदींनी परिश्रम घेतले.

# झरी तालुक्याच्या प्रश्नांवर खासदार प्रतिभाताई धानोरकर आक्रमक

### अधिकाऱ्यांना दिले तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. १९ :** झरी तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांबाबत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी आणि विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेतली. यावेळी तालुक्यातील रस्ते, अतिक्रमण पट्टे, पाणीपुरवठा, कृषी विभागाच्या समस्या, पीक विमा, नगरपंचायत आणि क्रीडा संकुला सह अनेक महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

वरपोळ गावातील रस्त्याची दुरवस्था, नागरिकांच्या अतिक्रमण पट्ट्यांचा प्रश्न आणि पाणीपुरवठ्याच्या अडचणींबाबत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पीक विमा योजनेतील त्रुटीं वरही अधिकाऱ्यांना





जाब विचारण्यात आला.बैठकीत तालुका काँग्रेस अध्यक्ष संदीप बुर्रेवार यांनी पीक विम्याच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत शेतकऱ्यांच्या समस्या तत्काळ सोडविण्याची मागणी केली. त्यावर खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी झरी तालुक्यातील प्रलंबित विकासकामे प्राधान्याने मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. काही कामांना आधीच मंजुरी मिळाल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. या आढावा बैठकीस बाजार समितीचे सभापती राजीव कासावार, माजी सभापती प्रकाश कासवार, भूमरेड्डी बाजानलावार, भगवान चुक्कलवार, गंगाधर आत्राम, सरपंच सुभाष कुलमेते, सरपंच महेश आईटवार, विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. झरीच्या विकास प्रश्नांवर आता दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. प्रत्येक प्रश्नाचा पाठपुरावा करून तोडगा काढला जाईल असा स्पष्ट इशारा खासदार प्रतिभा धानोरकर यांनी यावेळी दिला.

# नॅचरल शुगरच्या मिल रोलरचे पूजन



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे

**महागाव, दि. १९ :** गुंज सवना येथील नॅचरल शुगर अँण्ड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड, युनिट क्रमांक २ च्या ११ व्या गळीत हंगामाच्या तयारीला सुरुवात झाली असून गुरुवारी मिल रोलर पूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

नॅचरल उद्योग समूहाचे प्रमुख तथा चेअरमन व कार्यकारी संचालक कृषिरत्न व्ही. व्ही. ठोंबरे यांच्या हस्ते सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत मिल रोलरचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना व्ही. व्ही. ठोंबरे यांनी मागील गळीत हंगामातील यशाचा आढावा घेतला. कारखान्याने दहाव्या गळीत हंगामात ५ लाख ५५ हजार मेट्रिक टन ऊसाचे विक्रमी गाळप करून यशस्वी हंगाम पूर्ण केल्याचे त्यांनी सांगितले. येत्या ११ व्या गळीत हंगामासाठी ७ लाख ५० हजार मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून त्यासाठी कारखाना कार्यक्षेत्रात सुमारे १० हजार हेक्टर ऊस लागवडीची नोंद झाल्याची माहिती त्यांनी दिली. मिल रोलर पूजनानंतर येत्या ऑक्टोबर २०२६ च्या पहिल्या आठवड्यात गळीत हंगाम सुरू करण्याचे नियोजन असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. उपस्थित होते. कार्यक्रमाला कारखान्याचे जनरल मॅनेजर डी. एल. कदम यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तलवारी सह दहशत पसरविणारा तरुण जेरबंद..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १९ :** शहरात नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने अवैधरित्या धारदार तलवार बाळगून फिरणाऱ्या एका तरुणास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून ताब्यात घेतले. आरोपीकडून चंद्राकार, टोकदार व खाचेदार दाते असलेली तलवार म्यान सह जप्त करण्यात आली असून, त्याच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायदा व महाराष्ट्र पोलीस अधिनियम अतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शहरात गस्त घालत असताना आकाश गुरुदास राऊत (वय २६, रा. वाघाडी, ता. जि. यवतमाळ) हा वनवाशी मारोती मंदिर

## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई



परिसरात अवैधरित्या तलवार घेऊन फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीची शहानिशा करून पथकाने यवतमाळ - आर्णी महामार्गावरील सर्विस रोड परिसरात शोधमोहीम राबविली. यावेळी एक संशयित इसम कमरेला शस्त्र खोचून फिरताना आढळून आला. पंचासमक्ष झडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातून सुमारे एक हजार रुपये किंमतीची धारदार तलवार म्यानसह जप्त करण्यात आली. त्यानंतर आरोपीला ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली.

या प्रकरणी अवधुतवाडी पोलीस स्टेशन येथे अप. क्र. ८३२/२०२६ अन्वये भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई कुमार चिंता, अशोक थोरात आणि सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पो. उपनिरीक्षक शिवशंकर कार्यदे, सागर इंगळे यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सहभाग घेतला. शहरात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात पोलिसांनी धडक मोहीम सुरू केली असून, अशा प्रवृत्तीवर कठोर कारवाईचा इशारा या कारवाईतून देण्यात आला आहे.


# रोजगार मेळाव्यात ६५ जणांना रोजगार

**घाटंजी, दि. १९ :** येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (ITI) अप्रेंटिसशिप व रोजगार मेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. छत्रपती संभाजीनगर येथील एका नामांकित कंपनीसाठी ही मुलाखत प्रक्रिया राबवण्यात आली. या मेळाव्यात विजतंत्री, वायरमन, कोपा, जोडारी, वेल्डर, सर्व्हेअर आणि मोटार मेकॅनिक अशा विविध ट्रेड्सच्या तब्बल १६० प्रशिक्षणार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला होता. त्यापैकी ६५ पात्र उमेदवारांची कंपनीने प्रत्यक्ष रोजगारासाठी निवड केली. प्रशिक्षण व समुपदेशन अधिकारी एस. एन. आसोले यांच्या पुढाकाराने झालेल्या या मेळाव्यात कंपनीचे एचआर सुधीर आवटे व राठोड यांनी मुलाखती घेतल्या. प्राचार्य राहुल पळवेकर यांनी निवड झालेल्यांचे अभिनंदन केले. या उपक्रमामुळे स्थानिक युवकांना रोजगाराची मोठी संधी मिळाली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# प्रा.बी.टी.देशमुख यांना श्रध्दांजली



## बी.टी. सरांच्या निधनाने वैयक्तिक मार्गदर्शकाला मुकलो! - मुख्यमंत्री

**मुंबई :** माजी आमदार, शिक्षणतज्ज्ञ आणि विविध सामाजिक प्रश्नांचे गाढे अभ्यासक, ज्येष्ठ नेते प्रा. बी. टी. देशमुख यांच्या निधनाने महाराष्ट्र एका मोठ्या संघर्षशील नेतृत्त्वाला मुकला आहे. माझ्या जीवनातील एक मार्गदर्शक मी गमावला आहे, अशी भावपूर्ण श्रद्धांजली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

आपल्या शोकसंदेशात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, ज्यासाठी संघर्ष केला, त्यासाठी जीवन समर्पित असेच आयुष्य ते जगले. मला तर त्यांच्याकडून व्यक्तिगतदृष्ट्या खूप काही शिकायला मिळाले. त्यांचे कायमच मोलाचे मार्गदर्शन मिळायचे. राजकारण आणि समाजकारण एकच आहे, असे मानणाऱ्या पिढीचे ते नेतृत्त्व करीत होते. अमरावती पदवीधर मतदारसंघाचे विधानपरिषदेत त्यांनी पाचवेळा प्रतिनिधीत्त्व केले. प्राध्यापक, शिक्षकांच्या हक्कांसाठी तर ते लढलेच, पण अनेक सामाजिक प्रश्नांना त्यांनी विशेषत्त्वाने वाचा फोडली. एक अत्यंत अभ्यासू आणि प्रेरणादायी असे हे व्यक्तिमत्त्व होते. विधानपरिषदेतील त्यांची भाषणे ऐकत रहावी वाटायची. ती आजही नवीन सदस्यांसाठी प्रेरणादायी आहेत. विदर्भाच्या अनुशेषाविरोधात त्यांनी दिलेला लढा अत्यंत मोलाचा होता. मला आजही आठवते, सरकारी दरबारी भांडून न्याय मिळत नाही, म्हणून त्यांनी अनुशेष निर्मूलनासाठी थेट हायकोर्टात याचिका केली होती. सुनावणीच्यावेळी बी.टी. सरांसोबत मीही उपस्थित राहत होतो. सिंचन, पेयजल योजना यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. अमरावती विद्यापीठाच्या निर्मितीत सुद्धा त्यांचे योगदान होते. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

## महान शिक्षक व निष्कांचन लोकप्रतिनिधीला मुकलो! -पालकमंत्री बावनकुळे

**नागपूर :** प्रा. बी टी देशमुख यांचे आपल्यातून जाणे म्हणजे विकासाच्या निर्मळ विचाराला मुकणे आहे, अशी भावना व्यक्त करून महसूल मंत्री व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज आपण एक महान शिक्षक, लोकप्रतिनिधीला गमावले आहे अशी शोकसंवेदना व्यक्त केली.

आपल्या शोक संदेशात पालकमंत्री बावनकुळे म्हणतात की, प्रा. बी. टी. देशमुख विदर्भाचे त्रिकालदर्शी वैभव होते. बाणेदार आणि पाणेदार माणूस असलेले बीटी देशमुख सामाजिक जाणिवांचे निरामय आणि राजकारणातील निरागस व्यक्तित्व होते. सार्वजनिक आयुष्य कसे असावे, याचा आरस्पानी वस्तुपाठ ☞(पान २ वर)

## विदर्भाचे बुलंद वैचारिक नेतृत्व हरपले! : खा.डॉ. अनिल बोंडे

**अमरावती :** 'विदर्भाच्या शैक्षणिक, वैचारिक आणि सिंचन चळवळीचे महामेरू, आमच्या अमरावतीचे ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. डॉ. बी. टी. देशमुख (बी. टी. सर) यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आणि वेदनादायी आहे. त्यांच्या जाण्याने विदर्भाच्या सार्वजनिक आणि संसदीय जीवनातील एका ऋषितुल्य, अभ्यासू पर्वाचा अंत झाला आहे.

बी. टी. सर हे केवळ एक लोकप्रतिनिधी नव्हते, तर ते विधान परिषदेचे चालते-बोलते विद्यापीठ होते. सलग ३० वर्षे त्यांनी सभागृहात पदवीधर आणि शिक्षकांचे प्रश्न ज्या आक्रमकतेने आणि अभ्यासूवृत्तीने मांडले, त्याला तोड नाही. विदर्भाच्या हक्काचा 'सिंचन अनुशेष' किती हजार कोटींचा आहे, हे आकडेवारीसह सभागृहात मांडून सरकारला झुकवणारे ते खऱ्या अर्थाने विदर्भाचे वाघ होते. राजकारणात असूनही अत्यंत साधे, निस्पृह आणि तत्त्वनिष्ठ जीवन जगणाऱ्या सरांची जागा कधीही भरून निघणार नाही. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि हा आघात सहन करण्याची शक्ती ईश्वर त्यांच्या परिवाराला ☞(पान २ वर)

## विदर्भाच्या क्षेत्राची मोठी हानी

माजी आमदार प्रा. बी. टी. देशमुख यांच्या निधनाने विदर्भाच्या राजकीय, सामाजिक आणि कृषी क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, प्रा. बी टी देशमुख हे केवळ राजकारणी नव्हते, तर शेतकरी, सिंचन आणि ग्रामीण विकासाच्या प्रश्नांवर सखोल अभ्यास करणारे विचारवंत होते. विदर्भातील सिंचन अनुशेष, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कोरडवाहू शेतीचे प्रश्न आणि प्रादेशिक विकासासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. विधिमंडळात तसेच जनतेच्या प्रश्नांवर त्यांनी नेहमीच अभ्यासपूर्ण आणि परखड भूमिका मांडली. त्यांच्या कार्यामुळे विदर्भाच्या विकासाच्या प्रश्नांना राज्यस्तरावर महत्त्व प्राप्त झाले. त्यांचे साधेपण, प्रामाणिकपणा आणि जनसामान्यांप्रती असलेली बांधिलकी कायम स्मरणात राहील. त्यांच्या निधनामुळे सार्वजनिक जीवनात निर्माण झालेली पोकळी भरून न निघणारी आहे.

**-अनिरुद्ध उर्फ बबलू देशमुख,** अमरावती काँग्रेस जिल्हाध्यक्ष

## अनुभवी अभ्यासू व्यक्तिमत्व हरपले - आ.प्रताप अडसड

माजी आमदार बी टी देशमुख यांच्या निधनाचे वृत्त दुःखद आहे. त्यांच्या निधनाने राजकीय व सामाजिक क्षेत्रातील एक अनुभवी, अभ्यासू व्यक्तिमत्व हरपले आहे. अमरावती पदवीधर मतदारसंघातून ते सलग ६ वेळा आमदार (विधान परिषद) म्हणून निवडून आले होते.शिक्षकांच्या हक्कासाठी लढणारे आणि विदर्भाच्या सिंचन अनुशेषाचा मुद्दा आक्रमकपणे मांडणारे अभ्यासू लोकप्रतिनिधी म्हणून ते ओळखले जात असत. एक ज्येष्ठ पत्रकार म्हणून त्यांची ओळख होती. दैनिक हिंदुस्थान मध्ये त्यांनी अनेक वर्ष त्या काळात पत्रकारिता केली होती. त्यांच्या निधनामुळे आज अमरावती जिल्ह्यातीलच नव्हे तर विदर्भातील एक कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व आपल्यातुन हरपले आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## विदर्भाने एक अभ्यासू मार्गदर्शक गमावला

'विदर्भाच्या सिंचन अनुशेषाच्या लढ्याला दिशा देणारे आणि ज्ञान, अभ्यास व सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम असलेले प्रा. डॉ. बी. टी. देशमुख यांच्या निधनाने विदर्भाने एक अभ्यासू मार्गदर्शक, तर समाजाने एक निस्वार्थ ज्ञानयोगी गमावला आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान जितके मोलाचे होते, तितकेच विदर्भाच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी उभारलेले संवैधानिक आंदोलनही प्रेरणादायी होते. विदर्भाच्या सिंचन अनुशेषाचा प्रश्न केवळ आकडेवारीत न मांडता त्यांनी तो जनतेच्या विकासाशी जोडला आणि आयुष्यभर अभ्यासपूर्ण, संयमी व लोकशाही मार्गाने ☞(पान २ वर)

# मनपा पशुवैद्यकीय अधिकारी बोंद्रे यांचे अखेर निलंबन

## एसीबीच्या कारवाईनंतर आयुक्तांचे तडकाफडकी आदेश

### ४७ लाखांच्या देयकासाठी मागितली होती लाच

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेचे सहाय्यक पशु शल्य चिकित्सक तथा प्रभारी पशुवैद्यकीय अधिकारी सचिन बोंद्रे (वय ४७) यांना १ लाख रुपये लाचेची मांगणी केल्या प्रकरणी अमरावती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी उशिरा रात्री त्यांच्या राहत्या घरातून ताब्यात घेऊन अटक केली आहे. आरोपी बोंद्रे यांच्या विरुद्ध शहर कोतवाली पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यानंतर



मनपा आयुक्त वर्षा लढ्ढा यांनी तडकाफडकी आदेश काढून पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन बोंद्रे यांना निलंबित केले आहे. न्यायालयीन कोठडीत असताना सेवेतून ते निलंबित राहणार आहे. आयुक्तांच्या या कार्यवाहीमुळे एकच खळबळ उडाली आहे. माहितीनुसार तक्रारदार यांच्या संस्थेने अमरावती महानगरपालिका अंतर्गत श्वान उत्पत्ती, नियंत्रण, निर्बीजीकरण व लसीकरण कंत्राटाचे काम पूर्ण केले होते. या विविध कामांचे एकूण ४७ लाख रुपयांचे देयक मंजूर करून देण्यासाठी सचिन बोंद्रे यांनी तब्बल २५ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. पहिला टप्पा म्हणून २ लाख रुपयांची तर तडजोडी अंति १ लाख रुपये लाचेची मागणी केली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १० जून रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान ही लाचेची मागणी निष्पन्न झाली होती. त्यानंतर ११ जून रोजी एसीबीने लाचेचा सापळा रचला होता. मात्र, शासकीय ☞(पान २ वर)

# वीट भट्टी मजुराची निर्घृण हत्या

## माहुली जहागीर पोलीस ठाणे हद्दीतील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** माहुली जहागीर पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या मालेगाव येथील वीट भट्टीवर काम करणाऱ्या एका मजुराचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. या प्रकरणात मृतकाच्या भावाच्या तक्रारीवरून हत्येचा गुन्हा दाखल करून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. राज अखंडे (धामणगाव गढी) असे मृतक मजुराचे नाव आहे तर ट्रॅक्टर चालक संतोष बाबाराव इंगळे (वय ३७) व प्रफुल वामनराव खाटसरे(वय ४२, दोघे राहणार गुरुदेव नगर मोझरी ) अटक आरोपींची नावे आहे. माहिती नुसार मृतक राज अखंडे वीट भट्टी कामगार होता. त्याचा भाऊ रोशन अखंडे यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की मृतक राज ट्रॅक्टर चालक संतोष बाबाराव इंगळे आणि प्रफुल खाटसरे यांच्यासोबत १४ जून रोजी वीट भट्टीचा माल पोहचवण्यासाठी माहुली येथे गेला होता. यावेळी चालक संतोष इंगळे यांना काही काम असल्याने ते अमरावतीला पण आले होते. या दरम्यान वीट

### दोन आरोपी ताब्यात

भट्टी संचालक नजीर शाह यांनी राजला फोन करून विचारले असता त्याने सांगितले होते की, तो अमरावती मध्ये आहे आणि संतोष दारू पिण्यासाठी पैसे खर्च करत आहे. यावरून संचालक नजीर शाह यांनी संतोष इंगळे याच्यावर नाराजी व्यक्त केली होती. यावरून राज अखंडे आणि आरोपींच्या मधात मारहाण झाली. रोशन राज ला फोन लावत असता त्याचा फोन लागत नव्हता. १५ जून रोजी तो जेव्हा वीट भट्टीवर गेला तर त्याला तिथे राजचा मृतदेह दिसला. त्याने याची माहिति पोलिसांना दिली पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टम साठी पाठवला. रोशनने भावाच्या मृत्यूसाठी ट्रॅक्टर चालक संतोष इंगळे आणि प्रफुल खाटसरे यांना जबाबदार ठरवले होते. दोघांनी मिळून भावाला संपविले असे म्हटले होते. या प्रकरणात पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन, त्यांच्याकडून विचारपूस केली आहे. त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे. दोन्ही आरोपींविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आलेला आहे.

# अंजनगाव सुर्जी बाजार समितीच्या संचालकावर गुन्हा दाखल

## -वडिलोपार्जित जमीन हडपण्यासाठी बनावट कागदपत्रे

### अकोला खदान पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** कौटुंबिक वडिलोपार्जित संपत्ती हडपण्याच्या उद्देशाने खोटे दस्तऐवज तयार करून फसवणूक केल्याच्या गंभीर आरोपाखाली अंजनगाव सुर्जी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या एका संचालकाविरुद्ध अकोला येथील खदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रवि ठाकूरदास उपाध्ये (रा. रामपुरा कोकर्डा, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या संचालकाचे नाव आहे. अकोला जिल्ह्यातील खडकी (बु.) येथील सर्व्हे क्रमांक २२/१ मधील सुमारे ६१ आर नातेवाईकाची, म्हणजेच आत्याची वडिलोपार्जित जमीन बळकावण्यासाठी आरोपी रवि उपाध्ये यांनी खोटे हक्कसोड प्रमाणपत्र व इतर बनावट दस्तऐवज तयार केल्याचा आरोप आहे.



याप्रकरणी तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सातबाऱ्यावरील वारसांच्या बनावट सह्या करून, तसेच आधार कार्ड व इतर कागदपत्रांचा दुरुपयोग करून आरोपीने जमिनीवर मालकी हक्क सांगण्याचा प्रयत्न केला. वारसाच्या जागी दुसऱ्याच महिलेला उभे करून हा प्रकार केल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. तक्रारीवरून खदान पोलीस ठाणे, अकोला येथे गुन्हा क्र. १०२९/२०२६ दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता अंतर्गत फसवणूक, बनावटगिरी, खोटे दस्तऐवज तयार करणे व विश्वासघात या गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी रवि उपाध्ये यांना १ जून रोजी अटक करून न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना ४ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी संपल्यानंतर आरोपीला न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात ☞(पान २ वर)

# दस्तुरनगर परिसरात थकबाकीदार मालमत्ता धारकांना जप्तीची नोटिस

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका पूर्व झोन क्र. ३ अंतर्गत दस्तुरनगर परिसरात मालमत्ता कराच्या थकीत देयकांच्या वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमे दरम्यान थकबाकीदार मालमत्ता धारकांना जप्ती नोटिसा बजावण्यात आल्या. महानगरपालिकेच्या माहितीनुसार, वार्ड क्र. ८ मधील मालमत्ता क्रमांक ११४ चे धारक रविराज हिम्मतराव देशमुख यांचे पेट्रोल पंप, विद्यापीठ कॉलनी, एमआयडीसी रोड यांच्याकडे सुमारे ९ लाख रुपयांची थकबाकी ☞(पान २ वर)



# 'एक पृथ्वी - एक आरोग्य' संकल्पनेतून आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन

**चिखलदरा/प्रतिनिधीः-** कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा व गिरीजन शारीरिक शिक्षण महाविद्यालय, चिखलदरा यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन – २०२६ निमित्त विशेष योग कार्यक्रमाचे आयोजन दि. २१ जून २०२६ रोजी सकाळी ८ वाजता गिरीजन शारीरिक शिक्षण महाविद्यालय, चिखलदरा येथे करण्यात आले आहे.

'एक पृथ्वी – एक आरोग्य' या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमाचे उद्घाटन आचार्य डॉ. अनिल निंभेकर, प्राचार्य, गिरीजन शारीरिक शिक्षण महाविद्यालय, चिखलदरा यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. राजेश जयपूरकर, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा (माजी प्र-कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ) हे राहणार आहेत. यावेळी सुप्रसिद्ध योगतज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. रविंद्र सावरकर (परतवाडा) हे उपस्थितांना योगाचे शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक महत्त्व सांगून विविध योगासने, प्राणायाम व ध्यान यांचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाच्या ☞(पान २ वर)

# नीट परीक्षेसाठी शहरात हाय अलर्ट

## रविवारी १४ केंद्रावर नियोजन, डॉक्टर, आरोग्य व पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा नीट पुर्नपरीक्षेसाठी शहरात जिल्हा प्रशासन अलर्ट आहे. रविवारी शहरातील १४ केंद्रांवर परीक्षा होणार आहे. यासाठी प्रशासनाच्या वतीने व्यापक नियोजन करण्यात आले आहे. परीक्षा शांतीपूर्ण आणि कॉपी मुक्त करण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत आहे. शहरातील नरसम्मा, भारतीय महाविद्यालय, बियाणी कॉलेज, शिवाजी सायन्स, स्कूल ऑफ स्कॉलर्स, के एल कॉलेज, शिवाजी कला वाणिज्य, समर्थ कनिष्ठ महाविद्यालय सह १४ केंद्रांवर ४७०० विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. पेपर लीक झाल्याच्या पार्श्वभूमीवर यंदा खबरदारी म्हणून उपाययोजना करण्यात आल्या आहे. पहिल्यांदा कोषागार येथून कॅश वाहनातून प्रश्नपत्रिका केंद्रावर पोहोचणार आहेत. शनिवारी संध्याकाळपासूनच परीक्षा केंद्रावर पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे. यासाठी १६ ते १७ बँकांच्या कॅश वाहन अधिकृत करण्यात आले आहे. पोलिसांच्या बंदोबस्तात प्रश्नपत्रिका सेंटरवर पोहचणार आहे.




प्रत्येक तीस विद्यार्थ्यांवर नजर ठेवण्यासाठी एक पर्यवेक्षक राहणार आहे. आरोग्य विभागाची पूर्ण टीम तयार आहे.

वीजपुरवठा बाधित होऊ नये म्हणून विभाग प्रयत्न करत आहे. रविवारी सकाळी सकाळी ११ वाजेपासून प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे.

जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण तयारीचा आढावा घेऊन आवश्यक दिशा निर्देश ही दिलेले आहे. देशातील सर्वात महत्त्वपूर्ण परीक्षांमधून ही एक आहे. पारदर्शक वातावरणात परीक्षा घेण्यासाठी प्रशासन पूर्णतः सज्ज झाले आहे. सुरक्षेच्या दृष्टीने परीक्षा केंद्रावर डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, विद्युत विभागाचे इंजिनियर आणि १६०० कर्मचारी तैनात राहणार आहे. याव्यतिरिक्त पोलीस विभागाने व्यापक नियोजन केले आहे. परीक्षेदरम्यान २०पीएसआय, १२० कर्मचारी राहणार आहे. शनिवारी सायंकाळी पोलीस कर्मचारी केंद्रावर पोहोचणार आहे. पालक आणि इतरांना केंद्रापासून दूर ठेवण्यात येणार आहे.

# अमरावती एनएसयुआयच्या शहराध्यक्षपदी स्वराज पोटे यांची नियुक्ती

**अमरावती/प्रतिनिधीः-** एन.एस.यु.आय.तर्फे संपूर्ण देशभर नीट परीक्षेमध्ये झालेल्या पेपर फुटी तसेच सी.बी.एस.इ.संदर्भातील चालू असलेल्या गोंधळाबाबत जबाबदार असलेल्या धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामाच्या मागणीवर आक्रमक आंदोलने चालू आहेत. याच धर्तीवर अमरावतीमध्ये सुद्धा ५ जून रोजी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर एन.एस.यु.आय . वतीने राष्ट्रीय अध्यक्ष विनोद जाखर व प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे यांच्या प्रमुख नेतृत्वात व शेकडो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत भव्य मशाल मार्च काढण्यात आला. राष्ट्रीय अध्यक्षांच्या याच अमरावती दौऱ्या दरम्यान नव्याने चालू होणाऱ्या शैक्षणिक सत्राच्या अनुषंगाने एन.एस.यु .आय. च्या नवीन शहर समिती निर्मितीच्या दृष्टीकोनातून शहर अध्यक्ष पदासाठी चाचपणी करण्यात आली.☞(पान २ वर)



# नांदगाव पेठमध्ये चोरी

## दीड लाखाचा मुद्देमाल लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ परिसरातील माळीपुरा मध्ये अज्ञात आरोपीनी बंद घराला निशाणा बनवून तेथून रोख व सोने- चांदीचे दागिन्यासह दीड लाखाचा मुद्देमाल लंपास केला आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.




माहितीनुसार माळीपुरा परिसरात राहणारे अतुल वासुदेव राऊत कुटुंबियांसह रात्रीच्या वेळी झोपले होते. त्यावेळी अज्ञात आरोपींनी त्यांच्या घराच्या वरच्या मजल्यावर जाऊन तेथे ठेवलेल्या गोदरेजच्या अलमारीचे कुलूप तोडून रोख १५ हजार व सोने चांदीचे दागीणे असा दीड लाखाचा मुद्देमाल लंपास केला. सकाळी जेव्हा कुटुंबीय जागे झाले तेव्हा ही घटना समोर आली. अतुल राऊत यांनी तात्काळ नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची तक्रार दिली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. श्वान पथक, फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले होते .पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# एमडी ड्रग्जसह युवक जेरबंद

## १८.८ ग्रॅम एमडी, मोपेड आणि रोख रक्कम जप्त

### नागपुरी गेट पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात नागपुरी गेट पोलिसांनी धडक कारवाई करत एमडी (मेफेड्रोन) हा अमली पदार्थ विक्रीसाठी बाळगणाऱ्या एका युवकाला अटक केली. आरोपीकडून १८.८ ग्रॅम एमडी, मोपेड आणि रोख रक्कम असा एकूण १ लाख ४६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नागपुरी गेट पोलिस ठाण्याचे डीबी पथक परिसरात गस्त घालत असताना अन्सारनगर येथील पाण्याच्या टाकीमागील मैदान परिसरात एक युवक अमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. ही माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, पोलीस निरीक्षक (गुन्हे) जनार्धन साळुंखे आणि उपनिरीक्षक जितेंद्र भार्गव यांना देण्यात आली. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय पंच, फॉरेन्सिक पथक यांच्या उपस्थितीत सापळा रचण्यात आला. त्यावेळी संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या एका युवकाला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव शेख इरफान ऊर्फ अंगारी शेख कलीम (वय २४, रा. रतनगंज, पहिला नागोबा ओटा, अमरावती) असे ☞(पान २ वर)

# जिल्ह्यातील ४९८ ग्रामपंचायतींचे प्रारूप आरक्षण प्रसिद्ध

## २५ जूनपर्यंत आक्षेप नोंदविता येणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील एकूण ४९८ ग्रामपंचायतींचे प्रभागनिहाय प्रारूप आरक्षण आज, १९ जून २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे. संबंधित तहसील कार्यालय, गटविकास अधिकारी कार्यालय, तलाठी कार्यालय तसेच ग्रामपंचायत कार्यालय येथे रीतसर मुनादी (दवंडी) देऊन हे प्रारूप आरक्षण नागरिकांसाठी खुले करण्यात आले आहे. या प्रभागनिहाय प्रारूप आरक्षणामध्ये जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील ४४, वरूड ४३, दर्यापूर ४९, अंजनगाव सुर्जी ३४, अमरावती ४६, भातकुली ३६, नांदगाव खंडेश्वर ५१, चांदुर रेल्वे ३०, धामणगाव रेल्वे ५५, तिवसा ३०, मोर्शी ३९ आणि चांदुर बाजार तालुक्यातील ४१ अशा एकूण ४९८ ग्रामपंचायतींच्या आरक्षणाचा तपशील समाविष्ट आहे. दरम्यान, हे प्रारूप आरक्षण प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या नागरिकांना यावर काही आक्षेप किंवा हरकती घ्यायच्या असतील, त्यांच्यासाठी २५ जून २०२६ ही अंतिम तारीख असणार आहे. शासकीय सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत संबंधित तहसील कार्यालयात हे आक्षेप स्वीकारले जातील, तरी इच्छुकांनी विहित मुदतीत आपले आक्षेप नोंदवावेत, असे आवाहन उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांनी केले आहे.

'वाचाल तर वाचाल' की ग्रंथालय 'अनुदान लाटाल'

# यवतमाळातील अनेक ग्रंथालये कागदोपत्रीच, प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** 'वाचाल तर वाचाल' हा संदेश समाजाला ज्ञान, विवेक आणि बौद्धिक समृद्धीकडे नेणारा मानला जातो. मात्र, यवतमाळ जिल्ह्यातील अनेक सार्वजनिक ग्रंथालयांची सध्याची परिस्थिती या विचारालाच हरताळ फासणारी ठरत आहे. शासनाकडून लाखो रुपयांचे अनुदान घेणारी अनेक ग्रंथालये प्रत्यक्षात कुलूपबंद असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत असून, वाचन संस्कृतीला भ्रष्टाचाराची वाळवी लागल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.



शासनाने वाचन संस्कृतीचा प्रसार व्हावा, विद्यार्थ्यांना आणि सर्वसामान्य नागरिकांना ज्ञानसंपदा उपलब्ध व्हावी, यासाठी 'अ, ब, क, ड' गटांमध्ये ग्रंथालयांची वर्गवारी करून नियमित अनुदानाची तरतूद केली आहे. मात्र, विश्वसनीय सूत्रांकडून ☞(पान २ वर)